शनिवार
२८ जुलै १९७९
७५ पैसे

# माणूस

# दिल्लीतील राजकीय भूकंप

९ जुलै ते १५ जुलै....



# श्री भगवान उवाच....

अर्जुन म्हणे वनमाळी
आज पुन्हा भल्या सकाळी
घेऊनी करी फाटकी झोळी
तव दारी पातलो।

घाली ज्ञानकणांची भीक
चुकलो जरी मी कितीक
क्षमा करावी हेच ठीक
मज पामरासी।

पुन्हा परी भारतदेशी
जी लोकशाहीची काशी
हुकूमशाहीला दिले फाशी
मतदारांनी जेथल्या।

सुरू तिथे नवा गोंधळ
मुद्दे जुनेच नवीन घोळ
नवीन सोंग, जुनं जरी वळ
नेत्यांचे येथल्या।

ग्रीष्मानंतर येई पावसाळा
केला पाहिजे काही तरी चाळा
विचार छळतो यशवंतबाळा
संसदेमाजी।

त्यातून झाला पक्षाचा नेता
विरोधात तो आधीच होता
सह्याद्री जणू हा चालता–बोलता
राजधानीत वसतसे।

अविश्वासाचा आणला ठराव
कळण्याआधीच बसला घाव
यशवंतबाळाचा सुटला ठाव
पाहूनी सारे।

म्हणे काय मी करावया गेलो
आणि काय हे करून बसलो
कशाला पक्षनेताही झालो
कठीण काळी।

घालावी पहार हंडा लागावा
फटाका लावता बाँब उडावा
किंवा काकभारे वृक्ष खाली यावा
जाहले तैसे।

सत्तारूढांमध्ये झाला असंतोष
तत्त्वांचा करून पुन्हा कंठशोष
बळेबळेच आणूनी जोश
पक्षत्याग करिती।

म्हणती आमचा नवीन पक्ष
नव्या ध्येयांवरी आमचे लक्ष
धोरणही नवे प्रजाहितदक्ष
आखले आम्ही।

धर्म, पंथ, जात आम्ही गाडली
प्रतिगामी जे जे, संगत सोडली
लढ्यांची नवीन नौबत झडली
आजपासूनी।

एकामागे एक उठू लागले
पक्षामधून फुटू लागले
आणखी फोडण्या झटू लागले
रात्रंदिन।

कालचे जे साथी, आज दुश्मन
बोलले जे काल जीव तोडून
पळती रणांगण तेही सोडून
अचानक।

झाली पडझड सरकार पडले
पूर्वी कधी नाही असे घडले
कधी नव्हे ते काम वाढले
राष्ट्रपतीचे।

जो तो म्हणतो आम्ही बलवान
लोकशाहीचा आम्हीच प्राण
आम्हीच वाढवू देशाची शान
जगामध्ये।

सरकार स्थिर आम्हीच देणार
आमच्याविन कोण देश तारणार
निःस्वार्थीपणाने कोण करणार
जनसेवा।

जनतेसाठीच जन्म आमचा
तिच्यासाठी होवो त्याग देहाचा
स्वर्गी गेलो तरी ध्यास आम्हा तिचा
सदोदित।


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : नववा
२८ जुलै १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४५९

राष्ट्रपतीला भाव फार आला
जो दिल्लीत आला तिथे धावला
मीच पात्र कसा राज्य करण्याला
सांगे जो तो ।

राष्ट्रपतीनेही गंमत केली
यशवंतबाळाला प्रेमचिठ्ठी दिली
निर्णय घेण्याची वेळ पहिली
आयुष्यात ।

कुंपणी बसून मजा पहावी
संधी आली तरी सोडून द्यावी
मिळेल ती खुर्ची प्रेमाने घ्यावी
धोरण ज्याचे ।

धावून धावून किती धावणार
ओढून बळ किती आणणार
कोणाकोणापुढे भीक मागणार
पाठिंब्याची ।

आयुष्यात नाही जमले काही
राज्यापलीकडे पकड नाही
व्यापक दृष्टी नाही वासालाही
ज्याच्याठायी ।

काय सरकार देशाला देणार
स्थैर्य कुठून उधार घेणार
काय कामाला बुद्धी येणार
अशा माणसाची ।

शत्रू दिसता दूर राहणार
आव्हानापुढे जो मान टाकणार
फक्त इमाने वस्त्रं सांभाळणार
इतरांची ।

फडकं बांधून कुणी डोक्याला
क्रांतीचा जयघोष करीत आला
सरकार करण्या सांगा की मला
बुभुत्कारिला तो ।

आयुष्य गेले कथा सांगता
आदर्श याचे राम–हनुमंता
काय करणार संकट येता
देशावरती

पाला–पाचोळा कधी कुटूनी
खलामध्ये मुळचा कधी घाटूनी
लाडू आणि पेढे सदा वाटूनी
आयुष्य काढिले ।

आरोग्याच्या हा फक्त मारी बाता
नाही काही केले त्याच्याकरिता
कुटुंबस्वास्थ्याचा मंत्रीही होता
एके काळी ।

म्हणतो समोर उभा दुर्योधन
लढू या त्याच्याशी सारे आपण
निधर्मीपणाचे आणून अवसान
गर्जला तो ।

जातीयवादाशी आमचा लढा
शिकवितो पहा साऱ्यांना धडा
दुसऱ्या घरावर मारतो खडा
स्वगृही तेच ।

याच्या नेत्याचे गुण काय वानू
शब्द उसने कुठून आणू
काय सांगू आणि कसे मी जाणू
अंतरंग तयाचे ।

शेतकऱ्यांचा म्हणे हा नेता
दुर्बलांचा म्हणे हाच एक त्राता
व्याकुळ होतसे हातची जाता
सत्ता याच्या ।

सत्तेसाठी कधी याने रुसावे
आजारी पडून घरी बसावे
मंत्रिपद देता पुन्हा हसावे
खोटेखोटे ।

नाही काही याला देशाची तमा
लोभाला याच्या ना काही उपमा
सत्तेसाठी हा फासे काळिमा
इज्जतीला ।

सत्तेसाठी हा करतो काहीही
मिठी कोणाला, पाहत नाही
शय्यासोबतीला चाले कुणीही
सत्तेसाठी ।

सत्तेसाठी याने पक्ष फोडला
जमेल त्याला खाली ओढला
सूड जुना या निमित्ते काढला
सत्तेसाठी ।

काय या देशाचे आता होणार
कोण कसा आता याला तारणार
स्थैर्य, सुबत्ता कशी नांदणार
देशात या ।

सांग बा कृष्णा उपाय काही
मला तरी काही कळत नाही
जन्म पुन्हा घ्यावा काही उपायी
तूच आता ।

**श्री भगवान उवाच**

जाणतो पार्था तुझी ही स्थिती
पाहतो मीही सारी अवनती
खरी आहे गड्या तुझीही भीती
सर्वथैव ।

मलाही याचा का हर्ष वाटतो
काळ जुना मनी दाटून येतो
समाचार कैसा घेत मी होतो
दुष्ट रिपुचा ।

काय होते आता पुढे पाहतो
अजून थोडी कळ साहतो
अन्यथा साऱ्याचा अर्थ लावतो
पुढल्या अंकी ।

–सतीश कामत

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

## ॥ सुजन कसा मन चोरी ॥

बालगंधर्वांच्या साठीतल्या कन्येने, बैठकीकडे जाण्याआधी, खुर्चीवर हार घालून ठेवलेल्या आपल्या पित्याच्या फोटोला नमस्कार केला. मग ती बैठकीवर येऊन बसली.

बाजूच्या खोलीतून तंबोरा लावण्याचा सूर येत होता तिकडे तिने मान वळवून पाहिले. ती लकब इतकी बालगंधर्वांच्यासारखी होती की, ज्यांनी बालगंधर्व पाहिले होते त्यांना त्याक्षणी बालगंधर्व आठवले. झालेल्या या भासाने आम्हाला गोड धक्का दिला. आता आपण बालगंधर्वांचेच गाणे ऐकणार आहोत या भावनेनं आमचे कान ऐकू लागले.

एकोणीसशेचौतीस साली गंधर्व नाटकमंडळी विसर्जित झाली. त्यानंतरच्या काळात, महाराष्ट्रातील अनेक रसिक श्रोते याच भासावर जगत होते त्याची मला आठवण झाली. मी कल्याण शहरातील हकीगत सांगतोय. तिथे घरोघरी नाटचसंगीत ऐकू येत असे व एक घराआड तबलापेटी होती, याचे श्रेय तेथील कै. काका बर्वे या गृहस्थांना जाते. गायनसमाज ही संस्था काढून त्यांनी नाटचसंगीतप्रेमी एकत्र आणले. तेथील श्रोते गाणे ऐकण्यात इतके जाणकार झाले की, मला एक मोठ्ठी गायिका म्हणाली की, कल्याणच्या गायनसमाजात गावयास यावयाचे म्हणजे भीती वाटते. जरा बेसूर झालं की, दोनशे माना नाराजीनं हलतात.

या कल्याणात पूर्वी 'संत तुकाराम' नावाचे नाटकाचे थिएटर होते. एकोणीसशेछत्तीसएक सालानंतर नाटकांना असा दुर्धर काळ आला की, कल्याणला नाटककंपनीने यावे आणि प्रेक्षकांअभावी तोटचात येऊन पडदे विकून पळून जावे. जणू कल्याण हा खडक झाला होता व प्रत्येक नाटककंपनीचे तारू त्यावर येऊन फुटत होते; पण असे असूनही कल्याणचे काही रसिक श्रोते एकही नाटक– विशेषतः जे नाटक गंधर्व कंपनी करीत असे– बुडवीत नसत. ही मंडळी दोन आण्यांचे पिटाचे तिकीट काढीत व घरची पोती बसावयास घेऊन जात. नाटक सुरू होई. मग भामिनी, रेवती, सुभद्रा, रुक्मिणी, सिंधु वगैरे जो कुणी नट झाला असेल त्याचे काम बालगंधर्वांच्या पूर्वी पाहिलेल्या त्या त्या कामाशी ताडून पाहणे सुरू होई. 'गंधर्व इथे काय तान घ्यावयाचा ! गंधर्व इथे कशी गोड मान वेळवावयाचा ! इथे गंधर्व कसा लाजायचा !' वगैरे. हे करीत आपण गंधर्वांचेच नाटक पहात आहोत अशा समाधानात ते असत.

◻

पुण्यातील भरत नाटचमंदिराच्या वरच्या छोटचा सभागृहात दि. १५ जुलै १९७९ रोजी बालगंधर्व यांचा स्मृतिदिन साजरा होत होता. तिथे प्रथम अरविंद मंगळूरकर यांचे बालगंधर्वांच्या स्मृतिपर भाषण झाले व नंतर बालगंधर्वांच्या कन्या, सौ. नलिनी वाबळे यांनी आपल्या पित्याची चार गाणी म्हटली.

जिना चढून वर येताच साधारण चौरस असा हा दिवाणखाना आहे. समोरच्या भिंतीशी गुडघाभर उंच व्यासपीठ केले आहे व व्यासपीठाच्या बाजूस तात्पुरत्या पार्टीशनची एक खोली आहे. हॉलमध्ये शिरून पाचदहा पावले पुढे येताच उजव्या हातास पैठणी, पागोटी, बंडचा व अंगरखे घातलेले, लांब लांब उपरणी खांद्यावर व गळयाभोवती लपेटलेले सर्व चंद्रकोरटिळा वगैरे सर्व आकारांची गंधे लावलेले, ज्यांच्या मिशा एकमेकांशी चढाओढ करीत आहेत असे, विष्णुपंत भावे, देवल, अण्णासाहेब किर्लोस्कर, कोल्हटकर, ह. ना. आपटे, गणपतराव जोशी वगैरे नाटकाच्या छंदातील प्राचीन पुरुष, तसबिऱ्यांतून टांगले आहेत. तसेच पुढे स्टेजपर्यंत गेले की, त्याच भिंतीला आधुनिक काळातले, बिनमिशांचे, बोडके, नाजुक दिसणारे, बिन उपरण्यांचे, बिन पागोटचांचे असे पंचवीस एक नवे नट–नाटककार टांगलेले दिसतील. असे वाटते की, या बिनमिशांच्या पिढचांकडे, मागच्या पिढीतील मिशावाले रोखून पहात आहेत, 'अरे ! तुम्ही काय नाटकं लिहावी आणि सोंगं घ्यावी? तुम्हाला लाऊडस्पीकर लागतो, गाणे कशाशी खातात हे कळत नाही. एक वन्समोअर तरी तुम्हाला झेपेल का ? प्रकाशयोजनेवर आणि नेपथ्यावर तुमची नाटके चालतात. खडकावर नाटके रंगली पाहिजेत. तुमची नाटके रात्री बारालाच पेंगू लागतात. तुमच्या सगळचा नाटकांची प्रयोगसंख्या आमच्या एका संशयकल्लोळ नाटकाच्या प्रयोगसंख्येहून निम्मी तरी भरेल ?

◻

या समारंभाचा आरंभ अरविंद मंगरूळकरांच्या व्याख्यानाने झाला. ते म्हणाले,

'बालगंधर्वांचा प्रभाव इतका विलक्षण की, ती धुंदी ओसरू नये.

'इतिहासाचार्य राजवाडे यांनी १९२० साली एकशेपन्नास कर्त्या व्यक्तींची यादी केली. त्यात बालगंधर्वांचे नाव होते. पुढे

पृष्ठ २८ वर

हिरवळीवर सशांच्या सहवासात चंद्रशेखर यांची आम्ही वाट पहात बसतो. थोड्याच वेळात चंद्रशेखर येतात. शिडशिडीत बांधा, पांढरा झब्बा व धोतर हा नेहमीचा पोषाख. देशावर राज्य करणाऱ्या पक्षाचा अध्यक्ष असूनही वागणं अगदी साधं, आढ्यता अजिबात नाही. सगळं अगदी कॅज्युअल.

आल्याआल्याच ते विचारतात, "काय घेणार? थंड की गरम?"

"सध्या जे राजकीय वातावरण आहे त्याला अनुकूल असं मागवा."

"अरे भाई, ठंडा लाव." ते आज्ञा सोडतात.

राजकीय वातावरण गरमागरम नाही हेच त्यांना सुचवायचं असतं.

कोणीतरी विचारतं, "रोगी वाचणार की नाही?"

"रोगी मरणार नाही. पण ऑपरेशन करावं लागेल...."

ज्या राजकीय भूकंपामुळे सारा देशच हादरून गेला त्या काळात घडलेला हा एक संवाद.

असे अनेक संवाद, दैनंदिन प्रसंगांचे बारकावे, क्षणाक्षणाचे नाट्य.

एक जिवंत आलेख. जितका रोचक तितकाच विचारी मनाला सुन्न करणारा....

# तख्त भंगले!

## राजकीय झंझावातात सापडलेली दिल्ली!

लेखक : मंदार फडके

### नऊ जुलै

एखाद्या प्रचंड भट्टीसारखी दिल्ली तापलेली. ऊन केवळ बाहेरून चटका देणारं नव्हे तर आपल्या अंगात शिरून भाजवणारं. वाऱ्याचा पत्ता नाही. एखादी झुळूक अधूनमधून येते; पण तीही उष्णच. आदल्या दिवशी साडेचेचाळीस सेंटिग्रेड तपमान होतं. आज ते आणखी वाढणार की काय अशी भीती होती; पण ऋतुचक्र बदलणार होतं– सत्ताचक्रही तेव्हाच बदलेल असं वाटलं नव्हतं.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला त्याच दिवसापासून आरंभ व्हायचा होता. जनता पक्षापेक्षा इंदिरा काँग्रेस पक्षातल्या दुफळीकडे पत्रकारांचं अधिक लक्ष होतं. काँग्रेस पक्षांचे संख्याबळ वाढून यशवंतराव चव्हाण विरोधी पक्षनेते होणार हे स्पष्ट झालं होतं. देवराज अरस इंदिरा काँग्रेसला किती भगदाड पाडू शकतील याचे अंदाज वर्तवले जात होते; परंतु त्याच वेळेला जनता पक्षाचा बुरूज ढासळण्याची प्रक्रिया आकार घेत होती याची फारशी कल्पना आली नव्हती.

नऊ जुलैला संसदेचं अधिवेशन बरोबर अकरा वाजता सुरू झालं. त्याच वेळेला बाहेर ऊष्मा कमी होत होता. वारा वाहू लागला होता. झाडांची पानं डोलू लागली होती. आकाश धूसर बनलं होतं. एकाएकी ढगांची साठमारी सुरू झाली. गर्जेल तो पडेल काय, ही उक्ती खोटी ठरून गर्जणारे ढग कोसळू लागले. बाहेर गारवा आला; पण लोकसभेतलं वातावरण मात्र तापू लागलं होतं. प्रश्नोत्तराचा तास सुरू होण्याआधीच पोलिस आंदोलन प्रकरणावरून गडबड उडाली

होती. त्यात भर पडली ती जनता पक्षाच्या दहा सदस्यांनी पक्ष सोडण्याची. राजनारायण हिरवा फेटा बांधतात त्या दिवशी मणिराम बागडीही हिरवा फेटा बांधून आले होते. बाहेर पडलेल्या दहा जणांत त्यांचं नाव पहिलं होतं, त्याशिवाय सुशील धारा, ब्रिजभूषण तिवारी, रामधारी शास्त्री, हरिराम चौधरी, मोहिंदरसिंग लाथर, हरगोविंद वर्मा, मनोहरलाल सैनी, चंद्रशेखर सिंग व अनंतराम जयस्वाल हे नऊजण होते. या दहांपैकी पाच उत्तरप्रदेशचे होते, माजी संयुक्त समाजवादी पक्षाचे होते, तीन हरियानाचे होते व दोघे देवीलाल यांचे चेले होते. हे दहाजण जनता (एस– म्हणजे सेक्युलर) असं स्वतःला म्हणवून घेत होते. नेहमीची तिसऱ्या बाकावरची आपली जागा सोडून पाचव्या बाकावर राजनारायण जाऊन बसले होते. या दहा खेरीज अमृत नाहटा (किस्सा कुर्सीका हा चित्रपट दूरदर्शनवर न दाखवल्याने संतापलेले) व अब्दुल लतीफ हे दोघे जनतासदस्य काँग्रेसमध्ये सामील झाले होते. लोकसभेची सदस्यसंख्या ५४३ आहे. पाच जागा खाली असल्याने सध्याची सदस्यसंख्या ५३८ आहे. त्यापैकी जनता पक्षाचे संख्याबळ ३०१ होते. या राजीनाम्यांमुळे ते २८८ वर आले. म्हणजे निर्विवाद बहुमतापेक्षा ते सतराने अधिक होते. त्यामुळं या सदस्यांनी पक्ष सोडला तरी त्याची फारशी गंभीर दखल कोणी घेतली नाही. जनता पक्षाच्या धरणाला छिद्र पडलं होतं व त्याचं लौकरच पानशेत होईल याची कल्पना खुद्द जनता पक्षाच्या नेत्यांना नव्हती.

पक्षात असंतोष खदखदत होता आणि बाहेरून जनता सरकारवर अविश्वासाच्या ठरावाचं संकट येऊ घातलेलं होतं. अविश्वास ठराव हा नेहमीचा उपचार झाला. तो काय सहज फेटाळला जाईल असा जनता पक्षीयांना विश्वास होता; पण कोठलाही अंदाज चुकण्याचेच ते दिवस होते. ९ जुलैलाच उद्योगमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी सायंकाळी पाच वाजता पत्रकार परिषद बोलावली होती. ७ व ८ जुलैला झालेल्या माजी समाजवाद्यांच्या अधिवेशनाचे निष्कर्ष त्यांना सांगायचे होते. पक्षातच राहून लढण्याचा निर्धार फर्नांडिस यांनी त्या वेळी घोषित केला. जनता पक्षाचे काही खासदार पक्षातून बाहेर पडले आहेत, त्याबद्दल प्रतिक्रिया विचारता ते म्हणाले,' मला ठाऊक नाही; पण खरंच राजीनामे दिले असतील तर ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे !'

असं म्हणणारे फर्नांडिस अवघ्या सहा दिवसांत स्वतःच पक्षातून बाहेर पडले ! खरंच दिवस अंदाज चुकण्याचेच होते.

त्यादिवशी फक्त राजनारायण यांच्या नऊ रेसकोर्सरोड या निवासस्थानावर गडबड होती. त्यांच्या दहा खासदारांचं खलबत चालू होतं. खरं तर सारा प्लॅन ठरला होता. चरणसिंग सारी सूत्रं पडद्यामागून हलवीत होते. चरणसिंग यांनी काही दिवसांपूर्वीच राजनारायण यांच्याशी आपले संबंध संपले असं जाहीर केलं होतं ; पण ते केवळ धूळफेक करण्यासाठी. चरणसिंग पहिल्यापासूनच मोरारजीभाईंवर नाराज होते. चंद्रशेखरांवर संतापलेले होते. तशात उत्तरप्रदेश, बिहार आणि शेवटी हरियाना या तीन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना चरणसिंग यांच्या इच्छेविरुद्ध जावं लागलं होतं. हे तिघेही चरणसिंगांचे निकटवर्ती सरदार होते. त्यांच्या राज्यात थोड्या आमदारांनी मागणी केली तरीही विधिमंडळ पक्षाचा विश्वास अजमावून दाखवा असे आदेश जनता पार्लमेंटरी बोर्डाने दिले होते. राजस्थानात मात्र शेखावत यांच्याविरुद्ध पन्नासहून अधिक आमदारांनी मागणी केली तरी त्यांना विधिमंडळपक्षात विश्वास संपादन करून दाखवण्यास सांगितलं गेलं नव्हतं. चरणसिंग प्रक्षुब्ध झाले होते. सूडाच्या भावनेनं पछाडलेले होते. हरियानाचे मुख्यमंत्री देवीलाल यांना त्यांच्या पदावरून जेव्हा जावं लागलं तेव्हा मात्र चरणसिंगांना वाटलं आता हद्द झाली. मोरारजीभाईंना खाली खेचलंच पाहिजे. पक्षातून बाहेर पडायची योजना साकारू लागली. भालोदगटाने एकदम एकाच दिवशी राजीनामे द्यायचे नाहीत. राजनारायण बाहेर पडलेच होते. चरणसिंगांनी सर्वांत शेवटी बाहेर पडायचं असं ठरलं होतं.

बेत ठरला होता. आता फक्त 'ऑपरेशन डिफेक्शन' सुरू झालं होतं.

पहिल्या दिवशी कोणीच हे फारसं सीरियसली घेतलं नाही. स्कायलॅब भारतावर कोसळली तर काय याचीच चर्चा होत होती; पण राजनारायण लोकशाही यानातून प्रवास करणारी जनता स्कायलॅब कोसळवण्याच्या उद्योगात गुंतले होते. याचा कोणी फारसा विचार करत नव्हतं.

हवा पालटली होती.

राजकीय आंधीच्या उंबरठ्याकडे प्रवास सुरू झाला होता.

## दहा जुलै

दहा जुलैचा सूर्य उगवला तो जनता सरकारचा सूर्य मावळण्याची अशुभ सूचना घेऊनच. 'स्कायलॅब क्लोज टू क्लायमॅक्स' असे मथळे वर्तमानपत्रांत झळकले होते. राजनारायणगटानं दुसरी तोफ डागली होती. आणखी चौदा जनता खासदारांनी पक्ष सोडला होता. त्यामुळं जनता पक्षाकडे निर्विवाद बहुमतापेक्षा अवघे तीनच सदस्य जास्त होते. आता मात्र परिस्थितीचं गांभीर्य नेत्यांना जाणवू लागलं. राजनारायणला कधीही शत्रू करू नये असं महाराष्ट्राचा एक ज्येष्ठ नेता पूर्वीच म्हणाला होता, त्याची सत्यता पटायला लागली होती. आणीबाणीच्या काळात एकोणीस महिने तुरुंगात राहून, भूमिगत चळवळ चालवून मिळवलेलं दुसरं स्वातंत्र्य गमावण्याची घाई झाली होती. आपल्याला निवडून देणाऱ्या जनतेची कोणालाच पर्वा नव्हती.

जनता पक्षावर पक्ष सोडून जाणाऱ्यांची टांगती तलवार होती. त्याचबरोबर काँग्रेस पक्षाच्या अविश्वासाच्या ठरावाचीही दुसरी टांगती तलवार होती. कालच यशवंतराव चव्हाण यांची विरोधी पक्षनेतेपदी पुन्हा निवड झाली होती. विरोधीपक्षनेता म्हणजे त्याला मंत्र्याचाच दर्जा. बऱ्याच दिवसांनी पुन्हा चव्हाणांच्या १, रेसकोर्स रोड या निवासस्थानी गर्दी होऊ लागली. दिल्लीला सगळीकडं गोलाकार ट्रॅफिक आयलंडस आहेत. अशाच एका गोलाकार वाहतूकबेटापासून अकबररोड, सफदरजंगरोड, रेसकोर्सरोड सुरू होतात. १ सफदरजंगरोड या पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोरच रेसकोर्स-

रोड सुरू होतो. तेथला पहिलाच बंगला यशवंतराव चव्हाणांचा आणि तेथून चौथा बंगला ( ९ रेसकोर्सरोड ) राजनारायण यांचा. दिल्लीतलं राजकारणही वाहतूकबेटासारखंच गोल-गोल. १ सफदरजंगरोड या सत्ताकेन्द्रावर १ रेसकोर्सरोड येथून अविश्वास ठरावाची तोफ डागण्याची तयारी सुरू, तर ९ रेसकोर्सरोड येथून सत्ताकेन्द्राला सुरुंग लावण्याचे उद्योग जारात चालू. अविश्वासाचा ठराव मांडण्याला चव्हाण फारसे उत्सुक नव्हते; परंतु त्यांच्या संसदीय पक्षाच्या कार्यकारिणीनं असा अविश्वासाचा ठराव मांडावा असा आपल्या बैठकीत ठराव करून आदेश दिलेला. जनता पक्षाला खिंडार पडेल आणि एरवी फेटाळला जाणारच असा ठराव मंजूर होण्याची जबर चिन्हं दिसू लागणार याची चव्हाणांना कल्पनाच नव्हती.

काँग्रेसला सगळं आयतंच मिळणार आहे याचा वासदेखील आला नव्हता. काँग्रेसचे अध्यक्ष स्वर्णसिंग यांना मात्र तसं वाटत असावं. युवक काँग्रेसचे काही पदाधिकारी त्यांना ३ रायसीनारोडवरील काँग्रेसकार्यालयात जाऊन काही दिवसांपूर्वी भेटले होते. या कार्यालयाच्या प्रांगणात एक झाड आहे. जेव्हा उभय काँग्रेसपक्षांचं ऐक्य करायचं नाही असा निर्णय कार्यकारिणीनं घेतला तेव्हा या झाडावर एकही पान नव्हतं. तो निष्पर्ण वृक्ष, ते जुनाट रंगहीन कार्यालय ही पक्षाच्या स्थितीची साक्ष देणारी होती; परंतु आज मात्र त्या झाडाला पालवी फुटलेली होती. युवककार्यकर्ते जरा टेचातच होते. पक्ष निष्क्रिय झालाय, तुम्ही देशभर दौरे काढत नाही, पक्षात चैतन्य आणत नाही असं कार्यकर्ते स्वर्णसिंगांना म्हणत होते. स्वर्णसिंग ही अजब वल्ली. डोकं तिरपागडंच ! बोलायला सुरुवात केली की, उगाच लांबण लावत बसायची सवय. त्या दिवशी मात्र त्यांनी हाताचं बोट गोल फिरवीत ढवळण्याची कृती सूचित केली. युवक काँग्रेसकार्यकर्त्यांना त्यांचे हे विनोबापद्धतीचं वर्तन समजेना. त्यांनी विचारलं, 'म्हणजे काय ?'

सरदारजी म्हणाले, 'काही देशभर दौरे काढायची गरज नाही ! इंदिरा काँग्रेसकडून चहाची पूड येईल, जनता पक्षाकडून दूध येईल, उजव्या कम्युनिस्टांकडून साखर मिळेल, कोणी तरी गरम पाणी व कपबशी देईल. आपण फक्त चमच्यानं चहा ढवळायचा आणि प्यायचा !'

खराखरच तशी पाळी आली होती. काँग्रेसकडं सारं आयतं चालून मेणार होतं.

□

जनता पक्षात सुरू झालेल्या राजिनामासत्राचे बोलविता धनी चरणसिंग आहेत हे मोरारजीभाई ओळखून होते. त्यांनी चरणसिंग यांना फोन लावला. उद्या सभागृहात अविश्वासाचा ठराव येईल तेव्हा सरकारचं समर्थन करणारं व त्या ठरावाला विरोध करणारं भाषण तुम्ही करा असं पंतप्रधानांनी त्यांना सांगितलं; परंतु चरणसिंग गुळमुळीत उत्तर देऊ लागले. निश्चित काही सांगेनात.

अविश्वास-ठरावाला विरोध करणारं भाषण चरणसिंग करणं शक्यच नव्हतं. पक्षातून बाहेर पडलेले त्यांचे चेले राजनारायण ठरावाला पाठिंबा देणारे आणि गुरु मात्र विरोध करणार हे घडणं अशक्य कोटीतलं होतं. चरणसिंग बाहेर पडणारच होते. प्रश्न होता टायमिंगचा. रोज एक टाइमबाँब राजनारायण लावत होते आणि चरणसिंग यांचा अॅटमबाँब शेवटी लावायचा होता. चरणसिंगांच्या पत्नी गायत्रीदेवी यांचा चरणसिंगांनी सरकारमधून मंत्रिपदाचा राजीनामा देऊन बाहेर पडण्यास विरोध होता. गायत्रीदेवींना 'माताजी' म्हणतात. या माताजींची आपल्या पतीवर हुकुमत आहे. मंत्रिपद गेलं की काय वाताहत होते याचा कटु अनुभव त्यांनी सात महिने घेतला होता. त्यामुळं त्यांना हे नको होतं. त्यांच्या मतामुळं माजी भालोद गटात दोन तट पडले होते. राजनारायण यांचा जहाल गट तर माताजींचा मवाळ गट. मवाळ गट ऐकेना तेव्हा जहाल गटानं पक्ष सोडण्याच्या कारवाईचा प्लॅन अंमलात आणायचं ठरवलं. चरणसिंग सुरुवातीला नाराज असले तरी ते राजी झाले. पक्षाचे भालदार, चोपदार निघाले. सैन्यही निघालं. मेजर, कर्नल, लेफ्टनंट कर्नल आदि अधिकारीही निघाले. मग फील्डमार्शलना निघावंच लागेल असं काहीजण म्हणत होते. याचा अर्थ चरणसिंग यांच्यावर राजनारायण व त्यांच्याबरोबर बाहेर पडलेले सदस्य दबाव आणणार व मग ते बाहेर पडणार असा होत होता. हे खरं नव्हतं. चरणसिंगांची या सर्व प्रकाराला पहिल्यापासूनच फूस होती.

दुसऱ्या बाजूला अविश्वाच्या ठरावाच्या नौबती वाजू लागल्या होत्या. राजनारायण यांनी चव्हाणांची भेट घेऊन दहा-बारा दिवस ठराव पुढे ढकला अशी विनंती केली होती; परंतु आता ते शक्य नव्हते. ठरावाची नोटीसही दिली गेली होती. दुसऱ्या दिवशी ठराव चर्चेला यायचा होता. इंदिरा काँग्रेसची अवस्था सुरुवातीला विचित्र झाली होती. त्यांच्या कार्यकारणाची सकाळी बैठक झाली. काँग्रेसच्या ठरावाला पाठिंबा दिला आणि खराखरच ठराव मंजूर झाला तरी काही आपल्या पक्षाचं सरकार येणार नाही. तेव्हा कशाला पाठिंबा द्या? असं बऱ्याचजणांचं मत होतं. इंदिरा काँग्रेस पाठिंबा देणार नाही अशी बातमी संसदभवनाच्या परिसरात पसरली; पण मग उलटी चक्रं फिरू लागली. पाठिंबा द्यायचं ठरलं आणि दोन तासात लोकसभेतील इंदिरा काँग्रेसचे नेते सी. एम्. स्टीफन यांचं तसं एक पत्रकही बाहेर आलं. पुन्हा इंदिरा काँग्रेसची बैठक झाली होती. या बैठकीत ठरावाला जवळजवळ निम्म्या सदस्यांनी विरोध करावा असं मत प्रकट केलं. अवघ्या दोघांच्या बहुमतानं ठरावाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला गेला; परंतु आम्ही एकमतानं, बिनविरोध हा निर्णय घेतला असं पत्रकार परिषदेत सांगितलं गेलं.

जनता पक्षाला गळती लागली आहे, ती वाढतच राहणार याची जाणीव होऊ लागली होती. बापू काळदाते ( माजी समाजवादी ) यांनी अमेरिकेला गेलेल्या श्रीमती मृणाल गोरे यांचा तपास चालविला. लंडनला असलेले भारताचे ब्रिटनमधील हायकमिशनर नानासाहेब यांनाही निरोप गेला. दोघही गोरे भारताकडे निघाले. समाजवादीपक्षाच्या नेत्यांनी ७ व ८ जुलै रोजी एक अधिवेशन घेऊन जनता पक्षातच राहण्याचा निर्णय घेतला होता; परंतु तो टिकण्याची चिन्हं नाहीत याची चाहूल लागली होती. दंडवते, लिमये व फर्नांडिस असे तीन वेगवेगळे मतप्रवाह आहेत हे स्पष्ट होऊ लागलं होतं.

१० जुलैला राजधानीतली हवा मात्र थंड होती. पाऊस पडत होता. राजकीय उष्मा मात्र कळस गाठणार अशी शंका येत होती. पक्षातून भालोदगट बाहेर पडताय, ही घाण जायलाच हवी होती, केव्हा तरी ही शॉकट्रीटमेंट पक्षाला मिळायला पाहिजे होती असं

एकानं म्हणताच मधु दंडवते म्हणाले, ' तुमचं सायन्स जरा कच्चं दिसतंय. ही शॉकट्रीटमेंट कसली ? हे शॉर्ट-सर्किट आहे ! '

११ जुलैचा सूर्य काळोखाची किरणं घेऊनच उगवणार होता.

## अकरा जुलै

घडलं तसंच. आज स्कायलॅब पडणार होती. रात्री ती ऑस्ट्रेलियाजवळ हिंदी महासागरात पडल्याची बातमी आली आणि लोकांनी सुटकेचा निःश्वास टाकला. जनता सरकारची स्कायलॅबही स्थैर्याच्या स्थानकावरून सुटली होती. डिफेक्शन कंट्रोल सेंटरचे संचालक राजनारायण छातीठोकपणे सरकारची स्कायलॅब कधी कोसळणार याची नेमकी वेळ सांगत होते.

आज आणखी वीस खासदार जनता पक्ष सोडून राजनारायण यांच्या गटात सामील झाले. राजनारायण यांच्या घरी लोहिया याचं एक वचन लावलं आहे– ' सुधरो या टूटो ' –आपल्या गुरूचं हे वचन राजनारायण तंतोतंत अंमलात आणत होते. पक्षाच्या पतनाचा त्यांना आनंद होत होता. विनाशाचे स्वामी राजनारायण यांना सगळीच घाई. नव्या सरकारची स्वप्नं त्यांना पडू लागली. त्यांनी थेट राष्ट्रपतिभवन गाठलं. ' मिलिटण्ट हिंदुइझम इन इंडियन पॉलिटिक्स ' (लेखक–जे. ए. कुरान ज्युनि., प्रस्तावना राजनारायण) आणि ' द बालसुब्रह्मण्यम केस ' ही दोन पुस्तकं त्यांनी राष्ट्रपतींना दिली. अविश्वासाच्या ठरावावर सोमवारी १६ जुलैला मतदान व्हायचं होतं. त्या दिवशी सरकार पडलं की, आपल्याला पर्यायी सरकार स्थापन करायला बोलवा, असं राजनारायण यांनी राष्ट्रपतींना सांगितलं आणि विजयी मुद्रेनं राजनारायण लोकसभेत आले.

संसदभवनाच्या परिसराचा कबजा अनिश्चिततेनं घेतला होता. सरकार मृत्युपंथाला लागलं होतं. संसदभवनाची ती शानदार गोल इमारत, तिचे ते असंख्य गोलाकार खांब, भवनाच्या परिसरातली कारंजी या साऱ्यांची भव्यता आज झाकोळून गेली होती. विचित्र सुन्नता हलके हलके त्या वास्तूलाही घेरून टाकत होती. अकरा वाजायला आले होते. सभागृहाच्या बैठकीची सूचना देणारी घंटा निनादली. सभापती सभागृहाकडे निघाले. बरोबर अकराच्या ठोक्याला त्यांनी आत प्रवेश केला. विरोधी पक्षाचे नेते बनलेले चव्हाण सत्तारूढ पक्षाच्या समोरच्या बाकावरील पहिल्या आसनावर बसलेले. प्रश्नोत्तरं संपली. झिरोअवरमधली गडबड शांत झाली व चव्हाण अविश्वासाचा ठराव मांडायला उठले. ऐतिहासिक क्षण येऊन ठेपला. उत्सुकता आणि अनिश्चितता अशा संमिश्र भावना मनात बाळगून प्रेक्षकांच्या गॅलरीतून सारे एकाग्र चित्त करून पहात होते.

सभापतींनी अविश्वासाच्या ठरावावरील चर्चेला पंधरा तास दिले जातील असं आधी जाहीर केलं. या ठरावावरील चर्चेच्या दिवशी नेहमीप्रमाणं जेवणाची सुटी घेतली जाईल, शक्यतो रोज सायंकाळी सहा वाजता बैठकीचं कामकाज तहकूब करायचं आदि तपशीलही त्यांनी जाहीर केला.

आणि यशवंतराव चव्हाण उभे राहिले. त्यांचं पहिलंच वाक्य होतं–

' Sir, I beg to move :

' That this house expresses its want of confidence in the Council of Ministers ! '

' हा ठराव मांडताना मी राष्ट्रीय कर्तव्य करतो आहे. हे काही आनंददायी काम नाही; पण राष्ट्रीय कर्तव्य आहे. केवळ एक उपचार किंवा संसदीय डावपेच म्हणून आम्ही हे करत नाही. कोणा व्यक्तीबद्दल अथवा गटाबद्दल नाराजी म्हणून नाही तर देशातील स्थितीच अशी आहे की, त्याकरिता मी हा ठराव मांडतो आहे ' असं सूतोवाच चव्हाण यांनी केलं. देशात कसा पेचप्रसंग निर्माण झाला आहे हे त्यांनी विशद केलं. परराष्ट्रधोरण हा काही माझ्या ठरावाचा पाया नाही हे स्पष्ट केलं. देशाची घसरत चाललेली अर्थव्यवस्था, पोलिस-आंदोलन, मंत्रिमंडळात सहकार्याचा अभाव आदी बाबींचा उल्लेख करून ते म्हणाले, ' सरकार जर देशाला नेतृत्व देऊ शकत नसेल तर ते सरकार गेलं पाहिजे. '

चव्हाण यांचं भाषण अभ्यासपूर्ण होतं; पण त्यात फारसा जोश नव्हता. त्यांचं भाषण कोमट वाटलं असं एक खासदार म्हणाला, ते पटणारं होतं. सी. एम. स्टीफन यांचं भाषण नेहमीप्रमाणंच आक्रस्ताळं होतं. त्यांनी ' क्रिमिनल गव्हर्नमेंट ' असं या सरकारचं वर्णन केलं. गौरीशंकर राय, कंवरलाल गुप्त, राजनारायण गटात सामील झालेले व कल्याण जैन, दिलीप चक्रवर्ती, समर मुकर्जी, मुरली मनोहर जोशी प्रभृतींची भाषणं झाली. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी ' हे सरकार ' नाही, ही ' सर्कस ' आहे,असा शेरा मारला

सभागृहात ही भाषणं चालू असताना संसदभवनाच्या परिसरात, सेंट्रल हॉलमध्ये चर्चेला ऊत आला होता. अविश्वासाचा ठराव मंजूर होईल की फेटाळला जाईल याबद्दल नाना तर्क-कुतर्क वर्तवले जात होते. जनता पक्षाचं निर्विवाद बहुमत संपुष्टात आलं होतं. त्या दिवशी पक्षवार बलाबल असं होतं–

| | |
|---|---|
| जनता पक्ष | २५५ |
| राजनारायण गट (जनता–एस.) | ४५ |
| अकाली | ९ |
| कम्यु. (मार्क्स.) | २२ |
| कम्युनिस्ट | ७ |
| अण्णा द्र. मु. क. | १८ |
| कॉंग्रेस | ७६ |
| इंदिरा कॉंग्रेस | ७० |
| शे. का. पक्ष | ६ |
| क्रांतिकारी समाजवादी पक्ष | ४ |
| रिपब्लिकन (खोब्रागडे) | २ |
| फॉर्वर्ड ब्लॉक | ३ |
| केरळ कॉंग्रेस | २ |
| मुस्लिम लीग | २ |
| नॅशनल कॉन्फरन्स | २ |
| अपक्ष | १५ |
| रिकाम्या जागा | ५ |

पक्षाध्यक्ष चंद्रशेखर चरणसिंग यांना जाऊन भेटले होते. चरणसिंग यांनी हे सगळं का घडलं याची कारणं त्यांना ऐकवली. मधु लिमये यांनी त्याच दिवशी पत्रकार परिषद घेतली, जातीयवादी व हुकुमशाही शक्तींना बाजूला ठेवून 'ट्रान्स-पार्टी' तोडगा काढावा असा विचार त्यांनी मांडला.

या सगळ्या घडामोडींमुळे अनिश्चितता क्षणोक्षणी वाढत होती. राजिनाम्यांच्या अफवांचं उदंड पीक आलं होतं. चरणसिंग, बहुगुणा, रवी रे यांनी राजिनामे दिले ही अफवा जोरात होती. सगळाच गोंधळ होता. या सबंध पेचप्रसंगात पंतप्रधान मोरारजी देसाई अविचल (unruffled) आहेत असं त्यांचे एक निकटवर्ती व जनता संसदीय पक्षाचे चिटणीस मुरली मनोहर जोशी यांनी आदल्या दिवशी पत्रकारांना सांगितलं होतं; पण आज परिस्थिती बदलली होती. तेव्हा त्यांना भेटू या अशी कल्पना निघाली. संसदभवनाच्या त्यांच्या कार्यालयातच पत्रकार त्यांना भेटायला गेले. पत्रकार त्यांच्या कार्यालयात शिरले तेव्हा देसाईंचा मूड चांगला होता, हे त्यांनी 'कोणीही फोटोग्राफर कसा नाही?' असं विचारलं तेव्हाच ध्यानात आलं पण 'मी कोणत्याही प्रश्नाला उत्तर देणार नाही!' असं त्यांनी सांगून टाकलं. आता काय करायचं? तेव्हा एक पत्रकार त्यांना म्हणाला, 'आम्ही प्रश्न विचारायला आलो नाही. तुम्ही सध्याच्या पेचप्रसंगात अविचल आहात असं कळलं तेव्हा तुम्ही कसे अविचल आहात हे पाहयला आम्ही आलोय!'

हे ऐकताच मोरारजीभाईंची कळी खुलली. ते म्हणाले, 'इथं स्कायलॅब पडली तरी मी अविचल राहीन! जोरहाट इथं मी प्रवास करीत असलेलं विमान पडलं तेव्हा देखील मी असाच होतो. त्या वेळी देखील माझ्या नाडीचे ठोके वाढले नव्हते!'

अविश्वासाचा ठराव फेटाळला जाईल असंही ते म्हणाले. त्याचं कारण मात्र सांगायला त्यांनी नकार दिला. पक्षातील उलथापालथीला उद्देशून ते म्हणाले, 'हे आत्ताच घडतंय ते एका परीनं बरंच झालं. नंतर शांतता येईल!'

खरोखरच मोरारजीभाईंच्या चेहऱ्यावर कसल्याही काळजीची पुसटशी ही छटा नव्हती.

लोकसभेतले कोठले गट अविश्वासाच्या ठरवाच्या बाजूने उभे राहणार आणि कोठले राहणार नाहीत याचे अंदाज बांधले जात होते. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सरकारला पाठिंबा देण्याच्या मनःस्थितीत नाही हेही त्याच दिवशी स्पष्ट झाले.

चंद्रशेखर काहीसे काळजीत पडले होते. पक्षातील भांडण पक्षात मिटवू; पण अविश्वास ठराव आला असताना सर्वांनी एकत्र राहून त्याचा मुकाबला करावा असे प्रयत्न त्यांनी चालविले होते; परंतु त्यांच्या या प्रयत्नांना फारसं यश येत नव्हतं.

एका पंतप्रधानांचा पराभव करणारे राजनारायण दुसऱ्या पंतप्रधानांचा पराभव करणार असं बोललं जात होतं. जनता पक्षाची नौका राजिनाम्यांच्या लाटांच्या तडाख्यात सापडली होता. तासा-दोन तासापूर्वी जे जनता पक्षाचं बिरुद अभिमानानं मिरवीत होते तेच पक्षावर आगपाखड करत होते.

हा सारा प्रकारच अकल्पित होता. सुन्न करून टाकणारा होता. जनता पक्षातीलच माणसं पक्षाला क्रूसाकडे घेऊन चालली होती!

स्वार्थाच्या होमात पक्षाची आहुती दिली जात होती. राजधानीतली हवा आजही थंड होती. एकाएकी अंधारून आलं होतं. त्यामुळं चलबिचल वाढली होती. बेचैनी जास्तच अस्वस्थ बनवत होती. उद्याचा दिवस कोठली नवी संकटं घेऊन येणार आहे या चिंतेचं ओझं झोप येऊ देत नव्हतं.

राजनारायण, चरणसिंग, जगजीवनराम व चंद्रशेखर यांच्या घरी तर पहाटेपर्यंत दिवे जळतच होते. शांतता होती ती फक्त पंतप्रधानांच्या निवासस्थानी!

## बारा जुलै

तसे काल रात्री पर्यटनमंत्री पुरुषोत्तम कौशिक यांच्याही घरी दिवे जळतच होते. जॉर्ज फर्नांडिस, कौशिक यांनी राजिनामे द्यावेत असे मधु लिमयेंचं म्हणणं होत. माजी भालोदचे व चरणसिंगांचे विश्वासू व मधू लिमयेंचा सल्ला मानणारे रवि रे हेही बैठकीला होते. निर्णयापर्यंत अजून गाडी पोचली नव्हती.

१२ जुलैला सकाळीच लिमये यांच्या घरी वरच्या मजल्यावर बैठक पुढे चालू झाली. रवि रे, कौशिक होते. रवि रे यांनी राजिनामा द्यायचा असं ठरलं. लिमये यांचं घर पंडारारोडवर आहे. आणीबाणी यायला पर्यायाने कारणीभूत झालेले यशपाल कपूर समोरच राहतात. त्याच्या अलिकडे पलीकडे वसंतराव नाईक, ए. आर. अंतुले यांचे बंगले आहेत. लिमये यांच्या घरात अरुणा पुरोहित यांचं लोहशिल्प-युक्त एक चित्र आहे. एका कॅनव्हासवर मानवाच्या लोखंडाच्या छोट्याछोट्या आकृती वापरून 'मासेस'चा परिणाम तयार केला आहे. ७७ च्या निवडणुकीत जनतेने जनता पक्षाला निवडून दिले त्या मासेसचं हे प्रतीत. या आकृतींचे हात उभारलेले आहेत. त्यांच्या आशा-आकांक्षा व्यक्त करणारे ते हात. सध्या राजकीय धावपळ, गडबड इतकी चाललेली की मतदार जनतेकडे पहायची कोणाला फुरसद नाही, आठवणही नाही. तेव्हा त्यांचं प्रतीक असलेल्या या सुंदर चित्राकडं कोण पाहतो! त्या क्षणी तर सारी जनता हीच त्या चित्राची प्रतीक वाटते. मूक झालेली.

संसदभवनात मंत्र्यांच्या राजिनाम्याची बातमी अगदी दरवानापासून ते मंत्र्यापर्यंत सर्वजण सांगत असतात. आरोग्यमंत्री रवि रे, माहिती व नभोवाणीखात्याचे राज्यमंत्री जगवीर सिंग व उर्जाखात्याचे राज्यमंत्री जनेश्वर मिश्रा या तिघांनी राजिनामे दिलेले असतात. वृत्तसंस्थांचे टेलिप्रिंटर्स धडधडू लागतात. वार्ताहर दिसेल त्या फोनपाशी जाऊन बातमी पाठवू लागतात. राजिनामासत्रात सामील झालेले हे पहिले तीन मंत्री. त्यातला एक कॅबिनेट दर्जाचा. जनता पक्ष ला छिद्र पडलेलं नाही तर भगदाड पडू लागलेलं आहे याचंच ते द्योतक असतं. आता निश्चितता देखील अनिश्चितता आहे असं वाटू लागलेलं असतं. तीन मंत्र्यांबरोबर आणखी सहा खासदार जनता पक्ष सोडून राजनारायणगटात दाखल झालेले असतात. जनता पक्षाचे संख्या...

काल २५५ होते ते आज २४६ वर आलेले असते.

आज अविश्वास ठरावावरील चर्चेचा दुसरा दिवस असतो. संसदेतल्या विरोधकांचा तिसरा मोठा गट आता जनता (एस) बनलेला असतो. त्याचे नेते राजनारायण आज विरोधकांच्या बाकावर येऊन बसलेले असतात. एका बाकावर यशवंतराव चव्हाण, शेजारच्या बाकावर वसंत साठे (इंदिरा काँग्रेस) बसलेले असतात. त्यांच्या शेजारी हिरवी टोपी घातलेले राजनारायण व त्यांच्याशेजारी सी. एम. स्टीफन बसलेले. ज्या इंदिरा काँग्रेसवर राजनारायण यांनी कडाडून टीका केली त्या इंदिरा काँग्रेसपक्षाच्या सदस्यात बसलेले राजनारायण पाहताना गंमत वाटते. राजनारायण सर्व तयारीनिशी आलेले असतात. बरोबर बारा वाजून वीस मिनिटांनी ते भाषण करायला उठतात. फाइल उघडतात आणि त्यातून एक पुस्तिका काढतात. ही पुस्तिका गुजराती भाषेत असते. त्यामुळं तिचं नाव राजनारायण यांना वाचता येत नाही. मागच्याच बाकावर जनता-पक्षातून नुकतेच काँग्रेसमध्ये दाखल झालेले अमृत नाहटा बसलेले असतात. ते लगेच राजनारायण यांच्या मदतीला धावतात. त्यांनी सांगितलं तसं पुस्तिकेचं नाव राजनारायण वाचून दाखवतात. ते असतं :– " आछे मोरारजी देसाई !"

" यह हैं मोरारजी देसाई "

" मी गुजरातभर दौरा करून ही पुस्तिका शोधून आणली. तिची फोटोस्टॅट कॉपी केली. कोणाला हवी तर त्यांनी फोटोस्टॅट करून वाटावी." त्या पुस्तिकेतल्या एका उताऱ्याचा इंग्रजी अनुवाद ते वाचून दाखवतात. गुजरातेतील गोध्रा जिल्ह्यात १९२९–३० साली जातीय दंगल झाली होती. त्या वेळी मोरारजी देसाई सब डिव्हिजनल मॅजिस्ट्रेट होते. या दंगलीच्याविषयी खात्यामार्फत एक चौकशी होऊन सरकारने १० एप्रिल १९३० साली एक ऑर्डर काढली होती. त्यात In this critical period Morarji Desai, Subdivisional Magistrate, has failed miserably to perform his duty, and it is difficult to resist to believe that this failure of his, was due to his communal bias. " असं म्हटलेलं होतं. उपजिल्हाधिकाऱ्यांच्या पदावर बढती करण्यासाठी जी यादी होती त्या यादीत मोरारजी देसाई यांचं नाव सध्या आहे त्यापेक्षा पाच नावं. खाली घालावं असंही या ऑर्डरमध्ये म्हटलेलं होतं. एवढं वाचून दाखवून राजनारायण म्हणतात– फ्रॉम द वेरी बिगिनिंग वह कम्युनल थे. और कम्युनल होनेके कारण वह आज देशको जहन्नुममे ले जानेपर तुले हुए हैं। "

राजनारायण यांचं भाषण कथेकऱ्यासारखं असतं. नाटकी व मजेशीर भाषणातच ते म्हणाले " मैं श्री. मोरारजी देसाईसे करबद्ध प्रार्थना करूंगा कि हे मोरारजी भाई, आप रहें या न रहें, इस देशको रहने दें "

मोरारजीभाईंचं वर्णन करताना ते म्हणतात.

" विषभरा कनक घट जैसे, मन मलीन तन सुंदर जैसे." म्हणजे मन मलिन आहे पण शरीर मात्र सुंदर आहे. सोन्याच्या कलशात विष भरलेलं असावं तसं. असे आहेत मोरारजीभाई हे तुम्ही चांगलं ध्यानात ठेवा !" असं राजनारायण बजावतात.

राजनारायण म्हणजे महाभारत, पुराण यांचा दाखला पाहिजेच. या भाषणातही त्यांनी दिनकर यांची कविता उल्लेखून दाखला दिलाच. ते म्हणाले, दिनकरजींनी काय लिहिलं आहे हे मी सांगू इच्छितो. ते म्हणतात कृष्णानं दुर्योधनाला खूप समजावलं पण दुर्योधन ऐकेना. त्यावर कृष्ण म्हणतो–

' ले अब मैं भी जाता हूँ
अंतिम संकल्प सुनाता हूँ
याचना नहीं अब रण होगा
जीवन जय या कि मरण होगा
दुर्योधन तू भूशाई होगा
हिंसाका उत्तरदायी होगा '

' मोरारजी देसाईंना माझं सांगणं आहे. हे जनतापक्षरूपी पंत-प्रधान मोरारजी देसाई, ज्या प्रकारे दुर्योधन भूशाई (मृत–खाली पडणारा) झाला त्या प्रकारे तुम्हीही भूशाई व्हाल !' ही राज-नारायण यांची शापवाणीच होती. ही शापवाणी उच्चारूनच राजनारायण यांनी आपल्या भाषणाची सांगता केली.

आपल्या भाषणात मोरारजी देसाई यांचे पुत्र कांतीलाल देसाई यांच्यावर त्यांनी टीका केलीच. बालसुब्रह्मण्यमचा उल्लेख केला. त्याचा लंडनहून मला फोन आला होता, असं राजनारायण म्हणाले. (या बालसुब्रह्मण्यमच्या शोधात पोलीस आहेत.) ' पार्लमेंट आपल्या प्राणरक्षणाची खात्री देत असेल तर मोरारजी देसाई व कांती देसाई यांचे सारे ' करप्शन ' मी सांगेन !' असं बालसुब्रह्मण्यम आपल्याला म्हणाल्याचे राजनारायण सांगतात.

मग एका पत्राची फोटोस्टॅट कॉपी ते दाखवतात व म्हणतात, ' हे किर्लोस्कर कोण आहेत हे मी ओळखत नाही. बहुधा मोरारजी देसाई यांचे व्याही असावेत आणि कांतीलाल देसाई यांचे सासरे. फादर इन लॉ ! या पत्रात म्हटलं आहे–

My Dear Dr. Stoll,

Thank you for your letter of the 10th July 1978. I am glad to hear that you are coming to India in September on a business trip. I will be very happy to see you here. I was in Frankfurt in the last week of June. Unfourtunately I could not meet you due to preoccupations. I was told that there was some occasion in your house and you could not leave the house during those days.

Regarding your Pneumatic project. I thought you were negotiating with Messers Kirloskars, who are the biggest engineering firm in India. I am surprised to learn that you have negotiated with some African firm in Banglore who are supposed to be your agents Anyway, we well discuss the matter in detail when you come to India.

लोकशाहीत काही सामर्थ्य असेल तर हात पकडून पंतप्रधानांना खुर्चीवरून दूर केलं पाहिजे असंही राजनारायण ठासून म्हणतात.

एक सदस्य विचारतात, ' या पत्रावर सही कोणाची आहे ?'

राजनारायण गर्जून उठतात, ' कांतीलाल देसाई यांची !' □

माजी समाजवादी व राजनारायण यांचे सहकारी उग्रसेन हे भाषण करायला उठतात. ते राजनारायण यांना चांगलेच प्रत्युत्तर देतात. राजनारायण हे हनुमान आहेत; पण त्यांचा राम दरवेळेस बदलत असतो असं त्यांना सुनावतात. उग्रसेन यांचे भाषण भावनोत्कटतेनं ओतप्रोत भरलेलं असतं. ते राजनारायण व त्यांच्या साथीदारांना विचारतात, 'असं काय घडलं की, तुम्ही जुन्या घराला आग लावून नव्या महालात राहायला गेलात? जनता तुम्हाला असा प्रश्न विचारील व तुम्हाला उत्तर द्यावं लागेल!' आणीबाणी, तुरुंगातले दिवस याच्या आठवणी ते काढतात. 'तुरुंगातलेच कपडे घालून आपल्या मुलीचं लग्न लावून द्यावं लागलं. मी तर कोणी नाही, मी फक्त नेत्याचा झेंडा खांद्यावर घेत असतो!' वगैरे वगैरे. ते तळमळून, मनापासून बोलतात. उग्रसेन यांचं भाषण सुरू झालं आणि दोन मिनिटांतच जेवणाची सुट्टी झाली. तेव्हा त्यांना जेवणाच्या सुट्टीनंतर आपलं भाषण पुरं करावं लागलं. त्यामुळं त्यांच्या भाषणाचा प्रभाव काहीसा कमी झाला.

या दोन भाषणांनी चर्चेत चैतन्य आलं होतं. राजनारायण यांच्या भाषणात काही नाविन्य नव्हतं; पण त्यात बरीच खळबळजनक माहिती होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला गांधीजींनी ब्लॅक शर्टस, नाझी, फॅसिस्ट म्हटलंय ही नेहमीची वाक्यं त्यांनी ऐकवली होती.

आजच्या दिवसाचे स्टार स्पीकर होते जॉर्ज फर्नांडिस. त्यांच्या राजिनाम्याच्या वावड्या उठत होत्या. तेव्हा ते भाषण करणार यावर कोणाचाच विश्वास बसेना. दुपारी तीन वाजता भाषण होईल असं आधी सांगितलं गेलं होतं; पण जॉर्ज फर्नांडिसना मधू लिमये गोटातून निरोप गेला, आपलं धोरण अजून ठरतंय. भाषण करू नका. निदान पुढं ढकला!' जॉर्ज फर्नांडिस यांनी दुपारी साडेचारपर्यंत वाट पाहिली व मग भाषण करायचं ठरवलं. जॉर्ज फर्नांडिस यांचं घणाघाती वक्तृत्व. आकडेवारी तोंडपाठ. लांब बाह्याचा बुशशर्ट व पॅंट अशा पोशाखातले जॉर्ज रुमालानं मानेवरचा घाम पुसत भाषण करायला उभे राहिले. हळूहळू स्कोअर करायला त्यांनी सुरुवात केली आणि मग चौकार, षट्कार लगावीत जोरदार फटकेबाजी आरंभिली. यशवंतराव चव्हाणांच्या भाषणाचा समाचार घेतला. हेच विरोधी पक्षनेते श्रीमती गांधींना 'माय कॅप्टन, माय डॉक्टर' म्हणाले होते, असे सांगून ते म्हणाले, १९७५–७६ व ७६–७७ या दोन वर्षांत पूर्वीच्या कारकीर्दीत काय कामगिरी झाली होती त्याच्या तुलनेत जनता पक्षानं काय केलं हे मी सांगणार आहे. हेच लोक त्या वेळी त्याआधीच्या काळाला 'डायनॅमिक डिकेड' म्हणत होते.

एक सदस्य मध्येच म्हणतात, 'डायनामाइट डिकेड!'

त्यामुळं काही क्षण गडबड उडते. सभापती सभासदांना शांत राहायची विनंती करतात.

'तर या 'डायनॅमिक डिकेड'मध्ये सुरुवातीला दारिद्र्यरेषेखाली २८ कोटी लोक होते ते दशकाच्या अखेरीस ४२ कोटी झाले! ही मी काढलेली आकडेवारी नाही. ही तुम्हीच दिलेली आकडेवारी आहे. आणीबाणीच्या काळातील ही आकडेवारी आहे. तेव्हा तुमच्या कॅप्टन व डॉक्टर नियोजनमंडळाच्या अध्यक्षा, पंतप्रधान व हुकुमशहा होत्या. याच दशकात डाळीची दरमाणशी उपलब्धता ६० ग्रॅमवरून ४२ ग्रॅमवर आली. हे सारे आकडे 'अ डिकेड ऑफ अचीव्हमेन्टस १९६६ ते १९७५' या डी. ए. व्ही. पी. नं प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेत आहेत.' असं सांगून फर्नांडिस यांनी एकामागोमाग एक धडाधड उदाहरणं देऊन विरोधकांना चांगलंच झोडपून काढलं.

'स्मॉल इज ब्यूटिफुल' या औद्योगिक धोरणाची टिंगल करणाऱ्या वसंतराव नाईक यांना टोला लगावताना ते म्हणाले, 'हेच नाईक पुसद येथे ब्रिटिश सैन्याकरिता माणसं भरती करत होते व युद्धनिधीसाठी पैसा उभारीत होते. त्यांना काय समजणार?'

(वसंतराव नाईक यांनी उद्योगमंत्री हे बोनसमंत्री व पोटनिवडणूकमंत्री म्हणून ओळखले जातात. 'स्मॉल इज ब्यूटिफुल' अशी घोषणा त्यांनी दिली आहे. याचा अर्थ ते चरखा व टकळीचं उत्पादन करतील व ते प्रत्येक शेतमजुराला देतील व म्हणतील–आता तुझा बेकारीचा प्रश्न सुटला. कारण स्मॉल इज ब्यूटिफुल! टकळी इतकी छोटी वस्तू असू शकणार नाही.' अशी टीका केली होती.)

'पुढील तीस वर्षांत तीस हजार कोटी रुपये ग्रामीण क्षेत्रात गुंतवण्यात येणार आहेत. गेल्या तीस वर्षांत तुम्ही या क्षेत्रात जितका पैसा गुंतवला होता त्यापेक्षा ही रक्कम दीड पटीनं अधिक आहे. गेल्या दोन वर्षांत ५१ लक्ष हेक्टर जमीन लघुपाटबंधारे योजनांमुळे लागवडीखाली आणण्यात आली, औद्योगिक प्रगतीचा वेग आठ टक्क्यांनी वाढला' आदी आकडेवारी देऊन त्याची मागच्या सरकारच्या काळातील तथाकथित प्रगतीशी फर्नांडिस यांनी तुलना केली.

जनता पक्षाने केलेल्या कामगिरीचा आम्हाला अभिमान वाटतो असेही ते म्हणाले, 'आमच्या पक्षाचे काही प्रश्न आहेत, मी सभागृहात त्यांची चर्चा करू इच्छित नाही.' असं सांगून त्यांनी राजकीय बाबींचाही ऊहापोह केला. 'ओ. पी. त्यागींचे धर्मस्वातंत्र्यविधेयक हे खाजगी विधेयक आहे, सरकारचे नव्हे.' असा खुलासा केला.

जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करण्यासाठी विरोधकांनीही आम्हाला सहकार्य द्यावं असं म्हणून फर्नांडिस यांनी भाषणाची सांगता केली.

जॉर्ज फर्नांडिस यांच्या भाषणानं सभागृहावर मोहिनी टाकली. चंद्रशेखर त्यांच्या बाकापाशी गेले व त्यांनी फर्नांडिस यांचे अभिनंदन केले. बरेच सदस्यही फर्नांडिस यांच्याभोवती जमलेले. फर्नांडिस यांचं भाषण संपल्यावर बरेच सदस्य निघून जातात. प्रेस गॅलरीही अर्धी खाली होते. फर्नांडिसनंतर बोलायला उभ्या राहिलेल्या श्रीमती मोहसिना किडवाईंचं भाषण ऐकायला फार कमी सदस्य उरलेले असतात.

फर्नांडिस यांच्या भाषणामुळं सरकारी पक्षात जणू चैतन्याची लहर उसळते; परंतु पक्षाला पडलेलं व क्षणाक्षणाला वाढत असलेलं खिंडार बुजवायला त्याचा काही उपयोग होत नाही. कारण नंतर खुद्द फर्नांडिसच ज्या झाडाला त्यांनी पाणी घातलं त्याच्यावरच तीन दिवसांनंतर कुऱ्हाडीचा घाव घालतात; पण तो नंतर घडणार इतिहास असतो.

त्या दिवशी फर्नांडिस यांचं प्रभावी भाषण कानात घुमत असतानाच आम्ही चंद्रशेखर यांच्या घरी दाखल झालो. उष्मा वाढलेला.

पृष्ठ २२ वर

बिंदुकथा

# पीळ

बिंदुसार

दौरा जवळजवळ संपत आला होता. गेले दहा दिवस अनेक ठिकाणे पाहून, पायपीट करून, गाड्या-बसेस पकडून शरीर आणि मन दोन्ही थकली होती. बडबड करून आणि ऐकून कंटाळा आला होता. आता फक्त दिल्ली परिसर आणि आग्रा पाहिलं की परतीचा प्रवास सुरू होणार. प्रवासाला निघताना आणि प्रवास संपत आला की, जाणवणारी हुरहूर पैदा झाली होती.

अर्धे लक्ष दिल्ली पाहण्याकडे तर अर्धे परत जाण्याच्या प्रवासाच्या व्यवस्थेकडे लागले होते. रात्रीचा प्रवास, त्यामुळे रिझर्वेशन अनिवार्यच; पण ते मिळत नव्हते. एकदम बारा जणांची रिझर्व्हेशन्स म्हटले की, ऐकणारा डोळे विस्फारून बघू लागे. हॉटेलवाले, मंडळवाले, स्थानिक ओळखीचे एक-दोन, सगळ्यांकडे तोंड वेंगाडून झाले. स्टेशनवर प्रत्येकाने चक्कर मारून आपापली चलाखी अजमावून पाहण्याचा प्रयत्न केला; पण कोठेही डाळ शिजेना.

नुकत्याच अनुभवलेल्या काश्मिरी निसर्गसौंदर्याची धुंदी डोक्यातून झपाट्याने उतरू लागली. दिल्लीचा भयानक उकाडा, स्टेशनचे कळकट प्लॅटफॉर्म, हॉटेलातील गचाळ वातावरण यांना तोंड देता देता, कुठून येथे उतरलो असे सर्वांना झाले.

अशा भकास अवस्थेत, खडा टाकलेल्या अनेक ठिकाणांपैकी एका ठिकाणाहून सुवार्ता कानी पडली. रिझर्व्हेशन्स मिळाली. सुटकेचा सुस्कारा सोडणार तोच कळले की, रिझर्व्हेशन्स फक्त नऊच मिळाली आहेत. जाणारे बारा— आता काय करावे याचा लांब चेहरे करून खल सुरू झाला. मागे कोण राहणार ? सर्वांनाच लौकर पोहोचण्याच्या निकडीच्या कारणांची आठवण होऊ लागली.

रिझर्व्हेशन्स आणून देणारा महात्मा धीर देत म्हणाला, 'इसमें क्या है जी? ट्रेनपर किसको पटा लेना— एक रातकीही तो बात है' नऊ तिकिटे हातात कोंबून, पन्नास रुपये अलगद खिशात टाकून, तो निघून गेला. मनात धाकधूक होती तरी एकमेकांना धीर देत गाडीत स्थानापन्न झालो. गेल्या काही दिवसांतले हास्यकल्लोळाचे, गप्पाटप्पांचे मोकळे वातावरण बदलले होते. जो तो जरा थंडच होता. खरेच होते. एका प्रवासी गटातील ही सारी माणसे. पुन्हा कोण कोणाला भेटणार अशी शक्यता कमीच होती.

उत्तर हिंदुस्थानच्या सपाट प्रदेशातून मैलच्या मैल पार करीत गाडी धडाडत चालली होती. उन्हे चढली आणि उतरू लागली. सावल्या लांब होऊ लागल्या. नाकात गाडीच्या थर्ड क्लासचा तो अलौकिक वास भिनून राहिला. कोमट पाणी पिऊन गळा अधिकच सुकून गेला.

संध्याकाळच्या सुमारास डब्याचा कंडक्टर फिरू लागला. प्रत्येकाचे तिकिट तपासू लागला. सकाळपासून ज्या कर्माला भीत होतो ते समोर उभे राहिले.

पार्टीतल्या एक-दोन बोलक्या माणसांनी हे प्रकरण हाताळायचे ठरवले. त्यांनी पुढे केलेली तिकिटे हातात चाळवीत कंडक्टर बोलला.

'कितने सीट है ?'

'हमलोग सब काश्मीर को गये थे—अभी वापस जा रहे हैं!' एक बोलका ऐसपैस हसत म्हणाला.

तिकिटे मोजीत कंडक्टरने, बोलणाराकडे थंड नजरेने पाहिले आणि हिंदुस्थानी बोलीतच फर्मावले. 'सीट बतावो !' पार्टीतल्या मंडळींची खानेसुमारी झाली. कंडक्टर म्हणाला, 'रिझर्व्हेशन नऊ आहेत. सीट बारा दिसतात.'

दुसरे बोलके म्हणाले, 'उसका क्या है— भीड बहोत है नहीं आजकल ?'

कंडक्टरच्या चेहऱ्यावर त्रासिक छटा दिसू लागली. 'साब, मला अजून खूप काम आहे. बाकीची रिझर्व्हेशन्स दाखवा! प्लीज'

'रिझर्व्हेशन्स नऊच आहेत.' एकमेकांकडे पहात पार्टीतले म्होरके पुटपुटले.

तिकिट परत देत, बाकाच्या कोपऱ्यावरून उठत कंडक्टर म्हणाला, 'नऊ वाजल्यानंतर तुमच्यापैकी तिघांना डब्यातून जावे लागेल.'

या घोषणेवर हलकल्लोळ माजला. पार्टीतील स्त्रीवर्ग पुढे सरसावला. एवढ्या रात्री कोठे जायचे ? आम्ही एका बर्थवर दोघे असे जमवून घेऊ. तुमची काय हरकत आहे ? किंवा तुम्ही इथे आम्हाला आणखी रिझर्व्हेशन द्या—आम्ही पैसे भरण्यास तयार आहोत की—वगैरे वगैरे !

कंडक्टरने आपल्या खुरटचा दाढीवरून हात फिरवला. मळकट काळी फेजकॅप सारखी केली आणि त्याने निर्णय दिला,

'मी दिलगीर आहे. डब्यात एकही बर्थ रिकामा नाही. आपणापैकी तिघांना उतरावे लागेल !'

कंडक्टर निघून गेल्यावर पार्टीमध्ये हलक्या आवाजात चर्चा सुरू झाली. काय करावे ? दिल्लीवाला म्हणाला होता, 'पटा लेना—' हे कसे जमायचे ? आणि नाही जमले तर खाली कोणी उतरायचे ? स्त्रीवर्ग आपापल्या पतिराजांना हळूच बजावू लागला, 'तुम्ही नका हं उतरू—जाल नाही तर बावळटासारखे !'

गाडी चाललीच होती. संध्याकाळचा अंधार पसरू लागला. कंडक्टर आपले काम संपवून दारापासच्या त्याच्या जागेकडे आला. कागदपत्र तेथे ठेवून बेसिनपाशी गेला. हाततोंड धुऊन थोडे पाणी त्याने पायांवर टाकल्यासारखे केले आणि परत फिरला. दाराजवळ उभा राहून त्याने खिशातून

घड्याळासारखे काही तरी काढले.

ते होकायंत्र होते.

त्यात बघून त्याने पश्चिम दिशा कोठे आहे ते ठरविले. एक मळकट टॉवेल खाली पसरला आणि गुडघे जमिनीवर टेकून त्याने डोळे मिटले. हाताचे तळवे उभे धरून त्याने काही तरी पुटपुटण्यास सुरुवात केली.

पार्टीतील लोक थक्क होऊन या साऱ्या प्रकाराकडे पहात राहिले. थोड्या वेळाने कंडक्टरचा नमाज आटोपला. तो शांतपणे आपल्या जागी जाऊन बसला.

चुळबुळत दोघेजण पुढे झाले.

' देखो मिया-आमची गलती झाली. आम्ही कबूल करतो. पण तुम्ही काही जमवून नाही का घेऊ शकणार ?'

कंडक्टर त्यांच्याकडे पाहिले न पाहिलेसे करून तुटकपणे म्हणाला, ' मी दिलगीर आहे. आपल्याला तकलीफ होणार; पण इलाज नाही !'

' बघा काही तरी–जमवून घेतलंत तर आम्ही थोडंफार म्हणजे आपण म्हणाल तितकं पण काही तरी देऊ.'

कंडक्टरचा सौम्य, पडेल चेहरा उग्र झाला. धुमसत धुमसत तो बोलू लागला.

' साब, तुम्ही सगळे मोठे लोक. मी एक छोटा माणूस. पोटासाठी चाकावरची जिंदगी बसर करतो; पण आपण माझी बेइज्जत करू नका ! स्वतःचीही किंमत कमी करून घेऊ नका !'

' रागावू नका मिया.'

'साब, अल्लामिया आपको सलामत रखे! आपण आता जास्त ताणू नका, पुढच्या स्टेशननंतर दोन तास गाडी कोठे थांबणार नाही. तेव्हा तुमच्यापैकी कोणीही तिघांनी पुढच्या स्टेशनवर उतरून जावं अशी माझी दरखास्त आहे. कसूर माफ असावी. शब्बा खैर !'

अंधार वाढू लागला होता. गाडी सुसाट वेगानं पुढच्या स्टेशनकडे धावत होती. निर्विकारपणे पण निश्चितपणे. तेथे कोणा तरी तिघांना उतरावं लागणार होतं. □



## कुरुक्षेत्र केरळ । लेखांक सातवा

विनय हर्डीकर । सतीश कामत

# कुरुक्षेत्राबाहेरील फेरफटका

या लेखात कुरुक्षेत्राच्या थोडं बाहेर जाऊन फेरफटका करण्याचा विचार आहे. प्रथम असं वाटत होतं की राजनैतिक चर्चा करून याच लेखात ही मालिका संपवावी– परंतु एकाएकी दिल्लीमधल्या राजकारणानं शीर्षासन केलं आहे. 'माणूस'चं तिकडेही लक्ष आहेच. प्रतिनिधी दिल्लीमध्ये हजर आहेच. दिल्लीमधलं राजकीय चित्र स्पष्ट झाल्याशिवाय या मालिकेचा समारोप करणं कठीण आहे. कारण कसंही असलं तरी केंद्रीय सरकारमध्ये आपले पाठीराखे आहेत असा भरवसा केरळातील संघवाल्यांना होता. तर अखिल भारतीय पातळीवर जनता पक्ष हा आपला मित्रपक्ष आहे, म्हणून मार्क्सवादीही थोडेसे बेफिकीर होते. केरळातला संघर्ष फार पेटणार नाही असं त्यांना वाटत होतं. म्हणून थोडं राजकारण बाजूला ठेवून केरळीयांच्या स्वभावाची जी दर्शनं घडली ती अशी–

केरळला भेट देण्याचा आमचा मुख्य उद्देश जरी मार्क्सवादी आणि संघवाले यांच्यातील संघर्षाचा अभ्यास करणे हा असला तरी ते करत असतानाच इतरही अनेक गंमतीदार अनुभव अगदी पुणे स्टेशनवर जयंती–जनता एक्सप्रेसमध्ये चढल्यापासून आले. अडीच-तीन हजार मैलांच्या या भटकंतीत असे प्रसंग फार बरे वाटायचे. कामाच्या विचारांच्या ताणामधून तेवढाच रिलीफ मिळायचा. ह्या लेखांकही आम्ही वाचकांना रिलीफ देण्याच्या उद्देशानंच लिहायचं ठरवलं आहे. म्हणूनच आमच्या या सबंध मोहिमेमधील काही विशेष उल्लेखनीय अनुभव पुढे देत आहोत.

आम्ही मे महिन्यामध्ये केरळला गेलो. मे हा अगदी गर्दीचा उच्चांक गाठणारा महिना. जयंती-जनता एक्सप्रेसही त्याला अपवाद नव्हतीच. या गाडीमध्ये प्रवेश कसा मिळवायचा याची आम्हालाही चिंता होतीच; पण पुण्याचे आमदार डॉ. अरविंद लेले यांनी या बाबतीत अतिशय चांगलं सहकार्य दिल्यामुळंच आम्हाला रिझर्वेशन्स मिळू शकली. रिझर्वेशन्स घेऊन रात्री रेल्वेस्टेशनवर गेलो तर प्लॅटफॉर्म नुसता फुलून गेलेला. खिशात रिझर्वेशन्स घट्ट धरलेली असूनही गाडीमध्ये शिरता येईल की नाही, याबद्दल एक प्रकारची धाकधूकच वाटत होती. गाडी आली आणि प्लॅटफॉर्मवर नुसता हलकल्लोळ माजला. मुंबईहून आलेल्या प्रवाशांना खाली उतरू न देता हातातल्या सामानाने त्यांना डब्यातच ढोसून काही जण आत शिरले. हमालमंडळी तर मुंबईहूनच आल्याच्या थाटात खिडक्या धरून बसली होती आणि आपापल्या 'गिऱ्हाईकां'ना जोरजोराने हाका मारत, हात करून बोलावत होती. हमाल दिसल्यावर गिऱ्हाईकंही वाटा काढत त्यांच्या दिशेनं पळायला लागत होती. गाडी पूर्णपणे थांबली. आमची 'जी' बोगी होती. थोड्याशा प्रयत्नानंतर बोगी तर सापडली; पण तिच्याही दाराशी प्रचंड धुमश्चक्री. त्यातल्या त्यात एकच समाधानाची गोष्ट म्हणजे आम्ही दोघांनीही पाठीवरच्या हॅवर सॅकपलीकडे काहीच सामान घेतलं नव्हतं. सॅकमध्येही पांघरण्यासाठी एक चादर घेतली होती; पण अंथरूण किंवा उशी याचा काही विचारच केला नव्हता. गाडी फक्त पंचवीस मिनिटे थांबणार होती, त्यामुळे स्वस्थपणे प्लॅटफॉर्मवर उभं राहून गर्दी कमी होण्याची वाट पहाणं फारसं शहाणपणाचं ठरणार नव्हतं. विनयने पुढं होऊन घुसायला सुरुवात केली. बोगीच्या दारापर्यंत तो पोचलादेखील. त्याच्याच मागे एक बलदंड माणूस खांद्यावर प्रचंड बॅग घेऊन चढत होता. विनयने बोगीच्या पायऱ्यांवर पाय ठेवला आणि त्याच्या पाठीवरच्या हॅवर सॅकचा धक्का त्यामागून चढणाऱ्या माणसाच्या बॅगला लागला. बॅग त्यांच्या खांद्यावरून पूर्णपणे उडाली; पण त्यांच्या मागेही गर्दी इतकी होती की ती खाली न पडता वरच्या वर झेलली गेली. एक मिनिटभर त्या माणसाची अवस्था हल्लीच्या प्रायोगिक नाटकामधल्या पात्रासारखी झाली. खांद्यावर बॅग नव्हती, पण हातांची अॅक्शन मात्र बॅग धरल्यासारखी, चेहराही मोठं ओझं उचलल्यासारखा ताणला गेलेला. विनयला हे काही कळलंच नाही. फक्त दोन–चार ठेवणीतल्या शिव्या तेवढ्या ऐकू आल्या; पण अशा गर्दीत शिव्यांमुळे कोण मागे वळून पाहणार! एवढ्यात पुन्हा ती भली मोठी बॅग त्या माणसांच्या खांद्यावर अलगदपणे आली आणि तो बोगीमध्ये चढला. ¤

आता गाडीमध्ये एक दिवस आणि दोन रात्री काढायच्या होत्या. त्यामुळं सगळं स्थिरस्थावर झाल्यावर आसपासच्या लोकांच्या ओळखी काढणं सुरू झालं. गर्दीमध्ये ज्याची बॅग उडाली होती तो गृहस्थ आमच्या शेजारच्याच बर्थवर आला. एकंदर रूप–रंगावरून तो केरळीच वाटत होता; पण तो निघाला महाराष्ट्रीयनच. केरळमध्ये लाकडाच्या धंद्यासाठी गेला आणि तिथेच स्थायिक झाला. त्याचे इतर नातेवाईक अजूनही महाराष्ट्रातच, सोलापूरला राहतात. त्यांना भेटण्यासाठीच तो आला होता. महाराष्ट्रातून एकदम केरळात उडी कशी मारली, असे विचारल्यावर तो म्हणाला की, 'आम्हाला त्यांच्या चाली–रीती जास्त पसंत पडल्या.' चाली–रीतींआधीही एखादी पोरगी पसंत पडली असावी आणि तिच्यामुळे चालीरीती पसंत पडल्या असाव्यात, असा कयास मनातच बांधून आम्ही

गप्प बसलो; पण तो गृहस्थही भलताच गप्पिष्ट. त्याने आणी-बाणी, राजकारण, इंदिराजी यशवंतराव (त्या वेळी यशवंतरावांना काहीच महत्त्व नसताना) असे विषय काढून आम्हालाच पिळायला सुरुवात केली; पण मग विनयनंही त्याला सोडले नाही. रात्री बऱ्याच उशिरापर्यंत दोघेजण जीव, आत्मा, जीवा–शिवाची भेट असल्या वाट्टेल त्या विषयावर बडबडत बसले होते. हे विषय सुरू झाल्यावरच सताशनं डोक्यावरून पांघरूण घेतलं. मध्ये एकदा बाकडं टोचत असल्यामुळं कूस बदलली असेल तेवढीच. थोड्या वेळानंतर बोलून बोलून दमल्यावर विनयही या नव्या मित्राचा निरोप घेऊन झोपी गेला. त्याचा व्यवसाय लाकडाचा, म्हणून आम्ही त्यालाच 'लाकूड-तोड्या' असे नाव ठेवून दिलं. या लाकूडतोड्यानं पुढंही आमची चांगली करमणूक केली. डब्यातली इतर केरळी माणसं आणि आमच्यामधला तो एक महत्त्वाचा दुवा होता. कारण त्याला मल्याळीही उत्तम येत होतं. अगदी मल्याळीमध्ये विनोद करून तो हसत आणि हसवतही होता. आम्ही कोचीनला उतरणार होतो. त्यामुळे कोचीन जवळ आल्यावर लाकूडतोड्याने स्वतःचा पत्ता आम्हाला लिहून दिला आणि घरी येण्याचं निमंत्रणही दिलं. जीवा–शिवाच्या चर्चेमुळं विनयबद्दल तर जरा जास्तच आत्मीयता वाटायला लागली होती. त्यामुळं कोचीनला आपण एकत्र कॉफी घेऊ आणि मग एकमेकांचा निरोप घेऊ, अशी घोषणा त्यानं करून टाकली. कारण तो लाकूडतोड्या कोचीनला उतरणार नव्हता, तो थेट त्रिवेंद्रमपर्यंत जाणार होता; पण कोचीनच्या प्लॅटफॉर्मवरही पुण्यासारखीच गर्दी. आम्ही आणि तो लाकूडतोड्या डब्यातून खाली उतरलो; पण नंतर गर्दीमध्ये तो कुठे दिसलाच नाही. शेवटी गाडीसुद्धा सुटली. आम्ही त्याचा नाद सोडून दिला. 'दोन ओंडक्यांची होते...'चा अनुभव एका ओंडकेवाल्यानंच दिला होता. ◻

गाडी केरळला जाणार म्हटल्यावरच डब्यामध्ये कोणी उजळ रूप-रंगाचा माणूस भेटण्याची आशा आम्ही सोडून दिली होती; पण एकदम पंचवीस–तीस ख्रिश्चन नन्सच डब्यात शिरतील अशी मात्र अपेक्षा नव्हती. आम्ही बोगीत शिरत असतानाच हा लोंढा आला. त्यांच्या-बरोबर त्यांच्या अवजड बॅगा. कारण आता धर्मप्रसाराचं जीवनभर काम करण्याच्या तयारीनेच त्या निघाल्या होत्या. डब्यामध्येही त्यांनी अगदी धुमाकूळ घातला होता. जवळजवळ अर्धा भाग त्यांनी व्यापला व स्वतःचं एक वेटच तयार केलं. त्या भागाला आम्ही 'Zone of charity' असं नाव ठेवून दिलं खरं; पण नंतरचे दोन दिवस या झोनचा फारच त्रास झाला. त्यांचं हसणं, खिदळणं, गाणी म्हणणं सगळं कसं सामूहिक असायचं. हात वगैरे धुवायलासुद्धा एकदा रांग सुरू झाली की त्याला खंड नाही. केरळच्या सामाजिक परिस्थितीचं एक अतिशय महत्त्वाचं अंग अशा तऱ्हेनं पुण्यापासूनच आपल्याला चिकटून येईल, याची आम्हाला घर सोडताना कल्पनादेखील नव्हती, अपेक्षा तर नाहीच नाही.

या नन्सविषयीचा एक अनुभव मात्र नोंदवून ठेवण्यासारखा आहे. सतत दोन दिवस आणि दोन रात्रींच्या प्रवासामुळे गाडी तिसऱ्या दिवशी सकाळी फार घाण होऊन गेली. जास्त वेळ हॉल्ट असेल त्या स्टेशनवर भीक न मागणारी पण भिकाऱ्यांचीच मुलं यायची आणि एका चिरगुटानं डबा थोडासा स्वच्छ करून चार–आठ आणे कमवायची; परंतु रेल्वेतर्फे काहीच व्यवस्था नव्हती. गाडी त्रिवेंद्रमला किंवा मुंबईला पोचल्यावरच धुतली जात असावी. तिसऱ्या दिवशी सकाळी शौचकूपाच्या आसपासची जागा तर फारच घाण झाली. एक–दोन लहान मुलांनी बाहेरच विधी करून ठेवला होता आणि त्यांच्या आया पोरांना स्वच्छ करून, डबा घाण ठेवून गुपचूप आपल्या जागेवर जाऊन बसल्या होत्या. भारतात हा अनुभव सर्वत्र येतो. सार्वजनिक ठिकाणांवरून राष्ट्राची संस्कृती व्यक्त होते वगैरे सुभाषितंही आता इतर सुभाषितांसारखी अर्थहीन झाली आहेतच. लोक जात–येत होते आणि कुवतीप्रमाणे शिव्या हासडत होते. क्वचित चुकचुकत होते. काही नन्सनीही तसंच केलं. या सगळ्या घाणीतूनही त्या शौचकूपात जात होत्या आणि त्यांच्या सकाळच्या प्रार्थनेसाठी स्वच्छ कपडे घालून बाहेर पडत होत्या. कर्मकांडाचा किती जबरदस्त प्रभाव भारतातल्या सर्व धर्मांत आहे याचं हे प्रत्यंतर! काही काळानंतर त्यांच्यापैकी एकीनं 'आपण हे स्वच्छ करू या' असं म्हटलं. क्षणभर शांतता पसरली. तिघी–चौघींच्या चेहऱ्यांवर एकदम अपराधीपणा चमकून गेला आणि नंतर त्यांनी ते काम करून टाकलं. चांगले विचारही संसर्गजन्य रोगांसारखे पसरू शकतात असं गार्डिनर एके ठिकाणी म्हणतो त्याची आठवण झाली. तोपर्यंत या नन्स स्वतःचं वेगळं अस्तित्व मुद्दाम टिकवून धरत होत्या म्हणून राग येत होता. नंतर मात्र तसं वाटलं नाही. केरळमधल्या ख्रिश्चन धार्मिक संस्था अनेक प्रलोभनं दाखवतात आणि गरीबांना आकृष्ट करतात; पण आता असं वाटतं आहे की, काहीजणांना या स्वच्छतेचा आणि सेवा-वृत्तीचा मोहदेखील पडत असेलच! ◻

बोगीत आमच्या बाजूलाच एक केरळी कुटुंब होतं. आई, बाप आणि दोन मुली. बाप साधारण पन्नाशीचा असावा. बऱ्यापैकी कुटुंब-वत्सल. स्टेशन आलं की, पाणी, चहा, वड्यांसाठी धावत सुटायचा. पुढे गाडीत विकायला येणाऱ्यांकडून मुलींकरता माळसुद्धा घेतली; पण त्याची बायको आणि मुली गंमतशीर होत्या. या माणसाची कुणी चेष्टा केली किंवा काही फजिती झाली की, त्या खूप हसून जोरजोराने हसायच्या. तो बिचारा अधिकच खजील व्हायचा.

असेच आम्ही सगळेजण गप्पा मारत बसलो असताना एक भिकारीण डब्यात आली. भीक मागत मागत ती आमच्यापर्यंत आली, आम्ही कुणीच काही बोललो नाही, काही केलंही नाही; पण हा केरळी मनुष्य एकदम संतापला आणि तिला 'ए चल, चल यहाँसे–' असं काही तरी तोडक्या-मोडक्या हिंदीत बोलला. ती भिकारीणही महावस्ताद. ती एकदम म्हणाली, 'हॅट् साला, ये बंदरका बाप इधर किधर आ गया?' आणि तिथून पळून गेली. यावर आम्हाला कानाला-लाच हसू आवरणं शक्य नव्हतं. त्या माणसाच्या बायको–मुली तर गडबडा लोळायच्याच बाकी राहिल्या होत्या. तो मात्र बिचारा पारच खलास होऊन गेला. एका भिकारणीने त्याची टोपी उडवली होती. त्या दिवशी रात्री तो विडी फुंकत बसला होता. त्याला पाहून आम्हाला उगीचच सर्कशीमध्ये सायकल चालवत विडी फुंकणाऱ्या माकडाची आठवण झाली आणि पुन्हा सकाळचा सर्व प्रसंग आठवून हसू यायला लागलं. पण झटकन कूस वळवून झोपी गेलो. ◻

पण हा माणूस होता मात्र अतिशय प्रेमळ. सतीश खिडकी-जवळच्या आडव्या बर्थवर झोपला होता. रात्री केव्हा तरी जोराचा पाऊस आला आणि सतीशची चादर भिजवून गेला. सतीशला जागसुद्धा आली नाही. हा केरळी मनुष्य मात्र जागा झाला. त्याने सतीशलाही उठवायचा बराच निष्फळ प्रयत्न केला. शेवटी मग सतीशच्या जवळच्या खिडकीची काच बंद करून तो पुन्हा झोपला. सकाळी सतीश उठल्यावर त्याने हे सगळे मला सांगितले. आदल्या रात्री त्याला हसल्याचे सतीशला उगीचच वाईट वाटले. ◻

मुंबईहून थेट त्रिवेंद्रमकडे जाणारी हीच एक गाडी. त्यामुळे थेट प्रवासीच होते. मधे सबंध दिवसभर आंध्रमधून प्रवास चालला होता; पण कुणी गाडीतून उतरलं नाही–आंध्रप्रदेश भारतातल्या अगदी कुरुप प्रांतांपैकी एक असं म्हणावं लागेल. पूर्वेकडचा किनारा मात्र याला लहानसा अपवाद आहे. निसर्ग रुक्ष, माणसे काळकट, विषमता भयंकर आणि भाताच्या पिकाखेरीज दुसरे फारसे मोठे उत्पादनच नाही. आंध्रात जेवढे भिकारी सापडतात तेवढे केरळ, मद्रास, कर्नाटक या प्रांतांत दिसणार नाहीत. गाडी स्टेशनवर थांबताच त्यांच्या झुंडीच्या झुंडी गाडीवर जणू तुटून पडायच्या! शिवाय वाटेत लागणारी गावंही कशीबशी वसवलेली. टाउन प्लॅनिंग वगैरे नाहीच. बांधकामाच्या पद्धतीत हिंदू-मुस्लिम पद्धतींचे चमत्कारिक मिश्रण! त्यामुळं सर्व केरळी गाडीत दिवसभर अस्वस्थ होते. त्यांचा होमसिकनेस वाढत चालला होता. संध्याकाळच्या सुमारास दक्षिणेकडचे घाट लागले–पूर्वकिनाऱ्यावरच्या वादळामुळं हवाही बऱ्यापैकी ढगाळ होती–मात्र गारवा नव्हता–'आज रात्रीच आपण केरळात शिरू, मग उद्या तुम्ही बघाच आमचे राज्य किती सुंदर आहे! आंध्र भिकाऱ्यांचा देश तर मद्रास रुक्ष, कोरडा, दुष्काळी!' शेजारचा मुंबईचा केरळी मोडक्या-तोडक्या हिंदीत बजावीत होता!

सकाळी पाहिले तर अक्षरशः जादूची कांडी फिरवल्यासारखे वाटले. निसर्ग पार बदलून गेला होता. भरपूर पाणी असलेल्या नद्या, ओढे, नाले, नारळाच्या झाडांचे अंत ना पार असे महासमुद्रच पसरलेले! त्यातच फणसांची, आंब्यांची आणि अनंत प्रकारांची त्या प्रदेशात आढळणारी झाडं. नारळांच्या झावळचांनी जोजावली जाणारी भूमी (केरैः लाळिताः) अशीच केरळ शब्दाची सार्थ व्युत्पत्ती आहे. त्रिवेंद्रममध्ये बार्टनहिल या मध्यवर्ती असणाऱ्या टेकडीवर गेलो होतो. सहा-सात लाख लोकवस्तीचे गाव; पण नारळाच्या झाडांच्या हिरव्या समुद्राशिवाय काहीही दिसत नव्हतं. कालिकत, अर्नाकुलम, तेलीचेरी, आलेप्पी सगळीकडे हाच प्रकार. मात्र त्रिवेंद्रमहून कन्याकुमारीकडे जाताना मद्रास प्रांतात शिरताच परत एकदा रुक्ष, बोडके डोंगर सुरू झाले. राकट, कणखर, दगडांचा देश सुरू झाला–भाषेच्या अडचणीमुळं आम्हाला घरी परतल्यासारखं वाटलं नाही!

एकूणच केरळी माणसाला मद्रासी किंवा कर्नाटकी माणसाबद्दल फारशी आत्मीयता नाही. कारण त्या प्रांतात त्यांना फारशा नोकऱ्याही मिळत नाहीत आणि समान वागणूकही मिळत नाही. स्वातंत्र्यानंतर जवळजवळ दहा वर्षं केरळ हा मद्रास राज्याचाच भाग होता आणि त्यापूर्वीही ब्रिटिश गव्हर्नर मद्रासलाच असे.

या सर्व काळात तामिळ लोकांनी केरळीयांच्या विकासाकडे भरपूर दुर्लक्ष केलं आहे, हेतुपूर्वक केलं आहे, असंही केरळीयांना वाटतं. उलट मुंबईसारखं प्रचंड औद्योगिक शहर त्यांना आपलं वाटतं. कारण तिथे नोकऱ्या मिळतात, घरी शेती–वाडी सांभाळणाऱ्या आई–बापांना चार पैसे पाठवता येतात. आम्ही गेलेल्या अनेक घरांमधले पंचविशीचे तरुण मुंबई–पुण्याकडे निरनिराळे हलके उद्योग करण्यासाठी आलेले होते. आपल्याकडले टायरचं पंक्चर काढण्याची कामं करणारे बहुसंख्य लोक तिकडूनच येतात. केरळी माणूस केरळात हे काम कदाचित करणारही नाही; पण तो महाराष्ट्रात ते करतो. लोकसंख्या अफाट, प्रदेश लहान. रोख पैसे मिळवण्यासाठी बाहेरच पडावं लागतं. पुणे, मुंबई, कलकत्ता, दिल्ली ते पार अरब देशांपर्यंत. या अरब देशांत सुतार, लोहार, गवंडी म्हणून गेलेल्या केरळी लोकांपैकी काहींनी तर पैसे साठवून, पुन्हा केरळात येऊन स्वतःचे लहान उद्योग-धंदेही सुरू केले आहेत. नोकऱ्या मिळतात म्हणून असेल किंवा अलीकडे शिवसेनेचा तडाखा बसला म्हणून असेल, पण पुण्या–मुंबईबद्दल मात्र ते चवताळून बोलतात. एक अधिकारी तावातावाने सांगत होता, मद्रासचे आय. ए. एस. मधले लोक आम्हाला सारखे खिजवतात, केरळ प्रांत लहान आहे. त्याच्यापेक्षा मद्रास खूप मोठा आहे. प्लॅनिंगमधल्या आमच्या अडचणींची तुम्हाला कल्पना येणार नाही.' फार शहाणे समजतात स्वतःला! मग मी त्यांना सांगतो. ' यू. पी, बिहार, महाराष्ट्र हे प्रांत बघा म्हणजे तुमचे डोळे फाटतील. या प्रांतापुढे मद्रास म्हणजे किस झाडकी पत्ती!" दक्षिणी माणसानं उत्तरेची बाजू घेण्याचं हे उदाहरण चमत्कारिक वाटेल; पण उत्तरेतही हा प्रकार आहेच. काश्मीर, पंजाब, हरियाना या तीन राज्यांतील लोकांना हिंदी बहुभाषिक प्रांतांच्या दबावाखाली राहायला नको वाटतं. 'हिंदी बेल्ट' चा ते उघड उघड नाही, पण आतून प्रतिकारच करत असतात. केरळातल्या संघाच्या कामातही हा प्रकार घडलाच. वेगळा केरळ प्रांत मागून घ्यावा लागला. तामिळनाड प्रांताचं काम पुण्यासारखंच कर्मठ वळणाचं झालं आहे, म्हणून त्याची टिंगलटवाळी करणारे काही जुने केरळी स्वयंसेवकही भेटलेच. ◻

कोचिनला गाडीतून उतरल्यावर रिक्षा मिळवणं ही एक अडचण होतीच. कारण छापील पत्त्यापलीकडे आम्हला काही माहीत नव्हतं आणि शिवाय रिक्षावाल्यांशी संवाद साधणंही जवळजवळ अशक्य. कारण हिंदी किंवा इंग्रजीचा त्यांना गंध नव्हता. विनयला कानडी उत्तम येतं; पण त्याचा या प्रदेशात काही उपयोग नव्हता. एक रिक्षावाला आला. आम्हाला कुठं जायचं आहे हे त्याला थोडं शब्दांमधून, थोडं हातवारे करून सांगितल्यावर त्याने ' पंधरा रुपये घेईन ' असं सांगितलं. भाषेची अडचण आर्थिक व्यवहाराच्या आड येत नव्हती हे एक बरं होतं. कारण बाकी काही नाही तरी केरळातील सामान्य माणसाला इंग्रजी आकडे आणि त्यांना असलेले इंग्रजी शब्द समजत होते. रिक्षावाल्यानं पंधरा रुपये सांगितल्यावरही एकदा आत शिरावंसं वाटलं. कारण दोन दिवसांच्या प्रवासानं अंग अगदी आंबून गेलं होतं. स्वच्छ आणि मनसोक्त आंघोळीची नितांत आवश्यकता होती. पण तशाही परिस्थितीत आमच्यातला पुणेकर जागा झालाच. जगाच्या पाठीवर कुठेही जायचं असलं म्हणून काय झालं, रिक्षा-

वाल्याला पंधरा रुपये द्यायचे ? आम्ही त्याला खुणेनंच 'नको' सांगितलं. दुसरा रिक्षावाला आला. 'आठ रुपये घेईन' म्हणाला. पहिल्या रिक्षावाल्यानं सांगितलेल्या भावाच्या पार्श्वभूमीवर हा भाव भलताच आकर्षक वाटला. शिवाय शरीराचा रेटा होताच. दोघेही रिक्षात बसलो. थोडसं फिरवून पण योग्य ठिकाणी रिक्षावाल्यानं नेऊन सोडलं. नंतर चौकशी केल्यावर असं कळलं की, आठ रुपये हेसुद्धा जास्तच झाले साडेतीन–चार रुपये म्हणजे डोक्यावरून पाणी ! आम्ही पुन्हा चुकचुकलो.' पण नवख्याना हात दाखवणारे रिक्षावाले ही काही फक्त पुण्यातल्याच रिक्षावाल्यांची मक्तेदारी नाही; हे लक्षात येऊन थोडसं बरंही वाटलं. ◻

कोचिनच्या 'माधव निवास' या संघाच्या कार्यालयामध्ये आम्ही गेलो तेव्हा भास्करराव तिथे नव्हते. 'जन्मभूमी' या दैनिकाचे संपादक पी. नारायण तिथे होते. त्यांना आमच्या येण्याचे प्रयोजन सांगितल्यावर त्यांनी आवश्यक ती सर्व माहिती आणि परिचय पत्रं देण्याचं मान्य केलं. पण त्याआधी आम्हाला आंघोळ वगैरे उरकायची होती. श्री. नारायणन यांनी दोन स्वयंसेवकांना आम्हाला 'जन्मभूमी'च्या कार्यालयात घेऊन यायला सांगितलं. व ते पुढे गेले.

सुमारे अर्धा–पाऊण तासाने त्या त्या दोन केरळी स्वयंसेवकांबरोबर आम्ही जायला निघालो. त्यांच्याशी काही बोलायचं म्हणजे भाषेची पंचाईत होती. पण चालतच जायचं की रिक्षा करायची हे ठरवायची वेळ आल्यावर आम्ही त्यांना 'माधव–निवास'पासून 'जन्मभूमी'चं कार्यालय किती लांब आहे ते विचारलं. 'टू किलोमीटर्स' त्यांच्यापैकी एकानं उत्तर दिलं. पण जेव्हा प्रत्यक्ष चालू लागलो तेव्हा लक्षात आलं की जरा जास्तच लांब आहे. तीन–साडेतीन किलोमीटरसं तरी नक्कीच त्यावेळी आम्हाला वाटलं, कदाचित त्या स्वयंसेवकाचा अंदाज चुकला असेल. आम्ही तो प्रसंग काही काळानंतर विसरूनही गेलो.

नंतर तेलिचेरीमध्ये असताना त्या परिसराच्या अंतर्भागात, ज्या ठिकाणी प्रत्यक्ष चकमकी झडल्या होत्या तिथे पायी हिंडण्याची वेळ आली. तेव्हाही बरोबरच्या स्वयंसेवकाला अंतर विचारलं. त्याचंही उत्तर ते 'टू किलोमीटर्स' आणि हेही अंतर त्यापेक्षा जास्तच होतं. कोचिन आणि तेलिचेरी या दोन गावांमध्ये पावणेदोनशे मैलाचं अंतर असलं तरी दोन्ही ठिकाणच्या संवस्वयंसेवकांची उत्तरं बदलत नाहीत. हे पाहून गंमत वाटली. बहुधा ते लांब जायचं असलं की 'टू किलोमीटर्स' म्हणत असावेत असा आम्ही तर्क बांधला आणि तिथून पुढे केव्हाही अंतर 'टू किलोमीटर्स' आहे असं कोणताही स्वयंसेवक म्हणाला की, रिक्षा करूनच जायला लागलो. केरळातल्या संघीयांनी 'टू किलोमीटर्स' हा परवलीचा ठेका ठरवला असावा बहुधा. ◻

त्रिवेंद्रमला गेल्यावर एक दिवस कन्याकुमारीसाठी राखून ठेवायचा, असं आम्ही पुणं सोडल्यापासून म्हणत होतो आणि तसं ते अंमलात आणलंही. त्रिवेंद्रमच्या आमच्या वास्तव्यात एक रविवार मिळाला आणि त्या दिवशी आम्ही कन्याकुमारीला जायचं ठरवलं. कारण रविवार असल्यामुळे सचिवालयात सरकारपैकी किंवा आमदार निवासात विरोधी गटापैकीही कुणी फारसं भेटणं शक्य नव्हतं. त्रिवेंद्रमहून कन्याकुमारीला रेल्वे जाते. आणि खाजगी बस कंपन्यांच्या बसेसही जातात. पण रेल्वे सकाळी साडेसहाला असल्यामुळे आणि बसपेक्षा तिला एक तास जास्त लागत असल्यामुळे आम्ही बसने जाणंच पसंत केलं. खाजगी कंपनीची बस असल्यामुळे ठासून भरली होती. वाटेमध्ये एकदा तरी अशी वेळ आली की बसचा कंडक्टर काही कारणासाठी खाली उतरला आणि दोन्ही दारांमधून पुष्कळ माणसं आत घुसली शेवटी झालं असं की, कंडक्टरला कोणत्याच दाराने बसमध्ये शिरता येईना. कारण माणसं दोन्ही बाजूंनी अगदी लोंबकळत उभी राहयली होती. बराच आरडा ओरडा झाल्यावर त्याला कशीबशी आत शिरण्यापुरती जागा मिळाली आणि मग बस सुटली. बससाठी एवढी धुमश्चक्री उत्तर भारतातच होते, असा आमचा ससज होता. केरळने तो साफ खोटा ठरवला. केरळातही किमान तीन–चार वेळा तरी ताकदीच्या जोरावरच आतमध्ये जागा मिळवावी लागली. अशाच गर्दीचा फायदा घेऊन पाकिट उडवणारे याही ठिकाणी होतेच. त्यानी तसा आम्हालाही हात दाखवण्याचा प्रयत्नही केला. पण वेळीच लक्षात आल्यामुळे असे प्रयत्न हाणून पाडता आले.

कन्याकुमारीला या विवेकानंद शिलास्मारकामुळे एखाद्या तीर्थक्षेत्राचंच स्वरूप प्राप्त झालं आहे. भारताच्या सर्व भागातून या ठिकाणी माणसं येत असतात. मराठी माणसंही भरपूर होती. बहुतेक सगळी यात्रा कंपन्याबरोबर आलेली. पण परिचित भाषा ऐकली की बरं वाटायचं. शिलास्मारक समुद्रामध्ये किनाऱ्यापासून सुमारे अर्धा मैलावर आहे. त्या ठिकाणी लहानशा लाँचमधून जावं लागतं. रांगा जरी मोठ्या लागत असल्या तरी एक लाँच शंभर/दीडशे जणाना सहज घेऊन जात होती. अशाच एका लाँचमधून शिलास्मारकावर पोचलो. गेल्या गेल्या रांगेतच चप्पल स्टॅण्डवर चपला काढून ठेवण्याची व्यवस्था होती. तिथे चपला ठेवल्याशिवाय पुढे जाता येतंच नव्हते. त्यामुळे एकूणच सबंध परिसरात स्वच्छता अतिशय उत्तम होती शिखांच्या गुरुद्वारात असते तशी. अंगदी कागदाचा बोळासुद्धा कुठे दिसत नव्हता. त्याचप्रमाणे लाँच–वाहतुकीचा काळ सोडता शिलास्मारकावर कोणालाही थांबायला बंदी होती. ज्या दालनामध्ये विवेकानंदांचा पूर्णाकृती पुतळा होता तिथली फरशी तर आरशासारखी चमकत होती.

स्मारकाच्या बाहेरच्या बाजूलाच कोणत्या राज्याने किती देणगी दिली त्याची यादी लावली. होती. देणगी देण्यामध्ये महाराष्ट्र सर्वांत आघाडीवर होता. (२१ लाख रु.) त्या खालोखाल उत्तर प्रदेश (१४ लाख रु.) व इतर राज्य होती. आपल्या प्रदेश इथे तरी आघाडीवर आहे हे पाहून फार बरं वाटलं.

दुपारी चार वाजण्याच्या सुमाराला त्रिवेंद्रमला परत जायचे विचार मनात येऊ लागले; पण तत्पूर्वी किनाऱ्यापासून एक किलोमीटर अलीकडे असलेलं 'विवेकानन्दपुरम्' पाहायचं होतंच. त्या ठिकाणी गेलो. श्री. काका हसबनीस नावाचे महाराष्ट्रीयन गृहस्थ भेटले. आता वृद्ध झाले आहेत. डोळ्यांनी स्पष्टपणे दिसत नाही; पण या प्रकल्पाच्या उभारणीत त्यांचा फार मोठा वाटा आहे. काका स्वतः इंजिनिअर आहेत. त्यांचे कुटुंबीय पुण्यालाच असतात. काका दिवाळीला वगैरे पुण्याला येऊन त्यांना भेटून जातात; पण बाकी

वास्तव्य विवेकानंदपुरमध्येच. आम्ही 'नको, नको' म्हणत असतानाही काकांनी प्रेमाने तिथल्या कँटिनमध्ये नेऊन चहा पाजला. गप्पाही भरपूर झाल्या. अतिशय माफक दरात सर्व सुविधा असलेलं ते शांत, रम्य ठिकाण आणखी काही काळ राहण्याचा आग्रह करत होतं; पण सोमवारच्या त्रिवेंद्रममधल्या काही अपॉइंटमेंटसही होत्या. त्यांना प्राधान्य देणं भागच होतं. कारण त्यासाठीच अचानकपणे एवढ्या लांबवर आम्ही आलो होतो. तिथं श्री. एकनाथजी रानडे काही भेटले नाहीत. ते अरुणाचल प्रदेशात होते. तेव्हाच मनात आलं, 'माणूस'साठी कुणी तरी एकदा अरुणाचल प्रदेशातही जायला हवं ! ◻

समुद्र ! समुद्र !

केरळात नारळाच्या झाडांचा समुद्र तर नेहमीच सोबत करत होता; पण खरा समुद्रही खूप वेळा भेटला. समुद्राचं दर्शन दुरून घेतलं, जवळून घेतलं. अगदी मांडीपर्यंत पाण्यात जाऊनही घेतलं. समुद्राचं व्यक्तित्व एखाद्या लोहचुंबकासारखं असतं–प्रचंड अथांग पाण्याचा दरारा एकीकडे जाणवत असतो तर दुसरीकडे त्या पाण्यात जाऊन उभं राहून त्या लाटा पायांवर घेतल्याशिवाय स्वस्थताच वाटत नाही–केरळीय भूमीचं वैशिष्टचच असं की, तिथं खरोखरची 'समुद्रसपाटी' आहे. आपल्या कोकणातल्यासारखे मध्येमध्येच टाकलेले उपरे डोंगर, घाट्या, चढउतार असा प्रकार चारशे मैलांत जवळजवळ नाहीच ! नाड प्रदेश आहे; पण तो पठारांनी सह्याद्रीच्या मुख्य रांगेला जोडला आहे. रायगडासारखे सुटे डोंगर, कशेळीसारखे सुटे घाट ही भानगड नाही–त्यामुळेच केरळात रेल्वे फार लवकर झाली. रेल्वे आणि रस्ता एकमेकांशी खेळत-खेळतच समुद्रकाठाने जात असतात. हवामानाच्या निरनिराळ्या रंगांप्रमाणं समुद्राचं स्वरूप, रंगरूप पालटत असतं आणि गाडीच्या खिडकीतून तर मोठमोठ्या खाड्यांवरून जाताना आणि एरवीदेखील समुद्राचा प्रचंड विस्तार मधूनच दिसू लागतो. तेलीचेरीला जाताना रात्रभर प्रवास झाल्यावर सकाळीच भरतीच्या वेळचा समुद्र पाहिला. तो 'उसळत, घुसळत, फेसाळत' होता आणि उल्हासात होता. तो समुद्र संध्याकाळी सूर्यास्तानंतर तेलीचेरीच्या समुद्रकिनाऱ्यावर गेलो तेव्हा हळूहळू अधिक आक्रमक होताना जाणवत होता. काळा पडत चालला असतानाचं त्याचं घुमणं तर मनात एक दचकल्यासारखी भावना निर्माण करत होतं. कालिकतला देखील थोडा वेळ मिळताच आम्ही रात्री आठनंतर समुद्रावर गेलो होतो. पाण्याचा काळेपणाच एक प्रकारचा परकेपणा निर्माण करून गेला आणि त्यानं जवळ येऊ दिलंच नाही. शिवाय तिथं असलेल्या काही स्थानिक मंडळींच्या इतक्या संशयास्पद हालचाली सुरू होत्या की, तिथं खिशात बरेच पैसे असताना थांबणं बरं वाटेना; पण ते वातावरण समुद्राच्या खलनायकी व्यक्तित्वानंच अधिक असह्य झालं एवढं मात्र खरं. परत येताना उत्तर मलबार भागात एके ठिकाणी समुद्राच्या किनारी एक छोटेखानी किल्ला दिसला. त्याच्या तटावर आदळणाऱ्या लाटा पाहिल्या आणि चौल-रेवदंड्याची, अलिबागची आठवण झाली. समुद्रकिनाऱ्याच्या मदतीनं महाराष्ट्रात उभी राहिली ती स्वातंत्र्याची चळवळ आणि त्याच समुद्रकिनाऱ्याच्या मदतीनं केरळात आले ते पूर्ण व्यापारी मनोवृत्तीचे लोक ! नारळांचा, फणसांचा, जमिनींचा, लाकडांचा, घरादाराचा, अन्नाचा, धर्मसंस्कृतीचा

## केसरी : मल्याळम साप्ताहिक

केरळमध्ये संघ–जनसंघ यांच्या दैनिकाची– 'जन्मभूमी'-ची स्थापना अलीकडेच झाली व त्याचा खपही अद्याप मर्यादितच आहे. मात्र 'केसरी' हे मल्याळम साप्ताहिक फार जुने आहे. १९५१ मध्ये श्री. शंकर शास्त्री या नागपूरला पाठवण्यात आलेल्या प्रचारकाने कालिकत मध्ये हे साप्ताहिक स्थापन केले आणि पी. परमेश्वरन् यांना संपादक नेमले. आज या साप्ताहिकाचा खप सुमारे १५००० आहे. केरळमधील साक्षरतेचे प्रमाण आणि इतर दैनिके, मासिके, साप्ताहिके, पुस्तके यांच्या खपाचे आकडे पाहिले तर महाराष्ट्राच्या मानाने बऱ्यापैकी मोठा वाटणारा हा आकडा बेताचाच आहे असे मान्य करावे लागेल. श्री. परमेश्वरन् यांना पुढे जनसंघाच्या आणि त्यानंतर आणीबाणीनंतर दिल्लीमधील दीनदयाळ शोधप्रतिष्ठानाच्या कामाकडे पाठवण्यात आले. व संपादकत्वाची धुरा निरनिराळ्या प्रचारकांनी आजपर्यंत सांभाळली आहे. श्री. परमेश्वरन् यांनी मल्याळममध्ये श्री. नारायणगुरूंचे चरित्र लिहिले आहे. आणीबाणीच्या काळात या साप्ताहिकाने फार महत्त्वाची कामगिरी बजावली. आम्हाला खानोलकरांसारखे वाटलेले श्री. क्रिश्नन हे आणीबाणीत संपादक होते, त्यांना मिसाखाली अटक झाल्यावर श्री. सुकुमारन् यांच्याकडे 'केसरी' सोपवण्यात आला व सध्या तेच हे काम इतर प्रचारकांच्या साहाय्याने सांभाळत आहेत. 'प्रगति' नावाचे आणखी एक मल्याळम त्रैमासिकही सुरू करण्यात आले आहे. या त्रैमासिकातून भारतीय साहित्य, संस्कृती, कला, शास्त्रविचार, प्रचलित राजकारण यांसारख्या विषयांवरील शोधनिबंध प्रकाशित करण्याचे ठरले आहे.

कालिकत येथील केसरीचे कार्यालय पालयमरोड या मध्यवर्ती रस्त्यावर आहे. प्रगतीचेही तेच कार्यालय ! 'केसरी' हे नाव लोकमान्य टिळकांपासून स्फूर्ती घेऊन ठरवण्यात आले आहे हे उघड आहे. मात्र सध्या लोकमान्यांचा 'केसरी' व हा मल्याळम केसरी परस्परांच्या अगदी विरुद्ध बाजूंना उभे आहेत. त्यांच्या कार्यालयात लोकमान्य आणि स्वामी विवेकानंद हे एका झाडाखाली बसून विचारविनिमय करत आहेत असे चित्र लावले होते. केसरीच्या एका विशेषांकाचे ते मुखपृष्ठ होते असे विचारल्यानंतर कळले. लोकमान्य आणि विवेकनंदांची भेट झाली होती हे खरे असले तरी वरचे चित्र कल्पित वाटते. मात्र त्यातून या मल्याळम साप्ताहिकाची स्फूर्ती कोणती, श्रद्धा कोणत्या, याचा चांगला बोध होतो. *

सगळ्याचाच अमानुषपणे व्यापार करणारे आणि इथल्यांना सर्वस्व विकायला भाग पाडणारे लोकही केरळात समुद्रानंच आणून सोडले !

कोचीनबंदर, कोट्टायमच्या दोन प्रचंड खाड्या आणि आलेप्पी-जवळच्या खाड्यांमधून पाहिलेला सागर शांत, स्वस्थ, निळा होता. दुपारच्या वेळी डोळ्यांना सुखद गारवा देत होता; परंतु समुद्राचं खरं डोळ्यांत भरणारं दर्शन घडलं ते शरतलैहून त्रिवेंद्रमला जाताना. सकाळची वेळ होती. हवा ढगाळ होती. भरतीचं पाणी पूर्ण भरलेलं होतं. सकाळी-सकाळीच श्री. भास्करराव यांचा निरोप घेऊन बाहेर पडलो होतो. मनं प्रसन्न होती. त्यांच्याशी चर्चा झाल्यावर सगळ्या शोधाला मध्येच एक दीर्घ विराम मिळाल्यासारखा वाटत होता. आमच्या गप्पाही रंगात होत्या आणि अंत ना पार असं निळं पाणी क्षितिजापर्यंत पसरलेलं दिसलं—वरच्या निळ्या आकाशाला ते असं भिडलं होतं की, खरोखरचं क्षितिजरेषाच पुसून गेली होती. लगेच सावरकरांच्या 'सागरदर्शना'ची आठवण झाली. एरवी त्या ओळी ससंदेह अलंकाराचं उदाहरण म्हणूनच ध्यानात होत्या.

'सुनील नभ हे, सुंदर नभ हे, नभ हे अतुल अहा

सुनील सागर, सुंदर सागर. सागर अतलचि ! हा' ते तर पाहत होतोच; पण आकाश आणि समुद्र यांच्या सारखेपणाचं सावरकरांनी केलेलं वर्णन किती अचूक होतं त्याचाही अनुभव घेत होतो—

'खरा कोणता सागर यातुन, वरती मी खाली ?

खरे तसे आकाश कोणते, गुंग मती झाली !'

सावरकरांचं 'मोपल्यांचे बंड' वाचून निघाली होतो – केरळ-वरचीच ती कादंबरी ! केरळमधून प्रवास करताना मनाला कुठेच भिडली नव्हती. शेवटी सावरकर भिडले ते कवी म्हणून ! तो अथांग निळेपणाचा सरमिसळ अनुभव घेताना ! परत एकदा कवीनं विचारवंत राष्ट्रवाद्यावर मात केली !

कन्याकुमारीला मात्र समुद्राची हौस दिवसभर पुरवून घेतली. स्मारक पाहून झाल्यावर, पाहताना, पाहण्यापूर्वी सारखा पाहत होतो तो समुद्र – तिन्ही दिशांना पसरलेला – तोपर्यंत समुद्र एकाच दिशेला पसरलेला पाहत होतो. मायदेशाच्या एका सीमेपर्यंत आपण पोचलो आहोत याची जाणीव एका समुद्रानं करून दिली. तशा समुद्राच्या सान्निध्यात तो खडक पाहताच विवेकानंद किती साहजिक-पणे त्याच्याकडे खेचले गेले असतील आणि तीन दिवस मुक्काम केल्यावर त्यांना समुद्रानं 'अन्य देशी चल जाऊ' अशी सलगीची हाक कशी दिली असेल ते जाणवू लागलं. लाटा प्रचंड उसळत होत्या. स्मारकाकडे नेणारी लाँच गदागदा हालत होती. दूरवर गेलेले

## श्रीनारायणगुरु (१८५६–१९२८)

श्रीनारायणगुरूंच्या कार्याविषयी आधी ओघाओघाने उल्लेख आलेले आहेतच. एळवा या अस्पृश्य मानलेल्या जमातीत जन्म झालेल्या नारायणगुरूंनी संस्कृत भाषेचे शिक्षण घेतले आणि काही वर्षे संस्कृत व तमिळ भाषांचे अध्यापन केले व वेदांताचा अभ्यास केला. या अभ्यासातून विरक्ती उत्पन्न झाल्यावर त्यांनी कन्याकुमारीजवळ तपश्चर्या करून, समाजजीवनाचे निरीक्षण करण्यासाठी तमिळनाड व केरळ या प्रदेशांची पाहणी केली.

इतर प्रदेशांतील संतांप्रमाणे भारतभ्रमण न करता नारायणगुरूंनी केरळमधील अस्पृश्यांसाठी—विशेषतः कोळी व एळवा यांच्यासाठी— कार्य करायचे ठरवले. हिंदू समाजव्यवस्थेत होणाऱ्या छळाला कंटाळून जबरदस्ती व प्रलोभने यामुळे हे लोक फार मोठ्या प्रमाणावर मुसलमान व ख्रिस्ती धर्मात जात होते. ते थांबवण्यासाठी काम करण्याचे ठरवून नारायण-गुरूंनी अरुविप्पुरम येथ राहायचे ठरवले. अस्पृश्यांसाठी त्यांनी एक स्वतंत्र शिवमंदिर उभारले. कारण सवर्णांच्या मंदिरात त्यांना प्रवेश नसे. अशा प्रकारचे मंदिर उभारणारा हा भार-तातला पहिला हरिजन ! स्वतंत्र उपासनापद्धती व वेदान्ताचा प्रसार करण्यासाठी त्यांनी अनेक मंदिरे व संन्यासीमठ स्थापन केले. थोड्याच काळात ही सांस्कृतिक संघटनाकार्याची केंद्रस्थाने बनली. सर्व जातींना समान लेखून त्यांना संन्यास घेण्याची मोकळीक उपलब्ध करून दिली. अद्वैताची दीक्षा अस्पृश्यांना दिली. मद्यपान, पशुबळी या प्रथा बंद केल्या. आंतरजातीय विवाहांचा पुरस्कार केला. शिक्षणसंस्था काढ-ण्यास उत्तेजन दिले. श्रीनारायणगुरूंच्या कार्याने प्रभावित होऊन म. गांधी आणि रवींद्रनाथ टागोरही त्यांना भेटून गेले होते.

आत्मोपदेशशतकम् या मल्याळी भाषेतील काव्यात त्यांच्या जीवनोपदेशाचे सर्व सार आहे. संस्कृत व मल्याळम् दोन्ही भाषांत त्यांनी विपुल वाङ्मय निर्माण केले आहे. जसे आपण शिवाजी नसता तर 'सुन्नत होती सबकी' म्हणतो, तसेच नारायणगुरु झाले नसते तर केरळातील सर्व अस्पृश्य ख्रिश्चन अगर मुस्लिम झाले असते. साधी राहणी, ध्यान-धारणा, अध्यापन आणि दीनदुबळ्यांची सेवा, औषधोपचार असा त्यांचा नेहमीचा दिनक्रम असे.

संघाने श्रीनारायणगुरूंचे महत्त्व ओळखून त्यांना आधुनिक भारतीय प्रबोधन घडविणाऱ्या पुरुषांच्या नामावळीत फार मानाचे स्थान दिले आहे. प्रातःशाखांतून, कार्यालयांतून, शिबिरांतून म्हटल्या जाणाऱ्या भारतभक्तिस्तोत्रातले तीन श्लोक पाहिले की, संघात नारायणगुरूंना किती मानतात ते कळून येईल.

'रामकृष्णो दयानंदो रवींद्रो राममोहनः।
रामतीर्थोऽरविंदश्च विवेकानंद उद्दिशः ।।
तिलको रमणश्चैव सुधीर्नारायणो गुरुः।
महामना मालवीयो महात्मा गांधिरेव च ।।
केशवः संघनिर्माता हेडगेवारवंशजः।
संततं चिन्तयेदेतान् हिंदुभूमिसुतोत्तमान्।


श्रेष्ठ बुद्धीचा (सुधीः) हे विशेषण सार्थ व्हावे असेच श्रीनारायणगुरूंचे कार्य आहे.

पडाव तर क्षणात लाटेवर आरूढ होत आणि खाली कोसळले की, क्षणभर दिसेनास होत–समुद्राचं रूप सौम्य नव्हतं. जवळ पैसेही फारसे नव्हते; परंतु एखादा पडाववाला गाठून चार-पाच मैल आत जाऊन यावं असं सारखं वाटत होतं. शेवटी ती हौस समुद्राच्या काठी फिरून समुद्राच्या पाण्यात भिजून, तीर्थक्षेत्र म्हणून दंगामस्ती करत मोकळेपणानं नहाणारांच्या गमती पाहत, पायांनी वाळू उडवत, शंख-शिंपले-दगड गोळा करत, ठिकठिकाणच्या दुकानांतून मांडलेल्या समुद्राच्या पोटातूनच वर आलेल्या वस्तू पाहत भागवली. विवेकानंद केंद्राचा स्वतःचा बीच आहे आणि तिथेही काठालाच वीस वीस फूट उंचीचे दोन खडक आहेत. तीन प्रहरी त्या खडकांवर जाऊन बसलो होतो. ५ वाजताच्या सुमाराला फार मोठ्या लाटा फुटायला लागल्या व आम्ही खाली आलो. फार सुंदर जागा आहे, तिकडे जाणारांनी एकदा गेलंच पाहिजे अशी. ◻

केरळमध्ये आम्ही खूप हिंडलो, मजेत हिंडलो. अविश्रांत तीन-चार दिवस हिंडलो आणि त्रिवेंद्रममध्ये आरामात चार दिवस राहिलोही. भाषेची एक सोय होती. कोणाहीबद्दल त्याच्यासमोरच मराठीमध्ये काहीही बोलता येत होतं. लुंगी या वस्त्राची एक अनामिक धास्ती मनात होती. विशेषतः लुंगी खोचून माणसं बस पकडायला धावत, सायकलवर टांग टाकत, फटफटया चालवत तेव्हा लहान मुलाच्या टारगटपणानं मराठीत बोलता येत असे. त्रिवेंद्रममधले 'हिंदुस्थान समाचार'चे श्री. शर्मा हा असाच एक टारगट प्रौढ भेटला आणि त्यांच्या सहवासात टिंगल-टवाळी-गप्पा यांना अगदी ऊत आला. श्री. व सौ. शर्मा यांच्यात आम्ही भांडणंही लावून दिली व मजा पाहत बसलो. त्या माउलीनं संध्याकाळचं जेवण रात्री अकराला वाढलं. तेव्हा जवळजवळ भूकबळीच्या अवस्थेला आलो तर कालिकतसारख्या ठिकाणी अस्सल मराठी जेवण पोटभर मिळाल्यावर हरखून गेलो ! संघशाखांवर स्वयंसेवक लुंग्या नेसून कबड्डी देखील खेळतात हे ऐकून चाट पडलो ! निघण्याच्या आदल्या दिवशी श्री. शर्मांनी आपल्या काही संस्कृत कविता म्हणून दाखवल्या–संस्कृत कविता, प्रत्यक्ष कवीच्या तोंडून ! कविता सुंदर होती. विवेकानंद शिलास्मारकाविषयी होती. सागरात क्रीडा करणारा एक हत्ती (खडक) आहे. त्या हत्तीवर एक अंबारी आहे आणि अंबारीत कोणीएक 'नरेंद्र' आहे असं सुंदर पारंपारिक रूपक होतं. त्या नरेंद्राच्या भेटीसाठी प्रथम एक समुद्र निघाला आणि तो निघताच बाकीचे दोघे समुद्र म्हणाले, 'एकटा नको जाऊस, आम्हीही येतो !' अशी पुढची कल्पना होती. शर्माजींना ती कविता पुण्याला पाठवायला सांगितली आहे. ती कविता अजून आली नाही; पण येईलही कदाचित ! तरी असे किती तरी क्षण उरतील जे इकडे आणताच येणार नाहीत !

(क्रमशः)


हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?
राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?
या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........



नाझी
भस्मासुराचा
उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे

पुस्तके

# ‘ दलितांचा जाहीरनामा ’

## सखोलतेचा अभाव

‘ दलितांचा जाहीरनामा ’ हे प्रा. रामचंद्र क्षीरसागर यांचे दलितचळवळीवरील एक पुस्तक. दलितचळवळ आत्मपरीक्षण करू लागल्यापासून अलीकडे अभ्यासू पुस्तकांची त्यात भर पडत आहे आणि चळवळ व जागृती वाढण्याच्या दृष्टीने ही स्वागतार्हच गोष्ट आहे.

हा ‘ जाहीरनामा ’ एकूण २९ कलमांमधून विशद करण्यात आलेला आहे. बेलची, कंझावाला, मराठवाडा या ताज्या घटनांमुळे हा प्रश्न परत एकदा पुढे आलेला आहेच.

प्रागैतिहासिक काळापासून सुरुवात करून लेखकाने वर्तमान स्थितीवर विचार केलेला आहे. नजीकच्या भविष्यात काय करता येईल याच्यासाठी काही विचारार्ह सूचनाही केलेल्या आहेत.

जाहीरनाम्याचा पूर्वार्ध शब्दबंबाळ आणि विचारापेक्षा भावनेवर अधिक आधारित असा दिसतो. सवर्ण हिंदू ते असत् आणि नागवंशीय बौद्ध हे सगळे सत् अशी तर्काला न पटणारी sweeping generalizations मधूनमधून आढळतात. अशा टोकाच्या भूमिकेमुळे चळवळच जरा मागे पडण्याचा धोका संभवतो.

मूलतः लेखकाने सुचवलेल्या काही उपायांपैकी एक म्हणजे खेडी जातीयतेने ग्रासल्याने दलितांना मोठ्या प्रमाणावर शहरात स्थलांतर करावे. कारण शहरात त्यांना मोठे क्षेत्र उपलब्ध आहे, त्यांना खेड्याइतक्या तीव्र जातीयतेशी सामना करावा लागणार नाही. संरक्षणासाठी पोलिसदल, प्रसंगी वैद्यकीय मदत लवकर मिळू शकेल इ. पण या सूचनेला आधारभूत आर्थिक विचाराची पुष्टी आढळत नाही. किंबहुना तशा दृष्टीने दलितांना स्वावलंबी बनण्यासाठी काय करता येईल या दृष्टीने लेखकाने पुरेसा गंभीरपणे विचार केलेलाच नाही काय, असे वाटते. का ‘ जाहीरनाम्या ’-मध्ये आर्थिक विश्लेषणाची अपेक्षाच करू नये ! नुसते शहरात येणार आणि वाढवले तर प्रश्न सुटतील काय ? आजवरचा अनुभव काय सांगतो ? शहरातील सामाजिक परिस्थिती खेड्यांइतकी कटू नाही हे सत्य आहे. ‘ शहरांमध्ये चला ’ ही या पुस्तकाच्या भरीव सूचनांपैकी एक आहे म्हणूनच तिचा सर्वांगीण विचार केल्याचे दिसायला हवे होते. तसे दिसत नाही. हा मुद्दा अनेक पैलूंनी युक्त असा आहे. त्याचा दलितांचे प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने अधिक खोलात विचार करणे आवश्यक आहे. ही सूचना नवीन नाही. बाबासाहेब आंबेडकरांनीच ती मांडलेली आहे; पण गेल्या तीस वर्षांत बदललेल्या परिस्थितीत तिचा वर्तमानाला साजेसा विचार होणे महत्त्वाचे वाटते.

हा प्रमुख मुद्दा सोडता बाकी पुस्तकात नवीन अशी वैचारिक आघाडी बांधलेली दिसत नाही. लेखकाच्या हल्ल्याचे निश्चित लक्ष्य काय ? त्याला कम्युनिझम अभिप्रेत नाही, सोशॅलिझमही अभिप्रेत दिसत नाही. या संदिग्धतेमुळेच उपरोल्लेखित आर्थिक विचाराला प्राधान्य न देणे ही महत्त्वाची उणीव वाटते.

दुसरा एक मुद्दा लेखकाने मांडला आहे. दलितांच्या ज्या ज्या संघटना आज अस्तित्वात आहेत, त्यांचे देशव्यापी फेडरेशन करायचे असा हा मुद्दा आहे. हे कसे करायचे हा तर प्रमुख प्रश्न आहे. एका उद्योगक्षेत्रात एकाच कामगारसंघटनेचे वर्चस्व असावे ही सूचना सुचवायला ठीक आहे; पण ती प्रत्यक्षात कशी आणायची ? जॉर्ज फर्नांडिससारखा कामगारचळवळीतून वर आलेला माणूस या सूचनेचा पुरस्कर्ता असूनही त्या दिशेने जर जॉर्ज फर्नांडिस केन्द्रीय मंत्री होऊनही पावले पडलेली नाहीत, तर एक सूचना याउपर तिला काय किंमत राहते ! हे उदाहरण अशासाठी दिले की, फेडरेशन करावे ठीक; पण असा सगळ्या वर्तमान संघटनांना मान्य होईल असा कार्यक्रम आहे काय ? त्यासाठी कोणी धडपड करत आहे काय ? ज्याच्या शब्दाला वजन आहे, असा समर्थ नेता तरी आहे काय ? हे वस्तुस्थितीतले प्रश्न आहेत आणि त्यांना लेखकाकडे उत्तरे नाहीत.

दलितस्तानची कल्पनाही पुढे मांडलेली आहे. तिचे तोटे लेखकाने चांगल्या रीतीने विशद केले आहेत; पण पाकिस्तान–दलितस्तानची तुलनाही अतार्किक आहे. पहिला मुद्दा वर सांगितल्याप्रमाणेच. बेन गुरियनच्या तोडीचा किंवा बॅ. जिनांच्या तोडीचा दलितांचा नेता आज दृष्टिपथात नाही. दुसरा : कॅनडात क्युबेक हा प्रांत निराळा देश म्हणून काढण्यासाठी धडपड चालू आहे; पण आर्थिक स्वावलंबित्व, लष्करी संरक्षण या मुद्द्यांवर रेने लेवस्क या पार्ती क्युबेकॉवच्या नेत्याला (निर्विवाद बहुमत मिळूनही) निर्णय घेता न आल्याने ते घोंगडे भिजत पडले आहे. भारतापासून फुटून निघणारे दलितस्तान की महाराष्ट्र-पंजाबप्रमाणे एक राज्य म्हणून दलितस्तान हेही नीट स्पष्ट करण्यात आलेले नाही. अर्थात हा प्रवाह राष्ट्रीय एकात्मतेसाठी, विशेषतः ‘ भारत हिंदुस्थान है, हिन्दुओंकी शान है...झंडा भारतवर्ष का झंडा हिन्दुस्थान का ’ म्हणणाऱ्यांना जागे करण्यास पुरेसा समर्थ ठरावा.

दलितस्तान आणि पाकिस्तानची तुलना करताना डॉ. महंमद इक्बाल या भारतीय मुस्लिमांच्या आजवरच्या सर्वांत द्रष्ट्या नेत्याचे उद्गार misquote करण्यात आलेले आहेत असे मला स्वतःला वाटते. ‘सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ताँ हमारा ’ हे म्हणणाऱ्या इक्बालांचा हाच दृष्टिकोन लेखकाने केवळ गैरसोयीचा म्हणून दृष्टिआड केला आहे अशी साधार शंका त्यामुळेच येते.

‘ शहरांकडे चला ! ’ आणि दलितस्तानचा विचार हे या तथाकथित जाहीरनाम्यातील महत्त्वाचे मुद्दे. दलितचळवळीला डोळस दिशा लाभावी या आणि फक्त याच प्रामाणिक हेतूने मी या महत्त्वाच्या मुद्द्यांचा सविस्तर परामर्श घेतलेला आहे.

‘ छावणी हलते आहे ’ किंवा ‘ छावणी जळते आहे ’ यासारख्या कलमांमध्ये तर भडकपणा व शब्दबंबाळपणाखेरीज काही नाही. दलितांच्या सवर्णांविषयीच्या भावना किती कटू आहेत, याची सर्वांना जाणीव होते आहे. ‘ जाहीरनाम्या ’चा एकूण वैचारिक रोख व तोल बिघडवणारी ही कलमे आहेत. त्यामुळे लेखक भावनेच्या आहारी गेल्याचे जाणवते आणि वास्तव परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी असे आहारी जाणे केव्हाच फायदेशीर नाही. त्याने केवळ दिशाहीन असंतोषाला खतपाणी मिळून दलितांचीच शक्ती व्यर्थ खर्ची पडेल, निश्चित काही साधणार नाही.

पुस्तकाची छपाई ठीक आहे; पण मुद्रणदोष मात्र भयानक आहेत.

श्री. गंगाधर पानतावणे यांची प्रस्तावना योग्य व गंभीर आहे. परिशिष्टे मात्र अत्यंत उद्बोधक आहेत. त्यांची विशेष नोंद घेणे अगत्याचे आहे.

पण एकूणच ‘ जाहीरनामा ’ या प्रकाराचा मोह पडल्याने सर्व मुद्द्यांचा यथोचित विचार केलेला नाही व ‘ जाहीरनामा ’ अंमळ घाईनेच काढला आहे असे वाटते.

—चंद्रशेखर पुरंदरे

दलितांचा जाहीरनामा
लेखक : रामचंद्र क्षीरसागर
आनंद प्रकाशन
पृष्ठे ४०, किंमत ३–५०

# राजकीय झंझावातात सापडलेली दिल्ली : पृष्ठ ११ वरून

चंद्रशेखर यांचा पी. ए. गौतम भेटतो. सडसडीत बांध्याचा, नीटनेटका पोशाख करणारा गौतम आज जरा वेगळयाच गडबडीत असतो. ही गडबड राजकीय नसते. त्या दिवशी सबंध राजधानीत पाण्याचं दुर्भिक्ष्य असतं. वॉटरवर्क्समधील कामगारांच्या आकस्मिक संपामुळं पाणीपुरवठा होत नाही. दिल्लीत जागोजाग असलेल्या खासदारांच्या वसाहतींनादेखील पाणी मिळत नाही. सामान्य माणसापासून ते मंत्र्यांपर्यंत सर्वांनाच याची झळ पोचते. नागरी पुरवठामंत्री मोहन धारिया यांनादेखील पाणीपुरवठा होत नाही. त्यांच्या बंगल्यात चार बॉयलर्स असतात. त्यातील पाणी पुरवून पुरवून ते वापरतात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार महाराष्ट्रसदनात येऊन दाखल झालेले असतात. सदनचा स्टाफ कोठून तरी दोन–चार बादल्या गोळा करून त्यांच्यासाठी सोय करून ठेवतो.

जनता पक्षाच्या अध्यक्षाच्या घरीही पाण्याची टंचाई असते. गौतम त्याच्या व्यवस्थेत गुंतलेला. चंद्रशेखर यांचं '३ साउथ अॅव्हेन्यू लेन' हे घर गल्लीच्या टोकाशी आहे. बंगल्याच्या डावीकडं, मागल्या बाजूला छान हिरवळ आहे. तेथल्या एका झाडाचा खांबासारखा वापर करून त्याभोवती छोटा पिंजरा केलाय. पिंजऱ्याचं छत बांबूच्या काड्यांचं. या पिंजऱ्यात छोटे छोटे, रंगीबेरंगी पक्षी ठेवलले. चंद्रशेखर यांनी काही ससेही पाळलेले. ते हिरवळीवर दुडदुडू धावत असतात. आपल्या मालकाच्या घरात प्रचंड राजकीय उलथापालथ चालू आहे याची त्यांना जाणीव नसते.

हिरवळीवर सशांच्या सहवासात चंद्रशेखर यांची आम्ही वाट पहात बसतो. थोड्याच वेळात चंद्रशेखर येतात. शिडशिडीत बांधा, पांढरा झब्बा व धोतर हा नेहमीचा पोशाख, देशावर राज्य करणाऱ्या पक्षाचा अध्यक्ष असूनही वागणं अगदी साधं. आढ्यता अजिबात नाही. सगळं अगदी कॅज्युअल. पक्षात एवढा पेचप्रसंग निर्माण झाला असूनही त्यांच्या वागण्यात फरक पडलेला नाही. पत्रकारांशी नेहमीच्याच आपुलकीनं वागतात. आल्याआल्याच ते विचारतात, 'काय घेणार? थंड की गरम?'

'सध्या जे राजकीय वातावरण आहे त्याला अनुकूल असं मागवा!'

'अरे भाई, ठंडा लाव!' ते आज्ञा सोडतात.

राजकीय वातावरण गरमागरम नाही हेच त्यांना सुचवायचं असतं.

कोणी तरी विचारतं, 'रोगी वाचणार की नाही?' संदर्भ असतो जनता सरकारचा,

'रोगी मरणार नाही!' चंद्रशेखर चटकन उत्तर देतात.

पंतप्रधान बदलावा लागणार की नाही, याचा संदर्भ मनात बाळगून आम्ही विचारतो, 'रोग्यावर ऑपरेशन करावं लागणार की नाही?'

'ऑपरेशन केल्याशिवाय रोगी जगूच शकणार नाही! ऑपरेशन होईल की नाही, आम्ही ऑपरेशन करू शकतो की नाही हे आताच काही सांगता येणार नाही.'

अविश्वासाच्या ठरावाचं येत्या सोमवारी भवितव्य ठरलं की मग मोरारजीभाईंना बदलण्याचा प्रयत्न होणार हेच चंद्रशेखरना सूचित करायचं होतं. अविश्वास ठरावावर मतदान होण्याआधी पंतप्रधानांनी राजिनामा द्यावा असं त्या वेळी तरी वाटत नव्हतं. राजनारायण यांच्या गटात जनता पक्ष सोडून शंभर खासदार जरी सामील झाले तरीदेखील अविश्वासाचा ठराव नामंजूर होईल असं चंद्रशेखर म्हणत होते. पक्षाचं अस्तित्व धोक्यात आलंय हे ते मान्य करीत होते; परंतु परिस्थिती हाताबाहेर गेलेली नाही, असं आत्मविश्वासानं सांगत होते. शरद पवारांच्या पाठीराख्यांनी आपला पाठिंबा द्यावा व ते तो देतील असं एका प्रश्नास उत्तर देताना ते म्हणाले.

नानाजी देशमुख, रामकृष्ण हेगडे तिथं येतात. पत्रकार निघतात. हेमवतीनंदन बहुगुणा राजीनामा देण्याचं साहस करतील असं वाटत नाही असं नानाजींचं मत असतं. आम्ही निघत असतानाच शरद पवारही तिथं दाखल होतात. 'सध्याचा पेचप्रसंग हा एका पक्षापुरता पेंचप्रसंग नसून तो राष्ट्रीय पेचप्रसंग मानला पाहिजे आणि त्यामुळं वैयक्तिक राग विसरून जाऊन राष्ट्रहिताच्या दृष्टीनं विचार करायला हवा' अशी प्रतिक्रिया ते देतात.

अविश्वास ठरावावर मतदान होण्याच्या वेळी कॉंग्रेसमधील काही खासदार अनुपस्थित राहणार असं त्या दिवशी जो तो बोलत होता, संसदीय कॉंग्रेस पक्षाचे चिटणीस उन्नीकृष्णन् पत्रकार परिषद घेऊन या बातमीचा इन्कार करतात. इंदिरा कॉंग्रेसमधील सुमारे ८ ते ९ खासदारांनी (त्यात महाराष्ट्रातले दोघे असतात) श्रीमती इंदिरा गांधी यांना एक पत्र लिहून अविश्वासठरावप्रकरणी आपल्या पक्षानं व्हिप काढू नये अशी विनंती केली होती. म्हणजे त्यांना या प्रश्नावर मतस्वातंत्र्य हवं होतं. तेव्हा कॉंग्रेस पक्षाऐवजी इंदिरा कॉंग्रेसचेच दोन-चार खासदार मतदानाच्या वेळी गैरहजर राहतील असं सांगितलं जात होतं.

उद्या आणखी कोण राजीनामे देणार याबद्दल अंदाज वर्तवले जात होते. अविश्वासाचा ठराव मंजूर होईल काय अशी परिस्थिती निर्माण होऊ लागली होती. तरी सरकार वाचवावे म्हणून प्रयत्न सुरू होते.

त्याशिवाय वेगवेगळ्या राजकीय गोटात मध्यरात्र उलटून गेली तरी बैठका संपल्या नाहीत.

## तेरा जुलै

राजधानीत आजही पाण्याचा अभावच होता. त्याचे पडसाद सभागृहात उमटतात. आज शुक्रवार म्हणजे खाजगी विधेयकांच्या चर्चेचा दिवस असतो; पण ही चर्चा दुपारी साडेतीननंतर असते.

दुपारी बारा ते साडेतीनपर्यंत अविश्वासावरील ठरावाची चर्चा पुढे चालू होणार असते; पण सभागृह सुरू होताच पाण्याच्या प्रश्नावरून गोंधळ माजतो. थोड्याच वेळात सभागृहाचं कामकाज दिवसासाठी तहकूब केल्याचं सभापती घोषित करतात. जो तो पक्षातला पेचप्रसंग विसरून पाणीपुरवठ्याबद्दलच बोलत असतो. संपावर गेलेल्या कामगारांची संघटना भारतीयमजदूर संघ ही असते. माजी जनसंघाशी संबंधित ही संघटना असल्यानं त्यावर टीका होते. संपावर गेलेल्या कर्मचाऱ्यांचे वर्तन अत्यंत निर्दयी असतं. घातपाती कृत्यं त्यांनी करून ठेवलेली असतात. वेगवेगळ्या भागात पाणीपुरवठा करणाऱ्या पाइप्सची त्यांनी मोठ्या प्रमाणावर मोडतोड करून ठेवलेली असते. त्यामुळं लष्कराच्या मदतीनं पाणीपुरवठाकेंद्रं सुरू केली गेली तरी नागरिकांच्या घरोघरी पाणी पोचत नाही. साहजिकच दिल्लीकर अत्यंत संतापतात. पाण्याअभावी एखादं मूल मरण पावलं तर तुमची धडगत नाही असं दिल्लीतून निवडून आलेल्या खासदारांना लोक सांगतात. दिल्लीच्या इतिहासात असा पाणीपुरवठा तोडून टाकण्याचा प्रकार घडलेला नसतो. सगळेचजण कमालीचे प्रक्षुब्ध झालेले असतात. घातपात करणाऱ्या कामगारांना भर चौकात फटके मारले पाहिजेत अशी भाषा बोलली जाऊ लागलेली असते.

एक पत्रकार त्या वेळच्या एकूण परिस्थितीबद्दल मार्मिक शेरा मारतो. तो म्हणतो–'हे सरकार 'अनसंग, अनवेप्ट व अनवॉव्हड' जाणार' असं दिसतंय !'

शुक्रवारी सभागृह तहकूब झाल्यानं अविश्वास ठरावावरील चर्चा होऊ शकत नाही. शनिवार व रविवारी सभागृहाला सुटीच असते. तेव्हा आता सोमवारी काय ते ठरायचं होतं. आजचा दिवस धरून तीन दिवस होते. तोवर काहीही घडू शकलं असतं.

आजच्या राजिनामासत्राचे हिरो होते पेट्रोलियममंत्री बहुगुणा. दुपारी तीन वाजता ते राजीनामा सादर करणार होते अशी बातमी होती. संसदभवनाच्या आपल्या कार्यालयात बहुगुणा राजीनामापत्र तयार करीत होते. नियोजनखात्याचे राज्यमंत्री फजलूर रेहमान यांचंही मन बहुगुणांनी वळवलं होतं. पत्राचा मसुदा ते लिहू लागले–

I hereby tender my resignation from your council of ministers.

I am grateful to you for your trust and consideration extended to me during my tenure as minister of your cabinet.

With kindest regards.

फजलूर रेहमान यांच्याही राजीनामापत्रात हाच मजकूर होता राजीनामापत्रं तयार झाली तरी ठरल्याप्रमाणं तीन वाजता त्यांनी ती सादर केली नाहीत. पाच वाजता घरी या असा पत्रकारांना निरोप गेला.

सुनहरीबागरोड या सुंदर नावाच्या व दुतर्फा वृक्षराजींची रेलचेल असलेल्या रस्त्यावर पाच नंबरच्या बंगल्यात बहुगुणा राहतात. स्कूटर (दिल्लीत ऑटोरिक्षाला स्कूटर म्हणतात) टॅक्सी आदी मिळेल त्या वाहनांनी जो तो 'पाच सुनहरीबागरोड' इथं पोचतो. बंगल्याच्या पुढच्या बाजूला विस्तीर्ण हिरवळ. त्यावर बहुगुणांचे अनेक चाहते जमलेले. मोटारींची तर रीघच लागलेली. पत्रकारपरिषद हिरवळीवरच व्हायची असते. जगजीवनराम यांनी २ फेब्रुवारी १९७७ रोजी त्या वेळच्या सरकारमधून राजिनामा दिला होता. त्यानंतर जगजीवनराम यांच्या बंगल्याच्या आवारातील हिरवळीवर रोज पत्रकारपरिषद व्हायची. त्याचीच आठवण झाली.

पत्रकारांची फार गर्दी झालेली. खुर्च्या अपुऱ्या पडल्या तेव्हा अनेकांनी हिरवळीवरच बैठक मारली. छायाचित्रकार, टी. व्ही. कॅमेरेवाले मोक्याच्या जागी उभे होते. पाच वाजून गेले तरी बहुगुणा येईनात. त्यांच्यासाठी खुर्ची राखून ठेवली होती. शेजारच्या खुर्चीत हरियानाचे मुख्यमंत्री देवीलाल बसले होते. चरणसिंगांचे ते अत्यंत विश्वासू सहकारी. राजकीयदृष्ट्या बहुगुणा हे जगजीवनराम गोटातले म्हणजे चरणसिंगविरोधी गटाचे. त्याच चरणसिंगांचे निकटवर्ती देवीलाल आज मात्र बहुगुणांच्या मांडीला मांडी लावून बसले होते !

बहुगुणा पत्रकारपरिषदेत निघणार तोच फोन खणखणला. जगजीवनराम यांचा फोन होता. राजीनामा देऊ नका असा त्यांनी सल्ला दिला; परंतु आता उशीर झाला होता. पत्र पंतप्रधानांकडे रवाना झालं होतं व त्याची प्रत पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर यांच्याकडे घेऊन दूत गेलाही होता.

सव्वापाचच्या सुमारास बहुगुणा पत्रकारपरिषदेत प्रगट झाले. त्यांच्याबरोबर फजलूर रेहमानही होते. बहुगुणा आपल्या सी. एफ. डी. च्या नऊजणांना घेऊन बाहेर पडले होते. गेल्या वर्षी सप्टेंबरात जनता पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीनंतर बहुगुणांना अजून सी. एफ. डी. (कॉंग्रेस फॉर डेमॉक्रसी) आहे का? असं विचारलं असता त्यांनी ती वेगळ्या अर्थानं अस्तित्वात आहे असं सांगितलं होतं– 'सी' – म्हणजे केमिकल्स, 'एफ' – म्हणजे फर्टिलायझर्स व 'डी' – म्हणजे डिफेन्स. केमिकल्स व फर्टिलायझर्स ही दोन्ही खाती बहुगुणांकडे व डिफेन्स बाबूजींकडं असतं. बाबूजींनी सी. एफ. डी. स्थापन केलेली. परंतु आता खऱ्या अर्थानं सी. एफ. डी. राजकीय घटक म्हणून अस्तित्वात आहे याचं प्रत्यंतर बहुगुणा देतात. सी. एफ. डी. व भालोद यांचं विळ्याभोपळ्याचं सख्य होतं; परंतु आता मात्र ते गळ्यात गळा घालून मिरवीत असतात. बहुगुणा व रेहमान यांच्याबरोबर माजी भालोदचे राम किंकर, झुल्फिकारुल्ला व नरसिंग यादव या राज्यमंत्र्यांनीही राजिनामे दिलेले असतात. नरसिंग यादव या पत्रकारपरिषदेला हजर असतात. सौगत रॉय व इतर कॉंग्रेसवाल्यांनीही पत्रकार परिषदेला गर्दी केलेली; ही बाब महत्त्वाची होती.

बोधिवृक्षाखाली भगवान गौतमबुद्धाला ज्ञान प्राप्त झालं तसं अविश्वास ठरावाच्या वृक्षाखाली बहुगुणांना आपला जनता मंत्रीमंडळात कोंडमारा होतोय याचा साक्षात्कार झालेला. तोंडावर दोन हात ठेवून ते म्हणतात, 'माझं असं एक व्यंगचित्र प्रसिद्ध झालंय ते खरंच आहे. गेली अडीच वर्षं माझी अशी अवस्था होती.' सगळी लोकशाहीमूल्यं कोसळली आहेत असंही ते जाहीर करतात. जनता पक्षाच्या घटनेतील पाचव्या कलमात जनता पक्षाशी विसंगत ध्येयधोरणे असलेल्या संघटनेचे सदस्यत्व जनता पक्षीय सदस्याला घेतायेणार नाही असे म्हटले आहे. हे कलम सस्पेंड केलेले होते असं सांगून बहुगुणा म्हणतात, 'हे कलम ताबडतोब अंमलात आणा व दुहेरी निष्ठेचा प्रश्न निकालात काढा असं मी तीन दिवसांपूर्वी चंद्रशेखर यांना सांगितलं. चंद्रशेखर यांनी काल रात्री पक्षातील सर्व

घटकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्यांची एक बैठक बोलाविली. चार तास चर्चा झाली; पण काही तोडगा निघाला नाही. मी काल पंतप्रधानांनाही भेटलो व दुहेरी निष्ठेचा प्रश्न निकालात काढण्याची विनंती केली. उशीर लावता कामा नये. तत्काळ निर्णय घेतला तर पक्ष अजून सावरू शकेल असंही म्हणालो; पण त्यावर ते म्हणाले, मी पत्र लिहीन. आता अशा वेळेला पत्र लिहून हा प्रश्न सुटण्यासारखा आहे का ?'

बहुगुणा पक्के वस्ताद ! नसानसात राजकारण मुरलेलं. बोलणं कावेबाज. मनात काय चाललं आहे याचा पत्ता लागू देणार नाहीत. वागणं नाटकी. त्यांना नटराजच म्हणतात ! दिलेला शब्द पाळतीलच याची खात्री नाही. उत्तरेकडील राज्यावर चरणसिंग, बाबू जगजीवन राम व बहुगुणा यांचा होल्ड आहे. एके काळी पंतप्रधान होण्याची मनीषा बाळगणारे बहुगुणा राजकीय डावपेचात निष्णात आहेत. तर असे हे बहुगुणा सांगत असतात, 'विद्यार्थी, कामगार, सुशिक्षित वर्ग अल्पसंख्य कोणीही जनता कारकीर्दीबद्दल समाधानी नाही. सरकारमध्ये असलेले सोडून बाकी सर्व असमाधानी आहेत. मलाही यापासून सुटका करून घ्यायची होती. मी लोकांची क्षमा मागतो.'

बाबू जगजीवनराम माझे अत्यंत घनिष्ट सहकारी आहेत. सध्याच्या राजकीय परिस्थितीबद्दलचं त्यांचं विश्लेषण व माझं विश्लेषण यात फरक आहे. तेव्हा मला अत्यंत अवघड मनस्थितीत त्यांची संगत सोडावी लागते आहे' असंही ते म्हणतात.

बहुगुणांनी फक्त मंत्रिपदाचा राजिनामा दिलेला असतो. जनता पक्षाचा राजीनामा दिला की नाही हे उद्या सांगेन असं ते म्हणतात. तेव्हा पत्रकार म्हणतात 'आताच काय ते सांगा की !' त्यावर ते हसत उत्तरतात, 'उद्या तुम्हाला काही काम नको का ?' आणि पत्रकारपरिषद संपते. एरवी मंत्री असताना ज्यांना भेटणं मुश्किल होतं तेच बहुगुणा आता दाराशी उभं राहून प्रत्येकाशी हस्तांदोलन करून त्यांचा निरोप घेत असतात.

राजनारायण यांचे उद्योग चालूच असतात. राष्ट्रपतींना पत्र लिहून मोरारजी देसाईंचे सरकार बरखास्त करावे अशी विनंती ते करतात. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष अविश्वास-ठरावाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतो. त्यामुळं परिस्थिती आणखीच नाजूक होते. पंतप्रधान मोरारजी देसाईंनी सभागृहात अविश्वासाचा ठराव मंजूर होऊन सरकार पडल्यावर राजीनामा देण्यापेक्षा आताच राजीनामा दिला तर अविश्वासाच्या ठरावाचं प्रयोजनच उरणार नाही असा मतप्रवाह जोर धरू लागतो; परंतु हे जमणार कसं ? मांजराच्या गळ्यात घंटा बांधायची कोणी ?

दरम्यान समाजवादी गोटात जोरात विचारमंथन चालू असतं. एसेम, नानासाहेब गोरे, मधु दंडवते यांच्या घरी तळ ठोकून असतात. आपल्या सर्व समाजवादी खासदारांना एकत्र ठेवण्याकरिता त्यांचे निकराचे प्रयत्न चालू असतात.

जनता सरकार क्षणाक्षणानं, मिनिटामिनिटनं आपल्या मृत्यूच्याजवळ जात असतं.

जंतरमंतर रोडवरील जनता पक्षाच्या मध्यवर्ती कचेरीकडे कोणी फिरकत नसतं. बंगल्या-बंगल्यांवर बैठका झडत असतात. महागडं पेट्रोल किती खर्च होत असेल याचा अंदाज बांधणं कठिण ! जनता सरकारच्या रोग्याला घरघर लागलेली असते. ऑपरेशनची घाई करायला हवी असते.

मोरारजी देसाईंनी आधीच राजीनामा द्यावा ही सूचना जनता पक्षाच्या सर्व गोटात चर्चिली जात असते. माजी जनसंघनेत्यांनी जर या सूचनेला होकार दिला तर काम जमण्यासारखं होतं. वाजपेयी, नानाजी, अडवाणी, सुंदरसिंग भंडारी, कुशाभाऊ ठाकरे एकत्र बसून विचारविनिमय करतात. ११ अशोकरोड इथं ही बैठक होते. जनता पार्लमेंटरी बोर्डाची बैठक दुसऱ्यादिवशी बोलाविण्यात आलेली असते. त्या बैठकीत देसाईंच्या राजिनाम्याचा आग्रह धरायचा बेत पक्का केला जातो.

पण अनेक प्रश्नचिन्हं उभी असतात. कधीच संपणार नाहीत असं वाटायला लावणारे हे प्रश्न असतात.

## चौदा जुलै

एक, सफदरजंगरोड हे पंतप्रधानांचं निवासस्थान बाहेरून भव्य वाटत नाही आणि ते तसं नाहीही. ते रमणीय मात्र आहे. आत शिरताच ओळीनं पाच-सात उंच अशोकवृक्ष आहेत. त्यांची पानं लुसलुशीत नि ताजीतवानी. ही पानं खाली जमिनीला स्पर्श करतात. त्याच्या बाजूला हिरवळ आहे. समोरच्या बाजूला एक छोटासा शामियाना उभारलेला. तिथं सर्वसामान्य लोकांना पंतप्रधान भेटतात. एकदा निवासस्थानाच्या आवारात गेलं की, तेथून बाहेरचा मोठा रस्तादेखील दिसत नाही अशी बंगल्याच्या कडेकडेनं झाडं लावलेली आहेत. एखाद्या अभयारण्यातील पर्णकुटीत शिरावं तसंच वाटतं. आज मात्र हे निवासस्थान लोकशाहीचं अभयारण्य वाटत नाही. जनता पक्षापुढं निर्माण झालेल्या गहिऱ्या पेचप्रसंगांतून मार्ग काढण्याचा प्रयत्न तिथं होणार आहे. जनता पार्लमेंटरी बोर्डाची तिथं बैठक भरायची आहे. नऊ वाजायला आलेले. एकेक सदस्य येऊन दाखल होतात. चंद्रशेखर, वाजपेयी, बाबूजी, जॉर्ज फर्नांडिस, चरणसिंग आणि अर्थातच पंतप्रधान हे सहा जण पार्लमेंटरी बोर्डाचे सदस्य. त्यांपैकी चरणसिंग येत नाहीत. प्रकृती बरी नाही असं त्यांनी कळवलेलं. खरं तर हा त्यांचा राजकीय आजारच असतो म्हणा. तेव्हा पंतप्रधान, वाजपेयी, फर्नांडिस, बाबूजी, चंद्रशेखर आणि रामकृष्ण हेगडे, नानाजी देशमुख हे जनता पक्षाचे चिटणीस, असे जमलेले— बैठक सुरू होते. पंतप्रधानांनी राजिनामा द्यावा म्हणजे पर्यायानं सरकारनंच राजिनामा द्यायचा. त्यामुळं अविश्वास-ठराव व्यर्थ ठरेल व मग नवा नेता निवडला गेला तर जनता पक्षाचंच सरकार राहू शकेल असं जॉर्ज फर्नांडिस मोरारजीभाईंना सांगतात. वाजपेयी व बाबूजी या सूचनेला पुष्टि देतात; परंतु मोरारजीभाईंना ही सूचना अमान्य असते. ऐंशी ते शंभर अधिक मतांनी अविश्वासाचा ठराव फेटाळला जाईल; तेव्हा राजीनामा द्यायची काय गरज ? असा सवाल ते करतात. त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला जातो; परंतु त्याला यश येत नाही. तासाभरात बैठक संपते. मोहन धारिया यांनी

एक पत्र लिहून मोरारजीभाईंना राजिनामा देण्याची विनंती केलेली असते.

पेचप्रसंग आणखीच गडद होतो. बाबूजी प्रक्षुब्ध होतात, जॉर्ज फर्नांडिस संतापतात. चंद्रशेखरनाही पंतप्रधानांनी राजिनामा द्यावा असं वाटत असतं; परंतु पक्षाध्यक्ष असल्यानं ते तशी पार्लमेंटरी बोर्डाच्या बैठकीत भूमिका घेत नाहीत. पंतप्रधानांच्या नकारामुळं घटनांची एक मालिकाच सुरू होते. फर्नांडिस पुन्हा रात्री पंतप्रधानांना भेटून राजिनामा द्यायला विनवतात; परंतु त्यांचा नकार ठाम असतो. बाबूजी पंतप्रधानांना एक मोठं पत्र पाठवतात. बाबूजींनी राजिनामा द्यावा असा दबाव त्यांचे चाहते त्यांच्यावर आणत असतात; परंतु अविश्वासाचा ठराव आला असताना मंत्रिमंडळाचा एक सदस्य या नात्यानं आपण त्याला विरोध केलाच पाहिजे अशी विवेकी भूमिका ते घेतात. मात्र मंत्रिमंडळाचा सदस्य म्हणून मी ठरावाला विरोध करणार आहे, त्याचा अर्थ मला माझ्या पदाला चिकटून राह्यचं आहे असा केला जाऊ नये, असं बाबूजी आपल्या पत्रात स्पष्ट करतात. सरकारच्या क्षमतेबद्दल लोकांच्या मनात शंका निर्माण झाली आहे असं म्हणून त्यांनी या पत्रात मोरारजीभाईंवर व सरकारवर प्रखर टीका केलेली असते. या पत्रामुळं मोरारजीभाई चिडतात. आपला सल्ला न घेता असं पत्र पाठवलं यामुळं चंद्रशेखरही बाबूजींवर नाराज होतात.

दिवसभर चर्चांची आवर्तनं चालूच असतात; परंतु मार्ग काही निघत नाही. रात्री अकरा वाजता चंद्रशेखर यांच्या घरी महत्त्वाची बैठक भरते. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, राजस्थान, हिमाचल प्रदेश व हरियाना या सहा राज्यांचे मुख्यमंत्री, वाजपेयी, धारिया, नानाजी देशमुख, रामकृष्ण हेगडे, विजयसिंग नाहर, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, सुंदरसिंग भंडारी, दिग्विजय नारायण सिंग, मुरली मनोहर जोशी, कृष्णकांत, रामधनप्रभृती हजर असतात. दीड वाजेपर्यंत बैठक चालते.

माजी समाजवाद्यांची एक वेगळी बैठक भरून जॉर्ज फर्नांडिस व एस. एम. जोशी या दोघांनी मिळून आपल्या गटाची भूमिका निश्चित करावी असा निर्णय घेतला जातो. सकाळी एस. एम. जोशी व ना. ग. गोरे यांनी पंतप्रधानांची भेट घेऊन त्यांचं मन वळवायचा प्रयत्न करावा असंही ठरतं.

दरम्यान शे. का. पक्षानं अविश्वास ठरावाला आपण पाठिंबा देऊ असं जाहीर करून टाकलेलं असतं. संकट असं चोहीकडून वाढत होतं.

गेल्या सहा दिवसांत सर्वांत जास्त अनिश्चिततेचं वातावरण त्या दिवशी होतं. निसर्गानंही त्या दिवशी राजकारणाशी सूर जमवला होता. कारण त्या दिवशीची हवा अस्थिरच होती. कधी उष्मा तर कधी गारवा अशी.

त्या रात्री काळोखात उभा असलेला लाल किल्लाही या भयकारी अनिश्चित वातावरणात अधिकच सुन्न, एकाकी वाटत होता.

रात्रीचे अकरा वाजायला आले होते. माझ्या मित्रानं स्कूटर संसदभवनाच्या आवारातच ठेवली होती. ती घ्यायला जाणं आवश्यक होतं. लोकशाहीचा सर्वोच्च आविष्काराचं प्रतीक असलेली ती इमारतही रात्रीच्या वेळी भेसूर वाटत होती. तिची कलात्मक वास्तू कोमेजल्यासारखी दिसत होती. माझ्या मित्राला चिंता होती ती त्याच्या स्कूटरची ! चोरीला गेली तर पंचाईत ! मी त्याला म्हटलं, 'तिथं एवढे सुरक्षाखात्याचे पहारेकरी आहेत तेव्हा स्कूटर चोरीला जाण्याची यत्किंचितही भीती नाही. संसदभवनातून एकच गोष्ट चोरीला जाऊ शकते व ती म्हणजे लोकशाही !'

२६ जून १९७५ रोजी आणीबाणी आली त्या दिवशी या वास्तूतून दुसऱ्या कशाची चोरी झाली होती ?

## पंधरा जुलै

शोकपूर्ण शेवट हे नेहमीच नाटयमय असतात. नऊ जुलैला जनता-पक्षात अनेक पेचप्रसंग सुरू झाले. त्यांतल्या सर्वात मोठ्या पेचप्रसंगाचा शेवट आज व्हायचा होता. सकाळपासून वेगानं घटना घडत गेल्या. राजनारायण यांनी नांदी केव्हाच म्हटली होती. आता शेवटचा प्रवेश उरला होता. सरकारच्या मृत्यूघंटेचा निनाद ऐकू येऊ लागला होता. आपल्याच पावलांनी मृत्युला मिठी मारण्याचा हा उद्योग होता, दुसऱ्या स्वातंत्र्याला बळी देण्याची तयारी चालू झाली. मंत्र म्हटले जाऊ लागले. राजिनाम्याचं अखेरचं पर्व सुरू झालं. आदल्या दिवशी पोलादमंत्री बिजू पटनाईक व गृहखात्याचे राज्यमंत्री धनिकलाल मंडल यांनी राजिनामे दिले होते. आजचे राजिनामा-सम्राट होते जॉर्ज फर्नांडिस; पण ते दिवसाच्या मध्यान्ही-पर्यंतच. कारण संध्याकाळी खुद्द मोरारजीभाईंनीच राजिनामा दिला !

अविश्वास-ठरावावर मतदान व्हायला आता एकच दिवस उरला होता. त्यामुळं जे काही घडायचं ते आजच घडणार होतं. सकाळीच एस. एम. जोशी व ना. ग. गोरे पंतप्रधानांना जाऊन भेटले. राजिनामा देऊन पक्षाची इभ्रत वाचवा असं त्यांनी पुन्हा एकवार विनवलं. 'अविश्वास ठराव चर्चेला असताना मी राजिनामा देणार नाही! मला जनता संसदीय पक्षाने नेतेपदी निवडून दिलं आहे. तेव्हा मी रहावं की नाही हे ठरविण्याचा अधिकार संसदीय पक्षाचा आहे. अविश्वास ठरावाचा एकदा निकाल लागला की, मग संसदीय पक्षाची बैठक बोलवा. त्यात माझ्या बाजूने ६० टक्के व माझ्याविरुद्ध ४० टक्के मते पडली तरी ४० टक्के सदस्य माझ्याविरुद्ध आहेत हे लक्षात घेऊन मी नेतेपदाचा राजिनामा देईन !' असं मोरारजी-भाईंनी दोघांना सांगितलं.

एसेम व गोरे हताश होऊन परतले. नंतर बाबूजींनी मोरारजी-भाईंशी पाऊण तास चर्चा केली; पण त्यांनाही यश आलं नाही.

जॉर्ज फर्नांडिस यांच्या '९, मोतीलाल नेहरूमार्ग' या निवासस्थानी धावपळ चाललेली होती. त्यांचा चिटणीस रवि नायर सर्व पत्रकारांना फोनवरून आमंत्रण देत होता. फर्नांडिस यांनी त्या दिवशी दुपारी बारा वाजता आपल्या निवासस्थानी पत्रकारपरिषद बोलावली होती.

रेल्वेमंत्री मधू दंडवते '८, कृष्णमेननमार्ग' इथं राहतात. तेथे एसेम, गोरे, सुरेंद्र मोहन, दंडवते यांची चर्चा चालू असते. दंडवते

नुकतच आजारातूनच उठलेले, आपल्याच पक्षातल्या लोकांनी पक्षाचा घात करावा यामुळं ते विषण्ण झालेले. लोकसभा व राज्यसभेतील मिळून एकूण पस्तीस खासदार माजी समाजवादी पक्षाचे आहेत. त्यांपैकी तेवीस जणांचा पाठिंबा मिळवण्यात एसेम, दंडवते, गोरे, सुरेंद्र मोहन यशस्वी होतात. माजी समाजवाद्यांच्या अधिवेशनात अवघ्या सात दिवसांपूर्वी जनता पक्षातच राहण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्या भूमिकेपासून ढळायचं नाही, असा निर्धार या समाजवादी नेत्यांनी व त्यांच्या तेवीस पाठिराख्यांनी व्यक्त केलेला असतो; परंतु जॉर्ज फर्नांडिस व मधु लिमये यांचा वेगळाच विचार चालू असतो.

बारा वाजता फर्नांडिस यांच्या घरी एकच गर्दी लोटते. जमिनीवर, खिडकीत व टीपॉयवर देखील मंडळी बसतात. फर्नांडिस घरातच असतात; पण पत्रकारपरिषदेत बरोबर बारा वाजता येत नाहीत. दंडवते यांच्या घरी फर्नांडिस हे राजिनामा देण्याच्या तयारीत आहेत अशी कुजबूज लागलेली असते. तेथे परराष्ट्रखात्याचे राज्यमंत्री समरेंद्र कुंडू यांना तातडीनं फर्नांडिस यांच्या घरी पाठवलं जातं. एसेम व फर्नांडिस यांनी मिळून काय तो निर्णय घ्यावा असं कालच्या बैठकीत ठरलेलं असतं; परंतु एसेमना न विचारताच फर्नांडिस यांनी निर्णय घेतलेला असतो. हे बरोबर नाही. जरा थोडा वेळ थांबा असं कुंडू फर्नांडिसना सांगतात. त्यावर फर्नांडिस उत्तरतात 'मला तुम्ही 'ड्रॅग' करता आहात. मी माझं काय ते ठरवलंय!'

सव्वाबाराला जॉर्ज पत्रकारपरिषदेत हजर होतात. त्यांच्याबरोबर पर्यटनमंत्री पुरुषोत्तम कौशिक, फर्नांडिसप्रमाणेच लोकसभेत सरकारचं समर्थन करणारे उग्रसेन, मृणाल गोरे असतात. मृणाल गोरे त्याच दिवशी सकाळी अमेरिकेहून आलेल्या असतात. फर्नांडिसच्या शेजारी त्यांच्या पत्नी लैला फर्नांडिसही बसलेल्या असतात.

फर्नांडिस यांनी पंतप्रधानांना पाठवलेल्या राजिनामापत्राच्या प्रती वाटल्या जातात. सरकारने बहुमताचा पाठिंबा गमावला असल्यानं सरकारनं राजिनामा द्यायला हवा असं माझं मत आहे असं पत्राच्या आरंभीच त्यांनी म्हटलेलं असतं. या पत्रात अखेरीस ते म्हणतात–

Since you are insisting on holding on to the government which has lost majority support, I have no option but to resign from the government. I did my moral duty to defend the government in the House when the government enjoyed majority support. I am now doing my moral duty by resigning from it when it has lost its majority support and, therefore, its right to rule. I am also herewith submitting my resignation from the Janata Parliamentary Party.

With kind regards,

Yours sincerely,
George Fernandes

फर्नांडिस यांनी १२ नोव्हेंबर १९७८ लाही राजिनामा दिला होता. त्या पत्राची प्रतही त्यांनी पत्रकारांना दिली.

फर्नांडिस यांचा राजिनामा हा मोरारजीभाईंच्या सरकारला फार मोठा तडाखा होता. तीन दिवसांपूर्वी सरकारचं समर्थन करणारे मंत्री राजिनामा देतात ही फार गंभीर घटना होती. आदल्या दिवशी बाबूजींनी लिहिलेलं पत्र व आज फर्नांडिस यांनी दिलेला राजिनामा या घटना मोरारजीभाईंच्या राजिनामा न देण्याच्या विचारात बदल घडवून आणतात. त्या दिवशी दुपारी एक वाजता त्यांनी आपल्या मनोमन तसा निर्णय घेऊन टाकलेला असतो.

मग एक सफदरजंगरोडवरील पंतप्रधानांच्या कचेरीत एकच गडबड उडते. तीन वाजता पंतप्रधान एक बैठक बोलावतात. त्या बैठकीला अजून मंत्रिमंडळात असलेले मंत्री, जनता पक्षाचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि काही महत्त्वाचे खासदार यांना बोलावलेलं असतं. कार्यालयातून भराभर फोन जोडले जातात आणि बैठकीचं आमंत्रण दिलं जात असतं. अखेर पंतप्रधान राजीनामा द्यायला तयार आहेत हे तेव्हाच कळून चुकलेलं असतं. सरकारचा मृत्यू समीप येऊन ठाकलेला असतो. तीन वाजता बैठक सुरू होते. सरकारनं बहुमत गमावलंय तेव्हा मी राजीनामा द्यायचं ठरवलं आहे असं बैठकीच्या प्रारंभीच पंतप्रधान सांगतात. ते नेहमीसारखेच शांत, अविचल असतात.

चाळीस मिनिटांत बैठक आटोपते. बाहेर ताटकळत उभ्या असलेल्या पत्रकारांची उत्सुकता शिगेला पोचलेली असते. माहिती व नभोवाणीमंत्री लालकृष्ण अडवाणी बाहेर येतात. पत्रकार त्यांना गराडाच घालतात. अडवाणी राजीनाम्याबद्दल काही बोलत नाहीत. सध्याच्या पेचप्रसंगाची बैठकीत चर्चा झाली. आज रात्री साडेनऊ वाजता ते राष्ट्राला उद्देशून आकाशवाणी व दूरदर्शनवरून भाषण करतील एवढंच अडवाणी सांगतात. बैठकीला कोणकोण हजर होतं त्यांची नावं देतात. अडवाणी नेहमीसारखे प्रसन्न वाटत नसले तरी ते कमालीचे संयमी वाटतात. त्यांच्या आवाजातून गांभीर्याची छटा डोकावत असते.

पंतप्रधान राष्ट्राला उद्देशून भाषण करणार याचा अर्थच ते राजीनामा देणार असा होता. पंतप्रधान सायंकाळी साडेसहाला राष्ट्रपतींना भेटणार आहेत अशी बातमी तिथंच समजते.

हवा कुंद असते. आकाश झाकाळून गेलेलं. बंगल्याभोवतालचा तो रमणीय परिसर उदासतेच्या धुक्यात लपेटून गेल्यासारखा वाटतो.

दरम्यान राजनारायण, एस. एन. मिश्रा पत्रकारांना भेटतात व

अविश्वास ठराव सभागृहापुढं असताना सरकारनं राजीनामा दिला तर लोकसभेची बेअदबी होईल असं सांगतात. मधु लिमये व त्यांचे सात-आठ साथीदार दुसऱ्या एका पत्रकारपरिषदेत पक्ष सोडल्याची घोषणा करतात. पक्षाचं विघटन झालं पाहिजे असं सांगतात.

पक्ष क्षणाक्षणानं कोसळत असताना त्याच पक्षाच्या नेत्यांना होणारा आनंद बघवत नाही. तो मनाला सुन्न बनवतो. हा आसुरी जल्लोष वाटतो.

सायंकाळी ६ वाजून २५ मिनिटांनी डी एच बी ५६०० या क्रमांकाच्या आपल्या नेहमीच्या पांढऱ्या अॅम्बॅसॅडरमधून मोरारजी देसाई राष्ट्रपतिभवनाकडे निघतात, आपल्याच लोकांनी हत्या केलेल्या सरकारचं कलेवर घेऊन.

साडेसहा वाजता राष्ट्रपतिभवनात ते पोचतात. राष्ट्रपतींच्या खाजगी ड्रॉइंगरूममध्ये (तिला एडविनारूम म्हणतात) दोघांची भेट होते. आत जाताना ते या देशाचे पंतप्रधान असतात; पण तेथून ४० मिनिटांनंतर (७ वाजून १० मिनिटांनी) बाहेर पडताना ते पंतप्रधान नसतात ! काळजीवाहू सरकारचे पंतप्रधान ही केवळ तांत्रिक बाब असते. बाहेर पडताना पत्रकार त्यांना विचारतात,

'हॅव यू रिझाइन्ड ?'

'आय हॅव रिझाइन्ड !'

अठ्ठावीस महिन्यांची एक कारकीर्द संपलेली असते. मोठ्या परिश्रमानं मिळवलेलं दुसरं स्वातंत्र्य पोरकं झालेलं असतं. जनता पक्षाच्या निर्मितीचा वैभवशाली ललाटलेख लिहिणाऱ्यांपैकी काही जणांनीच त्याचा मृत्युलेखही लिहून टाकलेला असतो.

ज्या राजघाटावर शपथ घेऊन लोकशाहीची दिंडी घेऊन जनता सरकारनं प्रवास सुरू केला त्याच सरकारनं ही दिंडी निगमबोध घाटावर आणून पोचविली होती !

राजघाट ते निगमबोधघाटापर्यंत झालेल्या या शोकसफरीमागं दडलेलं नागडं-उघडं राजकारण अधिकच सुन्न करणारं होतं.

एक पंतप्रधान हरले होते आणि उगवत्या सूर्याला नमस्कार करणाऱ्यांच्या मोटारी आता चरणसिंग व बाबू जगजीवनराम यांच्या घरांकडं निघाल्या होत्या.

अनेक राजवटी उभ्या राहताना आणि पत्त्याच्या बंगल्याप्रमाणं कोसळताना पाहणारी यमुना मात्र शांत होती. □

---

# पुढील अंकी

# शोध नेत्याचा

१५ जुलैला मोरारजी देसाई सरकार अस्तंगत झालं,
आणि उगवत्या सूर्याला नमस्कार करणाऱ्यांच्या मोटारी
जगजीवनराम, चरणसिंग यांच्या घराकडे वळल्या.

सर्वच राजकीय पक्षांची नामुष्की अशी की, त्यांना नेताच मिळेना.

कधी नेता आहे तर पाठीराखे नाहीत,
पाठीराखे आहेत तर नेता नाही.

स्वार्थाने आणि जबरी महत्त्वाकांक्षेने पेटलेल्यांना
स्वतःखेरीज दुसरा नेताच दिसेना.

विविध राजकीय गोटातील नेता शोधण्याच्या मोहिमेचा
सत्तेसाठी पत्करण्यात येणाऱ्या लाचार तडजोडींचा
विस्तृत वृत्तांत.

जितका रोचक,
तितकाच या सत्तास्पर्धेचा वीट आणणारा

# झंझावातानंतर चक्रावून गेलेली दिल्ली

## संध्याकाळचे पुणे : पृष्ठ ४ वरून

त्यांनी पुन्हा त्या यादीला चाळणी लावली तरी तीत बालगंधर्व राहिलेच!

'बालगंधर्व यांचा जन्म दि. २६।६।१८८८ साली झाला. बालगंधर्व ही पदवी त्यांना लोकमान्य टिळकांनी १८९८ साली म्हणजे वयाच्या दहाव्या वर्षी दिली. इ. स. १९०५ साली म्हणजे वयाच्या सतराव्या वर्षी गुरुद्वादशीच्या मुहूर्तावर त्यांनी नाटकमंडळीत प्रवेश केला. तेव्हापासून आपली गंधर्व नाटकमंडळी १९३४ साली विसर्जित करीपर्यंत सतत एकोणतीस वर्षे त्यांनी रंगभूमीवर एकछत्री राज्य केले; पण कधी स्वतःचा बकवा नाही, आपली शेखी मिरवली नाही. संपत्ती-कीर्ति–कर्ज–आपत्ती सर्वच त्यांच्याकडे चालत आलं.'

मंगरूळकर पुढे म्हणाले, '१९०५ साली नाटकमंडळीत प्रवेश केल्यावर बालगंधर्वांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा १९११ सालचा येतो. मार्च १९११ मध्ये 'मानापमाना'चा पहिला प्रयोग झाला. या नाटकाने मराठी रंगभूमीवर नवा पडदा उघडला. त्याला कारण गोविंदराव टेंबे झाले; पण गळा बालगंधर्वांचा होता गोविंदरावांनी अगदी स्वतःच्या चाली यातील गाण्यांना दिल्या. 'प्रेम सेवा शरण' हे गाणे त्याचे उदाहरण आहे. या नाटकाने भामिनी आणि बालगंधर्व असे समीकरण झाले. मानापमानाचे वेळी सुरू झालेली रंगभूमीवरची गायकी ही, विद्याहरण नाटकात परिपक्वतेला गेली. 'मधु मधुरा तव गिरा' हे एकच पद याची साक्ष देईल. रस, ताल, शब्द, सूर या कुठल्याही दृष्टीने त्यात उणीव नाही. 'एकच प्याला'चे वेळेस व स्वयंवराचे वेळेस बालगंधर्वांची गायकी पौर्णिमेप्रमाणे शांत व शीतल प्रकाशत होती, तर द्रौपदी नाटकात त्यांचे गाणे परमोच्च बिंदूला पोहोचले. इतक्या परमोच्च बिंदूला की, यापुढे उतारच हवा. स्वयंवरामधे आढळून येतं की, मराठी रंगभूमीवर गायकी गाण्यानं ठाम ठाणं बसवलं.

□

मंगरूळकरांनी आपण १९२६ साली बालगंधर्वांना प्रथम पाहिले असे सांगितले. ते ऐकल्यावर पुष्कळ श्रोते आपणही प्रथम बालगंधर्वांना केव्हा पाहिले याची आठवण करू लागले असतील. निदान मी आठवू लागलो. इ. स. १८८८ साली बालगंधर्वांचा जन्म झाला तेव्हा तर मी नक्कीच जन्माला आलो नव्हतो. १९०५ साली त्यांनी नाटकमंडळीत प्रवेश केला तेव्हाही माझा जन्म झाला नव्हता. १९११ साली मानापमान रंगभूमीवर आले तेव्हा माझे जन्मवर्ष जवळ येत चालले होते आणि सर्व वैभव भोगून १९३४ साली गंधर्वकंपनी विसर्जित झाली तेव्हा मी फक्त एकोणीस वर्षांचा होतो. असे दिसते की, माझी आणि बालगंधर्वांची नेहमी चुकामूक झाली. म्हणजे बालगंधर्व ऐनभरात होते तेव्हा मी त्यांना कधी पाहिले नाही. एक तर आमच्या घरी नाटकांचा नाद कुणाला नव्हता व दुसरे माझ्या वयाची मुले तेव्हा नाटकाला वगैरे जात नसावीत. तशी जात असती तर, इतर मुले जातात म्हणून जसा आज मुलं सिनेमाचा हट्ट घेतात तसा मी नाटकाचा हट्ट घेतला असता; पण नाटक म्हणून काही पहाण्याजोगं असतं याची कल्पनाच आम्हाला नव्हती, तर बालगंधर्वांची कुठून असणार? पुढे पोट भरण्याच्या खटाटोपात पंधरा वर्षे गेली व त्यात १९३४ सालही गेले. गंधर्वमंडळी विसर्जनही पावली होती.

त्यामुळेच मी गंधर्वांना प्रथम पाहिले ते फार उशिरा. सांगलीला मराठी नाटकाचा शतसांवत्सरिक उत्सव झाला तेव्हा. एक तर बालगंधर्व तेव्हा जरा लठ्ठ व उतारही दिसू लागले होते. बहुतेकांना बालगंधर्वांच्या गोड आठवणी असतात. माझ्या बायकोला तशी आहे. 'गंधर्व आता म्हातारा होईल. अजून तो चांगलं सोंग आणताय तोपर्यंत पाहून घ्या!' असे म्हणून ती नऊ वर्षांची असताना तिच्या वडिलांनी तिला गंधर्वांच्या नाटकाला नेलं होतं. तिच्या वडिलांना व आईला दोघांनाही गंधर्वांच्या नाटकाचा शोक होता. नाटकाला जाताना शालू हवा, गजरा हवा, अत्तराचा फाया हवा, नाटकाचे पुस्तक हातात हवे असे तेव्हाचे संकेत असत. हौशी लोकांचा तो काळ होता.

गंधर्वांची माझी पहिली आठवण अशी सुखाची नाही. सांगलीच्या शतसांवत्सरिक उत्सवातील एका नाटकात बालगंधर्वांनी काम केलं. आम्ही तेव्हा मुंबई मराठी साहित्यसंघाचे डॉ. भालेराव यांच्या आधिपत्याखाली मुंबईहून स्पेशल डबा करून या उत्सवास गेलो होतो. उत्सवासाठी प्रचंड मांडव उभारला होता. खुर्च्यांच्या रांगांच्या अगदी मागे वासे रोवून गॅलरीही केली होती. या गॅलरीवर खुर्च्या टाकल्या होत्या, तशाच गॅलरीखालीही खुर्च्या मांडल्या होत्या. ज्या दिवशी बालगंधर्वांचे नाटक होते त्या दिवशी सकाळी चिकार पाऊस पडला. ते १९४२ साल असावे. बालगंधर्व उतार दिसू लागले असले तरी तरुणपणाची चुणुक अजून अधूनमधून होती. या उत्सवात एकंदर गैरव्यवस्था बरीच झाली. आमच्या खुर्च्या राखीव असून आम्हाला कधी मिळाल्या नाहीत. सांगलीकरच त्यावर आधी येऊन बसत. त्या रात्री गंधर्वांच्या नाटकाला माझी जागा मला न मिळाल्यामुळे मी गॅलरीखालून जरा दोन पावलं पुढे उभा राहिलो. तेवढ्यात पाठीशी मोठा आवाज होऊन पावसाने ओल्या झालेल्या जमिनीत एका बाजूचे वासे खचून गॅलरी कोसळली! स्त्री-पुरुषांच्या किंकाळ्या, ओरडणे, विव्हळणी यांनी वातावरण भरले. गॅलरीच्या खाली मोडलेल्या खुर्च्यांवर वरचे ओझे कोसळून त्या खाली गॅलरीखाली बसलेली माणसे दबली गेली होती. गॅलरीच्या दोनच पावले पुढे मी उभा होतो. जरा आत उभा असतो तर मीही जमीनदोस्त झालो असतो! गॅलरी पडताच आम्ही गॅलरीखाली सापडलेल्या प्रेक्षकांना बाहेर काढण्यास धावलो. आम्ही ते करीत असता एक पोलिस स्तब्ध पहात उभा होता. भयंकर राग येऊन मी त्याच्यावर ओरडलो आणि इंग्लंडमधील पोलिस अशा वेळी उभे राहणार नाहीत असं त्याला सांगितलं. रागात आपण खूपदा विनोदी बोलतो. आम्ही पाचसहा लोकांना वासे दूर करून ओढून काढले; पण एक गृहस्थ पडलेल्या गॅलरीचे सर्व वजन घेऊन पडला होता. तेव्हा आम्हा चौघा-पाच जणांनी रांगत पुढे जाऊन पडक्या गॅलरीच्या वाशांना पाठ देऊन गॅलरी वर उचलली व इतरांनी त्या गृहस्थाला बाहेर काढले; पण बिचाऱ्याच्या पाठीचा कणा दुखावला होता.

त्याचे पाय लुळे पडले होते. तो आयुष्याचा अधू झाला असावा. पुढे कळले की, त्याने कोर्टात जाऊन भरपाई घेतली.

हा प्रसंग घडत असता नाटक चालूच राहिले होते. त्या एका गृहस्थाशिवाय बाकी कुणाला तशी मोठी इजा झाली नव्हती. पडलेले लोक उठून नाटक पाहू लागले होते. बालगंधर्वांना मी रंगभूमीवर असं पहिलं आणि शेवटलं पाहिलं; पण प्रसंगाच्या तीव्रतेमुळं असेल बालगंधर्वांचा अभिनय, बोलणं, गाणं माझ्या मनावर कोरल्यासारखं ठसलं. इतकं की, जरा कुणी बालगंधर्वांसारखा अभिनय केला की, माझ्या डोक्यात खट्ट होतं. माझ्या लक्षात आलंय की अगदी विजया खोटेपर्यंत बालगंधर्वांचा प्रभाव चालत आलाय !

¤

मंगरूळकर बालगंधर्वांविषयी आणखी म्हणाले की, ' शब्द सूर--ताल यांची बडदास्त राखणारा हा एकमेव गायक! नारायणरावांचे गुरु भास्करबुवा आणि भास्करबुवांचे गुरु अलादियाखाँ अलादियाखाँ म्हणत असे, चाळीस वर्षे गायलो; पण असा (बालगंधर्वांसारखा) निषाद येत नाही! नारायणराव गाणं शिकलेले नव्हते; पण मग त्यांना इतकी जाण कुठून आली ?'

नारायणरावांचे आयुष्य असे की ऐनवेळी आपत्ती येत. त्याचे उदाहरण सांगताना मंगरूळकर म्हणाले, '१९११ मार्चला 'मानापमाना'चा पहिला प्रयोग झाला. प्रयोग चालू असता त्यांची कन्या वारल्याची बातमी आली; पण त्यांनी प्रयोग बंद केला नाही ! ' ' हा टकमक पाही सूर्य रजनिमुख ' हे पहिले पद सुरू झाल्यावर कडाडून टाळ्या पडल्या. त्याला वन्समोअर दिला. तेव्हा ते पद त्यांनी अंत्र्यापासून सुरू केलं व तेथून अस्ताईवर येऊन संपविलं. हे त्यांना कुणी शिकवलं ? भास्करबुवांनी ? बालगंधर्वांना विचारले असते ' तुम्ही असे का गायलात ?' तर त्यांनी म्हटले असते, ' मला वाटले म्हणून गायलो !' कुमारगंधर्व म्हणतात, ' बालगंधर्वांच्या गाण्यातला गाणेपणा कधी गेला नाही !'

" चौतीस साली आपल्या नाटकमंडळीचे विसर्जन झाल्यावर बालगंधर्वांची मूळ धार्मिक प्रवृत्ती उफाळून आली. तिने वेगळेच रूप घेतले. त्यांना भजनात गोडी लागली व ती भजनेही लोकप्रिय झाली. कुणीही ती येऊन ऐकावी असे होते. त्यासाठी पैसे नव्हते. यापुढे पैशाचा व गाण्याचा संबंध त्यांनी ठेवला नाही. पण भजन म्हणताना मृदुंगातून आवाज बाहेर काढण्यास जास्त ओरडावे लागे. त्यामुळे बालगंधर्वांचा आवाज पसरट झाला व नाजुकपणा गेला. दात पडले म्हणून बायकोवरचे प्रेम जसे जात नाही तसे रसिकांचे नारायणरावांवरचे प्रेम गेले नाही ! भजनामुळे नाजुक शिरांची दोरखंडे झाली तरी त्यांना गाण्याचे शेवटपर्यंत भान होते. त्यांचे गात राहणे हे त्यांच्यावरील रसिकांच्या प्रेमाचा परिपाक होता. १९१९–२५––२६–३४ सालचं ते राहिलं नव्हतं. बालगंधर्वांचा आवाज कसाही झाला असो, शब्दांचा त्यांचा लडिवाळपणाही कधी गेला नाही !"

¤

जसे बालगंधर्वांचे एकच नाटक मी पाहिले व अपघातही पाहिला तसेच बालगंधर्वांचे शेवटचे दिवसही मला पहावे लागले. कारण शेवटी बालगंधर्व जिथे राहिले त्याच आळीत आम्ही राहात होतो. मंगरूळकरांनी, भजने म्हणून बालगंधर्वांचा आवाज पसरट झाला तरीही रसिकांचे त्यांच्यावरचे प्रेम गेले नाही, असे म्हटले; पण त्यांच्या रसिकांची तऱ्हा बदलली होती. ते पूर्वीचे शिग्रामगाड्यांतून येणारे रसिक आता नव्हते. गंधर्वांनी नेसलेल्या पातळासारखे पातळ व शालू आणून त्या नेसून नाटकास येणाऱ्या रसिक स्त्रिया त्यांच्या भजनाभोवती नव्हत्या. कानात अत्तराचा फाया, तोंडात सुगंधित विडा, हातात छडी, डोक्यावर गंधर्वकॅप व खाकेत त्या रात्रीच्या नाटकाचे पुस्तक असे रसिक पुरुषही आता दूर होते. बालगंधर्वांच्या भजनांना होणारी गर्दी मध्यमवर्गीयांची व खालच्या वर्गाची होती. ज्यांना इतके दिवस पैशामुळे गंधर्व अप्राप्य होता, गंधर्वांची नाटके पाहणे ज्यांना परवडत नव्हते ते आता बालगंधर्व सहज ऐकायला व पहायला मिळतात या आनंदात गर्दी करीत होते ! या श्रोत्यांत ज्यांनी गंधर्वांबद्दल फक्त ऐकले होते ती तरुण पिढीही होती.

अर्थात अगदी सर्वच श्रीमंत रसिकांनी गंधर्वांकडे पाठ फिरवली होती असे नाही. त्यातला एकजण मात्र बालगंधर्वांशी नक्की एकनिष्ठ राहिला. हे रसिक गृहस्थ म्हणजे आमच्या आळीतले बापूसाहेब परांजपे होत ! बालगंधर्व नेहमी त्यांच्याकडे जात, ते आमच्या दारावरून. त्यांनी हाफपँट घातलेली असे व सदरा आत खोवलेला असे. आता हे सांगताना मी कौतुकाने सांगत आहे; पण त्या वेळेस आमचेच काय पण कुणाचेच बालगंधर्वांकडे फारसे लक्ष नसे ! तरुण पिढीला तर त्यांच्याबद्दल वाटण्याचे कारणच नव्हते. कारण चित्रपटयुग केव्हाच सुरू झाले होते. रंगभूमीच्या सिंहासनावरून केव्हाच उतरलेले बालगंधर्व विस्मृतीत गेले होते. आम्ही असे ऐकत होतो की बालगंधर्वांचे सर्व परांजपेच करीत होते; त्यांना अर्धांगवाताचा झटका आल्यावरही. अंगावरून वारा गेल्यावरही बालगंधर्व भजने करीत. चिंचेच्या तालमीच्या गणपतिउत्सवात त्यांचे भजन होई. तेव्हा त्यांना खुर्चीवरून उचलून आणावे लागे. कार्यक्रम संपेपर्यंत बापूसाहेब परांजपे जवळ असत. मध्यंतरात बालगंधर्वांना बशीत चहा घेऊन पाजावा लागे. ते सगळेच दृश्य अतिशय करुण असे. त्यातली बालगंधर्वांची जिद्द आणि परांजपे यांची निष्ठा दोहींचंही कौतुक होतं.

¤

आजच्या तरुण पिढीप्रमाणेच गंधर्वांचे ऐन उमेदीतले दिवस मला ठाऊक नाहीत. फक्त माझे वय जास्त असल्यामुळे मी लहानपणापासून बालगंधर्वांबद्दल सारखा ऐकत आलो आहे. शंभर शंभर वेळेला त्यांचे एकेक नाटक पाहिलेले व एक विशिष्ट नाटक कुठल्याही गावी लागो, तिथे जाऊन पहाणारे तेव्हाचे लोक मला ठाऊक आहेत. बालगंधर्वात विलक्षण जादू होती यात शंका नाही; पण आजच्या तरुणांना कळत नाहीत, त्या दोन गोष्टी मलाही अजून कळत नाहीत. एक पुरुषांनी घेतलेले स्त्रीचे सोंग इतके मोह कसे घालते ? व दुसरं बालगंधर्वांच्या आवाजाची गोडी. माझ्या तरुण वयात सर्व नाटकांतून स्त्रीभूमिका पुरुषच करीत. मला त्या कधी आवडल्या नाहीत. एकदा कल्याणला संत तुकाराम थिएटरात एक लहानशी नाटकमंडळी आली. त्या कंपनीत एक स्त्रीपात्र स्त्रीच असे. स्त्रीपार्ट घेतलेल्या इतर पुरुषांच्या पुढे तिची

भूमिका मला इतकी सहज सुंदर वाटली की, तिला रंगभूमीवर पाहून मला अतिशय आनंद झाला. स्त्रीचा सहजभाव पुरुषाला कधी येणार नाही ही माझी खात्री झाली. तरी बालगंधर्वांच्या स्त्रीभूमिकांवर पस्तीस वर्षे लोक लट्टू होते हे विसरता येत नाही. तेच आवाजाच्या गोडीचे. त्यांच्या आवाजाला विलक्षण गोडी होती यात शंका नाही; पण आज गंधर्वांच्या रेकॉर्ड ऐकून 'त्या ऐकवत नाहीत' असे तरुण म्हणतात तेही बरोबर आहे. मलाही त्या ऐकवत नाहीत; पण बालगंधर्वांचीच गाणी आशा भोसले वगैरेंनी म्हटलेली सर्वांना आवडतात. बालगंधर्वांच्या रेकॉर्ड आज ऐकवत नाहीत याचे कारण त्या ज्या वेळी घेतल्या त्या वेळी रेकॉर्डिंगचे शास्त्र आजच्या इतके प्रगत झाले नव्हते. तेव्हा रेकॉर्डिंगमध्ये आवाज जसाच्या तसा घेता येत नसे. आवाजातली सर्व कंपने येत नसत. काही दबली जात. काही अजिबात येत नसत. उलट आज रेकॉर्डिंगचे शास्त्र इतके प्रगत झाले आहे की, आवाजाचा खरेपणा ऐंशी टक्के रेकॉर्डमध्ये आणता येतो. आजच्या उत्तमोत्तम गायकांचा किंवा गायिकांचा आवाज जर गंधर्वांच्या पद्धतीने रेकॉर्ड केला तर तो ऐकवणार नाही, इतका किरटा येईल किंवा नाकात येईल, तेव्हा बालगंधर्वांच्या रेकॉर्ड असूनही आपण त्यांच्या खऱ्या आवाजाला मुकलो आहोत.

श्रोत्यांना बालगंधर्वांच्या गळ्याची इतकी मोहिनी होती की, त्याची चिकित्सा करण्याचे भान राहात नसे; पण आता वडिलांच्या गळ्याची ती मोहिनी नसलेली त्यांची कन्या गात असता बालगंधर्वांच्या शब्दांचा लडिवाळपणा व सहजपणे तानांच्या नंदनवनात मागेपुढे हिंडण्याची त्यांची लकब यांचे गुपित कळल्याचा मला भास झाला. माझ्या लक्षात आले की, त्या गाताना जीभ जरा पुढे करून, सैल ठेवून सहजपणे थरथरू देतात. गंधर्व गाताना अशीच जीभ ठेवीत व त्यामुळे त्यांच्या गाण्यात लडिवाळपणा येई आणि जसे एखाद्या लेखकाने सहज साध्या शब्दात वाचकांना मोठे तत्त्व सांगावे तसे गंधर्वांचे आलाप, गाण्यातले मर्म किती सोपे आहे हे श्रोत्यांना दाखवीत वरखाली, मागेपुढे होत राहत.

गाण्यातले मला काही कळत नसल्याने बालगंधर्वांच्या गाण्यासंबंधी आणखी काही सांगण्याचे धाडस मी करीत नाही. हवे असल्यास मी सांगितलेले वाचकांनी विसरून जावे. त्याऐवजी, त्यातले अरविंद मंगरूळकरांसारखे दर्दी काय म्हणतात ते सांगतो, ते वाचावे. मंगरूळकर म्हणाले, 'रंगभूमीवर उभे राहिल्यावर बालगंधर्व जे वातावरण निर्माण करीत ते इतके लोभनीय असे की, ज्यांनी तो जमाना पाहिला ते ते विसरणार नाहीत. ज्यांनी तो पाहिला नाही त्याला कधीही त्याची कल्पना देता येणार नाही!'

मंगरूळकर इतके चांगले बोलत होते की, मला त्यांना मिठी मारावीशी वाटली. वृद्ध माणसांचा जुन्या आठवणी सांगताना भावनेने शब्द थरथरतो तसा त्यांचा शब्द थरथरता वाटला; पण अशा वेळी आपण वृद्धांना अडवू नये, त्यांच्या डोळ्यांत पाणी तरंगले तरी लक्ष नाही असे दाखवावे, तसेच श्रोत्यांनी केले. व्याख्यानाच्या शेवटी मंगरूळकर म्हणाले,

'बालगंधर्व हे मराठी रंगभूमीला पडलेले स्वप्न होते. आज आम्ही त्या स्वप्नातून जागे झालो आहोत व ते स्वप्न विसरून गेलो आहोत.' ◻

# चित्रपट

## दूरियाँ

सदानंद बोरसे

'घरौंदा' या आपल्या पहिल्याच चित्रपटाने दिग्दर्शक भीमसेन यांचा बराच बोलबाला झाला. 'घरौंदा'चे एकमुखी आणि आणि एकमताने कौतुक झाले नसले; तरी तो दुर्लक्षितही राहिला नाही. भीमसेनचाच 'दूरियाँ' हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला. हा चित्रपट म्हणजे भीमसेन यांनी 'घरौंदा'च्या पुढे टाकलेले एक पाऊल म्हणता येईल.

तसा चित्रपटाचा विषय वा कथा नवीन आहे, असे नाही. पति-पत्नींमधील वादळ आणि दोघांमधील दुव्याने म्हणजे अर्थातच छोट्या मुलाने वा मुलीने त्यांना पुन्हा जवळ आणणे हा विषय चित्रपटाचे प्रमुख कथानक वा उपकथानक म्हणून यापूर्वीही अनेक चित्रपटांमधून येऊन गेला आहे. त्यामुळे चित्रपटाच्या कथेपेक्षाही तिच्या हाताळणीला, पटकथेत निवडलेल्या छोट्या-छोट्या प्रसंगांना महत्त्व मिळणे अपरिहार्य होते. चित्रपटाचे एक मुख्य वैशिष्ट्य म्हणजे आपल्याला नेमके काय दाखवायचे आहे, याचे दिग्दर्शकाने कायम ठेवलेले भान. कैलाश शर्मा (उत्तमकुमार) आणि रत्ना (शर्मिला टागोर) या पति-पत्नींमधील बेबनाव, त्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला दुरावा आणि नंतर सतत निरनिराळ्या छोट्यामोठ्या घटनांमुळे, व्यक्तींमुळे अथवा ताणांमुळे बसणाऱ्या हेलकाव्यांनी सतत आंदोळत राहणारे, कमीजास्त होणारे त्यांच्यामधील अंतर आपल्याला प्रेक्षकांपुढे मांडायचे आहे, याची स्पष्ट जाण दिग्दर्शकाला पार चित्रपटाच्या नावापासून (Doooriyan मधील ३ 'o') आहे. त्यामुळे कथेची थोडीशी पार्श्वभूमी निर्माण करणारा भाग – कैलाश व रत्नाचे प्रेम, लग्न, सोनाचा (गीता खन्ना) जन्म – येथपर्यंतचा भाग अत्यंत भराभर म्हणजे जवळजवळ पहिल्या दहा मिनिटांत उरकून टाकला आहे. लग्नाच्या सुहाग रात्री 'जिंदगी मेरे घर आना' हे गीत सुरू होते, ते संपताना कैलाश आणि रत्ना घटस्फोटाच्या सीमारेषेवर उभे असतात, इतका चटकन हा संपूर्ण भाग संपतो. अन्यथा त्यांचे प्रेम, प्रणय,

नाचणे-वागडणे इत्यादी गोष्टींनी हा भाग जवळजवळ चौपट वाढविता येणे काही कठीण नव्हते. ( त्यातून उत्तमकुमारला हे असले गुळगुळीत, चॉकलेटी प्रेम करायला न लावणे, यातून भीमसेनला प्रेक्षकांना काय सहन होऊ शकते याचीही उत्तम माहिती असल्याची खूण पटली. )

कैलाश आणि रत्नाच्या घटस्फोटापूर्वी मुलगी कोणाजवळ राहणार, या प्रश्नावरून दोघांचे भांडण, कैलाशने रत्नाला मुस्काटात मारणे– हा चित्रपटातील भागही त्याच्या संयमित हाताळणीमुळे अतिशयच परिणामकारक झाला आहे.

कैलाश आणि रत्नाच्या घटस्फोटानंतर दोघांमधील ताण अधिक वाढविण्यासाठी आणि चित्रपटाची उत्कंठाही थोडीफार कायम राखण्यासाठी प्रभाकर (डॉ. श्रीराम लागू) आणि लक्ष्मी या दोन पात्रांची योजना केली आहे. त्यातही साधी, सरळ, सुगृहिणी आणि कैलाशवर मनापासून प्रेम करणारी लक्ष्मी प्रेक्षकांची सहानुभूती मिळवून जाते. या सहानुभूतीत शेवटी रत्नासाठी लक्ष्मीने आपणहून केलेल्या त्यागाचा वाटा सर्वांत मोठा. प्रभाकरला मात्र रत्नाबद्दल वाटणारे आकर्षण आणि शेवटीही त्याने आपल्या आयुष्यातून दिलेली रजा हे बरेचसे अबोल आणि अव्यक्त ठेवले असल्याने प्रभाकर स्वतंत्र व्यक्तिरेखा म्हणून फारसा लक्षात राहत नाही. रत्नालाही जीवनसाथी म्हणून प्रभाकरचे आकर्षण वाटल्याचे कोणतेच चिन्ह नाही. याउलट कैलाश मात्र लक्ष्मीमध्ये बऱ्याच प्रमाणात गुंतला जातो. त्यामुळेच लक्ष्मीच्या व्यक्तिरेखेला अधिक महत्त्व मिळून जाते.

चित्रपटात सर्वांत महत्त्वाची पात्रे तीन– अर्थातच कैलाश, रत्ना आणि त्यांची मुलगी सोना. यांपैकी उत्तमकुमारने कैलाशच्या भूमिकेला सुरेखच आकार दिला आहे. सोनाच्या काळजीने व्यग्र, आपल्या नाटकाच्या हौसेपायी सोनाकडे दुर्लक्ष करते म्हणून रत्नावर संतापणारा कैलाश, सोनाला भेटण्यासाठी तडफडणारा आणि भेटता न आल्यामुळे अगतिक झालेला कैलाश, नंतरही लक्ष्मीची ओळख होऊनही सोनामध्ये गुंतून राहिलेला कैलाश इत्यादी सर्व बाजू उत्तमकुमारने अतिशय सुरेख उभ्या केल्या आहेत. रत्ना– एक ग्लॅमर असलेली सुप्रसिद्ध नटी म्हणून शर्मिला टागोर ठीक वाटली, तरी रत्ना– एक पत्नी आणि त्याहीपेक्षा रत्ना– एक आई म्हणून मात्र खूपदा तिच्या कामात एक चमत्कारिक कृत्रिमपणा आणि नाटकीपणा खुपत राहिला. हाच प्रकार सोनाचे काम केलेल्या गीता खन्नाच्या बाबतीत. अतिशय प्रसन्न हास्य आणि लाडिक बोलणे या दोन गोष्टी सोडल्यास तिचेही विशेषतः रडणे फारच खोटेखोटे वाटायचे. त्यामुळे कैलाश आणि सोनाचे प्रसंग ( बाबांबरोबर फिरायला जाण्यासाठी सोनाने मेक अप करून त्यांची वाट पाहणे, बऱ्याच दिवसांनी भेटलेल्या बाबांबरोबर जास्तीत जास्त वेळ घालवायला मिळावा म्हणून त्यांना चहाही पिऊ न देणे इत्यादी ) जितके जिवंत आणि दिलखुलास झाले आहेत, तितकेच रत्ना आणि सोनाचे प्रसंग ( रत्ना नाटकाला जात असताना 'जाऊ नकोस' म्हणून रत्नाने घेतलेला हट्ट ) फारच खोटेखोटे वाटतात.

आणखी एक लक्षात राहणारे पात्र म्हणजे ताई ( सुलभा देशपांडे ). आपल्या मालकाने व मालकिणीने पुन्हा एकत्र येऊन राजाराणीचा सुखाचा संसार मांडावा यासाठी आपल्या परीने धडपडणारी ही मराठी वळणाची ताई सुलभा देशपांड्यांनी सुरेख उभी केली आहे.

दिग्दर्शनाने ठोकलेले खिळे जाणवावेत, यासाठी भीमसेनने काही क्लृप्त्या वापरल्या आहेत. पत्र वा चिठ्ठीतील मजकूर पडद्यावर दाखवायचा असल्यास ते पत्र दूर सारून त्याच्या मागे तो पत्रलेखक बसला असल्याचे दाखवून त्याच्या तोंडून तो मजकूर ऐकवायचा आणि मग पुन्हा पत्राने त्याला झाकायचे अशी एक युक्ती वापरली आहे. 'आपण राहत असलेला फ्लॅट सोडा !' असे कंपनीचे पत्र रत्नाला येते, त्यातील औपचारिकपणा दाखविण्यासाठी ही युक्ती ठीक वाटली; पण कैलाश आणि सोनाच्या भावपूर्ण चिठ्ठ्यांसाठीही तीच युक्ती म्हणजे ठोकलेला खिळा वाटला. हाच प्रकार 'इव्हिनिंग न्यूज' या गाण्याबद्दल. जीवन, त्यातील तोचतोचपणा, क्षणभंगुरपणा, नियती वगैरे गोष्टींची थोड्याशा बोचऱ्या पद्धतीने चर्चा करण्याचा ओढून ताणून केलेला प्रयत्न म्हणजे हे गाणे. पिकनिकला गेल्यानंतर 'आओ, मुझे पकडो' म्हणणाऱ्या सोनाच्या जागी प्रभाकरला रत्ना दिसणे हीही अशीच एक जुनाट युक्ती. बाकी पटकथेची सरळ मांडणी केलेली असताना अथवा प्रभाकरला वाटणारे रत्नाचे आकर्षण, कैलाश व सोनाच्या पत्रातील भावना या गोष्टी अन्य प्रसंगांमधून समर्थपणे व्यक्त होत असताना अशा लंगड्या युक्त्यांचा आधार घेण्याची फारशी आवश्यकता नव्हती.

जयदेवचे संगीत चित्रपटाच्या प्रवाहाशी एकरूप झालेले. सुदर्शन फकीर हा नवा गीतकार या चित्रपटात भेटतो.

चित्रपटाच्या शेवटाबद्दल एक तक्रार करता येण्यासारखी आहे. 'सोनासाठी मी नाटक सोडते.' असे रत्नाने म्हणणे, त्यावर मग कैलाशने 'छे, छे, तू नाटक सोडू नकोस. मी सोनाकडे थोडे अधिक लक्ष देत जाईन.' अशी तिची समजूत काढणे हा शेवट 'एकमेकां साह्य करू' असा आदर्शवादी अन् आशावादी स्वरूपाचा असला तरी सुरुवातीपासून चित्रपटाची बांधणी ज्या प्रकारे होते, तिला संपूर्ण विसंगत आहे.

चित्रपट Climb production च्या बॅनरखाली प्रकाशित झाला. त्यांनी शेवटीही 'Await for our next climb' असे म्हटले आहे. त्याप्रमाणे यापुढील चित्रपट भीमसेनचे आणखी एक पुढचे पाऊल असेल, अशी अपेक्षा ठेवायला हरकत नाही. □

---


## राजस मासिक : कथा-स्पर्धा

पुणे येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'राजस' ललित मराठी मासिकाने यंदाही नवोदितांसाठी 'कथा-स्पर्धा' आयोजित केली आहे.

पारितोषिकाची रक्कम रुपये २००/– प्रथम क्रमांक, रुपये १५०/– द्वितीय क्रमांक, रुपये १००/– तृतीय क्रमांक अशी आहे.

कथेची मर्यादा ३००० शब्दांपर्यंत आहे.

या स्पर्धेत बहुसंख्य स्पर्धकांनी भाग घ्यावा असे संपादकांचे आवाहन आहे.

पत्ता : संपादक 'राजस' मासिक, ४९५/९६ मेहुणपुरा, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

कथास्पर्धेची अंतिम तारीख १ सप्टेंबर १९७९ पर्यंत आहे.

# संक्षिप्त आकारणी योजना

## आपल्या प्राप्तीकराची सुलभ आणि लवकर आकारणी

- प्राप्तीकर कार्यालयात आपणांस हजर राहण्याचा तगादा नाही.
- प्राप्तीकर अधिकाऱ्यासमोर, आपल्या हिशोबाच्या वहया हजर करण्याची मागणी ना
- आपण आपल्या विवरणात जाहीर केलेल्या प्राप्तीत केवळ गणिताच्या चूका सुधारणे आणि आवश्यक कायदेशीर, नाळेबन्दी, याशिवाय फेरबदल नाही.
- या पद्धतीनें कर आकारणी करणें आपणांस निश्चितच आवडेल.

### त्यासाठीं आपणास खालील गोष्टी कराव्या लागतील

- आपणास लागू असेल अशा ठराविक फॉर्मवर, सर्व दृष्टीनें परिपूर्ण आणि सत्य विवर दाखल करा.
- आपल्या प्राप्तीबद्दल संपूर्ण माहिती व अन्य आवश्यक माहिती विवरणात आणि संलग्न असलेल्या जोड पत्रकांत व्यवस्थित भरा.
- विक्री/उत्पादन वगैरे हिशोब, नफा-तोटा हिशोब, आढावा पत्रक, वगैरे संबंधित हिशोबा कागदपत्रें, आपल्या विवरणास जोडा.
- प्रारंभीच कर कपात केल्याची प्रमाणपत्रे, अगाऊ कर आणि स्वयं आकारणी भरलेल्या चालानच्या काऊन्टर फाईल्स, सक्तीची ठेव रकम जमा केल्याच्या आणि विम्याचे हप्ते भरल्याच्या पावत्या वगैरे आपल्या विवरणास जोडा.

## करांसंबंधी सर्व त्रास विण्याचा चुक एकमेव उपाय

## सत्य आणि संपूर्ण विवरण पत्रक

निवेदक
**डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन**
**(रिसर्च, स्टॅटिस्टिक्स अँड पब्लिकेशन)**
**इन्कम टॅक्स डिपार्टमेंट**
**नवी दिल्ली-११०००१**

DAVP 79/143